म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2076



# किशोर मित्रांनो!

अमरेन्द्र

REFBK-0015920

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७७

# किशोर मित्रांनो !

अमरेन्द्र

■ ■

REFBK-0015920

प्रस्तावना :

डॉ. ग. श्री. खैर

■ ■

कुमार साहित्य माला

वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २

श्री : ५६२ [ १–६७ ]

■ ■

© १९६७
सौ. मंगला अमरेन्द्र
गाडगीळ

■ ■

मूल्य रु. २–५०

■ ■

आवृत्ति पहिली
शके १८८८; सन १९६७

■ ■

कुमार साहित्य माला

■ ■

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग
मुंबई २

■ ■

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८, नारायण, पुणें २

## निवेदन

असे अनेक विषय आणि प्रश्न आहेत कीं, जे उगवत्या पिढींतील मुलांना-विद्यार्थ्यांना समजावून दिले पाहिजेत. सोप्या भाषेंत, सुबोधपणानें त्यांची फोड त्यांना करून दाखविली पाहिजे. मुलांसाठीं गेल्या आठ वर्षांपासून चालविलें जाणारें 'गोकुळ' हें सांस्कृतिक मासिक आपल्या वैशिष्ट्यामुळें महाराष्ट्रांत प्रतिष्ठा पावलें आहे. त्या मासिकाचे संपादक श्री. अमरेंद्र गाडगीळ यांनीं 'गोकुळ'च्या संपादकीयांतून असे अनेक महत्त्वाचे विषय व प्रश्न चर्चिले. त्यांतील कांहीं थोडे शिक्षक-पालकांसाठीं असून बाकीचे सर्व किशोरवयीन मुलांमुलींसाठींच होते. त्यांतील विचार कोठें तरी एकत्र केले जावेत या हेतूनें किशोरवयीन शालेय विद्यार्थ्यांसाठीं हें पुस्तक तयार करण्यांत आलें आहे. 'गोकुळ'-मधील मूळ संपादकीयांत आवश्यक ते बदल करून व कांहीं थोडी भरहि घालून हा विचार-संग्रह सिद्ध झालेला आहे. ... विचारी शिक्षक-पालकांना तो विचार करायला लावील आणि मुलांमध्यें तो कांहीं जाणता आचारहि उत्पन्न करायला लावील अशी अपेक्षा करावयास हरकत नसावी.

● ● ●

### शिक्षक-पालकांसाठीं


१. मुलांना आपण काय शिकवीत आहोंत ? ... १
२. हें घडवावयाचें आहे ... ३
३. देशभक्तीचे संस्कार हवेत ... ६


### किशोर मित्रांसाठीं


४. नव्या वर्षाचें स्वागत ... ८
५. राष्ट्रीय बैठक पक्की हवी ... १०
६. 'स्वातंत्र्याचे अम्ही शिपाई' ... १२
७. आपण मोठे भाग्यवान् आहोंत ! ... १५
८. जें घडवायचें तें या परंपरेला शोभण्यासारखें ... १७
९. महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधीं व्यापक अपेक्षा ... १९
१०. पानिपताचें स्मरण म्हणजे राष्ट्रीय स्फुरण ... २१
११. हिमालयाचा संदेश ... २४

१२. अन्यायाविरुद्ध उभे रहा ! ... २६
१३. बावळटपणा म्हणजे संकटाला आमंत्रण ! ... २९
१४. विज्ञानहि सांस्कृतिकच ... ३१
१५. आपण हें करूं शकतों ... ३२
१६. ' उत्कट भव्य तेंचि घ्यावें ' ... ३४
१७. ' मला स्मरून युद्ध कर ' ... ३६
१८. श्रद्धा : एक प्रचंड कार्यशक्ति ... ३८
१९. आग्रहाचें आवाहन ... ४२
२०. ' मासानां मार्गशीर्षोऽहम् ' ... ४३
२१. या सगळ्यांचा प्रारंभ ' आपल्या घरापासून ' ... ४५
२२. आपलें घर – कसें होतें, आहे, असावें ? ... ४८
२३. समृद्ध जीवनाकडे – ... ५३
२४. नमस्कारांतील संस्कृति ... ५७
२५. जोंवर आमच्यांत राम आहे ... ५९
२६. आपला आदर्श – पुरुषोत्तम श्रीराम ... ६१
२७. अजरामर रामकथा ... ६३
२८. परिपूर्ण कृष्ण – आपला आदर्श ... ६६
२९. एका राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव ... ६७
३०. गीतेचें सुस्पष्ट मार्गदर्शन ... ६९
३१. गीता आणि रणांगण ... ७३
३२. यानेंच तर तुमचें सांस्कृतिक जीवन पोसलें जायचें ७७
३३. बजरंग बली की जय ... ७८
३४. ' मी हिमालय बोलतों आहें ! ' ... ८१
३५. भगीरथाचा वारसा ... ८४
३६. स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः। ... ८६
३७. समर्थसंजीवनी ... ८९
३८. स्वामी विवेकानन्द : परंपरा आणि वारसा ... ९१
३९. असे जे जे आम्ही तेच भारतीय ! ... ९२

■ ■ ■

# प्रस्तावना

कुमारवयांतील मुलांमुलींकरितां उपयुक्त आणि बोधप्रद साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकांत श्री. गाडगीळ हे एक प्रमुख आहेत. त्यांनीं आतांपर्यंत विविध प्रकारें आणि विपुल वाङ्मय निर्माण केलें आहे. त्यामुळें त्यांनीं स्वतःचा असा एक कुमारवयांतील वाचकांचा वर्ग आपलासा करून घेतलेला आहे. भारतीय संस्कृति, विचार आणि जीवन याविषयीं प्रेम आणि निष्ठा निर्माण करणें हें त्यांच्या सर्व लेखनाचें मध्यवर्ति सूत्र आहे. त्या विषयावर जितक्या विविध दृष्टिकोनांतून विचाराचे झोत टाकतां येतील तितके ते सतत टाकीत असतात. 'किशोर मित्रांनो' हें त्यांपैकींच एक प्रबोधनप्रधान पुस्तक आहे.

भारतामध्यें अनेक वर्षें राहूनहि या देशांतील श्रीमत्, विभूतिमत् आणि ऊर्जित अशा गोष्टींची माहिती नसलेले अनेक लहान-मोठे नागरिक आहेत. या भारताला ज्या ज्या वस्तूंनीं व व्यक्तींनीं मोठेपणा दिल त्यांची माहिती भावनापूर्ण भाषेंत या ग्रंथानें दिली आहे. श्रीराम व कृष्ण यांसारख्या विभूति, हिमालयासारख्या पवित्र व उदात्त वस्तु, पूर्वीच्या इतिहासाचें स्मरण करून देणारे विशेष दिवस, असे अनेक विषय या पुस्तकांत आले आहेत. भारतीय संस्कृतीचा मोठेपणा मुलांच्या मनावर ठसावा हा ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे तो निश्चितपणेंच साध्य होईल.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्यें या देशाचा इतिहास व परंपरा याविषयीं निष्ठा निर्माण करण्याच्या दृष्टीनें अनेक प्रयत्न झालेले आहेत. २५–३० वर्षांपूर्वीचा काळ आणि आजचा काळ यांत पुष्कळ फरक पडलेला आहे. भारत व भारतीय संस्कृति या गोष्टींचा उच्चार करण्याची चोरी व संकोच ब्रिटिश अमदानीमध्यें वाटत होता. आज तो वाटत नाहीं. प्राचीन इतिहासाचें ज्ञान माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट झालेलें आहे. नेमलेल्या क्रमिक पुस्तकांचा व अभ्यासक्रमाचा

काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला भारताच्या अगदीं प्राचीन कालापासून स्वातंत्र्यप्राप्तिदिनापर्यंतची सर्व सुसंगत माहिती मिळते. आर्य संस्कृति, वेद, उपनिषदें, पुराणें, शास्त्रें, ललित वाङ्मय, कला, समाज-जीवन, इ. कितीतरी नवीन माहिती आजच्या विद्यार्थ्याला मिळूं शकते. गेल्या पिढींतील विद्यार्थ्यांना हा फायदा झाला नाहीं.

भारतीय संगीत, नृत्यकला, चित्रकला, शिल्पकला इ. सांस्कृतिक विभागांची माहिती आजच्या नागरिकाला जास्त प्रमाणांत मिळते. महाभारत, रामायण, वेद, उपनिषदें, पुराणें इ. वाङ्मयांतील उपयुक्त भागाचीं लहान आणि सोपीं पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत. इतकें वाङ्मय पूर्वीच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध नव्हतें. शाळेंत आणि समाजांत थोर पुरुषांच्या जयंत्या, शारदोत्सवासारखे महोत्सव साजरे केले जातात. अशा अनेक साधनांनीं व मार्गांनीं भारतीय संस्कृतीविषयीं प्रेम व आदर निर्माण होईल अशा कार्यक्रमांची आंखणी केली जात आहे. त्याच-बरोबर या सर्व प्रयत्नांना छेद देण्यासारखे अजाणपूर्वक प्रयत्न समाजाच्या दुसऱ्या एका भागाकडून होत आहेत.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशाचा सर्व कारभार, आर्थिक व्यवहार आणि उद्योगधंदे भारतीयांच्या हातांत आलेले आहेत. या प्रक्रियेमुळें पूर्वीं ज्यांच्या हातांत संपत्ति व पैसा नव्हता त्यांना तो सहजपणें मिळून एक नवीन धनवान वर्ग निर्माण होत आहे. फार श्रम न करतां पैसे मिळविण्याच्या सोयी अनेकांना उपलब्ध झालेल्या आहेत. या पैशाचें काय करावें असा प्रश्न या नवीन धनिकांच्या पुढें आहे. त्यांचा हा प्रश्न सोडविण्याकरितां समाजांत एक नवीन वर्ग निर्माण झालेला आहे. या वर्गांत सिनेमाचे निर्माते व कलावंत, चैनीच्या वस्तु निर्माण करणारे कारखानदार, अशी वस्तूंची जाहिरात करणारे प्रतिभावान् लेखक, उत्तान विषयावरचीं मासिकें व वाङ्मय काढणारे लेखक, व प्रकाशक व चित्रकार असे सर्व लोक या वर्गांत येतात. ज्यांच्या हातांत

पैसा आहे अशा लोकांच्या सुखोपभोगाच्या, चैनीच्या आणि काम-विषयाच्या भावना प्रदीप्त करण्याला सतत इंधनें पुरवीत रहाणें आणि त्या मार्गानें पैसेवाल्यांच्या खिशांतला पैसा आपल्या खिशांत आणणें हें या नवीन वर्गाचें उद्दिष्ट आहे. त्यांच्या ठिकाणीं ध्येयवाद आहे तो केवळ वैयक्तिक स्वार्थाचा आणि धनसंचयाचा! भारतीय संस्कृति, विचार, आणि मूल्यें या सर्व गोष्टी त्यांच्या फायद्यापुढें त्यांना क्षुद्र वाटतात. आपल्या कृतीनें आपण समाजांतील उदात्त गोष्टींना धुळीला मिळवीत आहोंत याची त्यांना फिकीर नाहीं. या दोन्ही वर्गांना जो पैसा मिळतो त्याचा उपयोग पाश्चिमात्य पद्धतीचे पोषाख, राहणी, करमणुकी आणि विलास यांचा उपभोग घेण्यांत आणि आपल्या कलेच्या द्वारें त्याचें प्रदर्शन करण्यांत त्यांना धन्यता वाटते. या लोकांनीं भारतीय जीवनाला हानिकारक असें नवीन वातावरण निर्माण केलें. कलेवर विचारवंतांचें आणि शासनाचें नियंत्रण नसलें म्हणजे ती समाजाच्या अभिरुचीला कसें विकृत वळण लावूं शकते त्याचें चित्र आज या देशांत पहावयास सापडते.

सांस्कृतिक जीवनाला गौणपणा आणण्याच्या दृष्टीनें तिसऱ्या एका विचारप्रवाहाचा परिणाम होत आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत विज्ञानाचा विकास अतिशय शीघ्र वेगानें झाला आहे. विज्ञानाच्या प्रगती-मुळें आपलें भारतीयांचें बाह्य जीवन बदललेलें आहे; परंतु हें जीवन बदलणारी दृष्टि आणि मनोवृत्ति आपण आत्मसात् केलेली नाहीं. प्रयोगाची प्रवृत्ति आणि त्या प्रवृत्तीवर आधारलेले बुद्धिनिष्ठ आणि विचारप्रधान असे फेरबदल आपल्या मनोवृत्तींत झालेले नाहींत. यामुळें पाश्चिमात्य बाह्य जीवनाचें अनुकरण म्हणजेच विज्ञानाची प्रगति अशी आपल्या लोकांची चुकीची समजूत झालेली आहे. त्याचा परिणाम असा झालेला आहे कीं, परिस्थितीचा व परंपरेचा विचार न करतां परकीयांच्या बाह्य जीवनाचें उथळ अनुकरण आज समाजांत होत आहे. ज्यांच्या हातांत फारशा कष्टानें न मिळविलेला पैसा खेळत आहे असा नवा धनिकवर्ग पाश्चिमात्य

जीवनाच्या अंधानुकरणाचे धडे सर्वसामान्य समाजाला देत आहे. आमच्या मासिकांत येणाऱ्या जाहिराती, चित्रपटांत व नाटकांत प्रेक्षकांच्यापुढें ठेवलेले पोषाखांचे व रीतीरिवाजांचे धडे, आमच्या उत्तान साहित्यांत वाचकांच्यापुढें लेखकांनीं ठेवलेले आचाराचे आदर्श या सर्व गोष्टी निर्बुद्ध व सवंग अनुकरणामुळें निर्माण झाल्या आहेत. भारतीय संस्कृतीचा विकास ज्ञान-विज्ञानाच्या समन्वयामुळें झालेला आहे, तो तसाच चालू राहिला पाहिजे. त्याकरितां खरोखरीची वैज्ञानिक आणि प्रायोगिक निष्ठा समाजांत अवश्य दृढमूल व्हावयास पाहिजे.

भारतीय संस्कृतीच्या अभिमानी लोकांनींहि आपल्या विचार-मांडणीची पद्धती बदलावयास पाहिजे. आजचा तरुण वाचक हा बुद्धिनिष्ठ आणि विज्ञानप्रधान अशा शिक्षणांतून बाहेर पडणार आहे. आधुनिक समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, ऐतिहासिक संशोधन अशा प्रकारचीं नवीन नवीन शास्त्रें अस्तित्वांत आलीं आहेत. त्यांच्या ज्ञानाचा प्रकाशझोत भारतीय संस्कृतीवर टाकून तिची छाननी केली पाहिजे. तिच्यांतील तत्कालीन आणि चिरकालीन, प्रादेशिक आणि व्यापक अशा विभागांचें पृथक्करण केलें पाहिजे. यापुढें भारतीय संस्कृतीवर लिहिणाऱ्या व विचार करणाऱ्या मंडळींना जगांत वाढलेल्या शास्त्रांची माहिती पाहिजे. भारतीय संस्कृतीविषयीं पाश्चिमात्य विचारवंतांच्या मनांत अद्याप फार मोठा आदर आहे. तो टिकवून आपल्या विचारांची भर जगांतील विचारांत घालावयाची असेल तर अभ्यासू असे नवे द्रष्टे व लेखक निर्माण झाले पाहिजेत.

— ग. श्री. खैर

९५८२०

## मुलांना आपण काय शिकवीत आहोंत ?

बऱ्याच लोकांच्या म्हणण्याचा सूर एकंदरींत असा आहे कीं, आज आपलीं मुलें जीं 'विघडलेलीं' दिसतात त्याची मुख्य जबाबदारी पालक-शिक्षकांवरच पडते. विहिरींत नसलें तर पोहोऱ्यांत येणार कुठून ? आणि समजा, तें असलें तरी विहिरींतून पोहरा भरून तें बाहेर योग्य जागीं आणून सोडण्याचीहि पद्धतशीर व्यवस्था पाहिजेच.

आपल्याकडील परिस्थितीचा विचार केला तर काय दिसतें ? वरीलपैकीं कोठें विहिरींतच कांहीं नाहीं; तर दुसऱ्या कांहीं ठिकाणीं तें विहिरींतलें बाहेर काढण्याच्या व्यवस्थेचा अभाव आहे. मधल्या पिढीची स्थिति अशी झाली आहे कीं, तिनें मागील सर्व धार्मिक, सांस्कृतिक परंपरा, श्रद्धा, निष्ठा यांकडे पाठ फिरविली. स्वातंत्र्यपूर्व काळांत स्वातंत्र्याच्या लढ्यांत राष्ट्रीय जिद्दीचा जो पीळ होता तोहि स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर पुरा विरून गेला. आणि यामुळें विरी गेलेला चुना असावा तसा हा मधल्या पिढींतला माणूस बनला. जुनीं जीवनमूल्यें या पिढीनें स्वतःच्या हातांनीं उखडून फेकून दिलीं खरीं, पण त्या जागीं नवीं सकस मूल्यें उत्पन्न करण्याची या मंडळींची ताकद नव्हती; आणि कोणी उत्पन्न केलीं असतील तर तीं जतन करून वाढीला लावण्याची यांची तयारी नव्हती.

याच्याच जोडीला 'निधर्मी' राजवट आली. भारताच्या सांस्कृतिक जीवनांत या राजवटीनें 'राजकारण' कालवलें. भारतीय सकस जीवनाला मार्गदर्शक ठरणारे नंदादीप विझवून आकाशांतल्या केवळ लुकलुकणाऱ्या ताऱ्यांकडे दृष्टि लावण्याचा अट्टाहास या राजवटीनें चालविला. राष्ट्रीय अस्मितेचे प्रकाशदीप डोळ्यांआड करून जणूं आपण ईश्वराचे प्रेषित अशा अभिनिवेशानें नव्या पिढीची दिशाभूल करणारे मानवतेचे पाठ देण्याचा सपाटा सुरू केला. याचा परिणाम ' इदं च नास्ति परं न लभ्यते ' असा झाला; आणि तें साहजिकच होतें !

शाळांतून, ज्या ठिकाणीं नव्या पिढीवर राष्ट्रीय स्वाभिमानाचे नि सांस्कृतिक चारित्र्यनिर्मितीचे संस्कार घडावयाचे तेथील परिस्थिति म्हणजे वरील दोन्ही दुर्दैवांचा परिपाक आहे. ज्या मधल्या पिढींतून येथले शिक्षक आले ते आपल्या विद्यार्थ्यांवर परिणामकारक संस्कार घडविण्यास असमर्थ ठरले. आणि त्यांतूनहि जे कोणी आशेचे किरण वाटण्यासारखे होते त्यांची सरकारी नियंत्रणांनीं पुरी गळचेपी करून टाकली. बहुधा ब्रिटिश-अमेरिकाछाप शिक्षणपद्धतीचेच धडे या शाळांतून गिरवले गेले. अन्यत्र कांहीं ठिकाणीं गांधीवादी 'जीवनशिक्षण' पद्धतीचे प्रयोग झाले; पण तेहि त्यावरील पूर्ण निष्ठेच्या अभावीं निष्फळ ठरले, निर्जीव झाले.

यांतून काय घडलें ? काय घडत आहे ? – आजची नवी पिढी ! तेव्हां या नव्या पिढींतील दोषांचें खापर खरोखर कोणाच्या माथ्यावर फुटतें तें आतां वेगळें सांगण्याची गरज नाहीं.

पण, आम्हांला म्हणावयाचें तें यापलीकडच्या किंवा खरें म्हणजे भविष्यकाळाबद्दल आहे. एक उदाहरण ऐकलें तेंच येथें नमूद करतों. ऐकलें असें कीं, एका सरकारी ट्रेनिंग कॉलेजमध्यें पूर्वीचा कुस्तीचा आखाडा होता तो बुजवून त्या जागीं अहिंसक, 'जीवनशिक्षणप्रद' विचार-सरणीला सुसंगत म्हणून चरखावर्ग सुरू करण्यांत आला. जणुं कुस्तीच्या आखाड्यांतील लाल माती माणसाचें रक्त हिंसामय करते, असें हा उद्योग करणारांच्या मनांत आलें असावें !

याउलट परदेशांतून काय घडत आहे ? ब्रिटिश व रशियन बाल-कांना नाविक आरमारी शिक्षण देण्यासाठीं कसून प्रयत्न चालले आहेत; मुलांना दुर्गम अशा बर्फ-प्रदेशांतून सहली करण्याचा सराव देण्यांत येत आहे. मोठ्या माणसांना, साहसी प्रौढांनाहि ज्या प्रदेशांतील प्रवास म्हणजे संकट वाटावें त्या प्रदेशांतून आपल्या राष्ट्राचीं मुलें सहलीसाठीं पाठविण्याचा हा उपक्रम तेथें राष्ट्रीय नियोजनानेंच चालू आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे.

आपण आपल्या देशातील मुलांना, त्यांना नीट समजूं लागण्या-पूर्वीपासूनच 'मानवते'चे धडे देत आहोंत. साहस, शौर्य, पराक्रम हे जणुं पाशवी गुण आहेत अशी त्यांची कल्पना अजाणतेपणानें करून देत आहोंत. दाराशीं परचक्राचें संकट उभें आहे. अत्युच्च मानवी मूल्यांचें आचरण करणें ही इष्टसिद्धि असावी, याबद्दल कोणाचेंच दुमत होण्यासारखें नाहीं. पण तें आचरण करूं शकणाऱ्या माणसांना तेजस्वी माणसें – स्वाभिमानी, स्वसंरक्षणक्षम नि चारित्र्यसंपन्न माणसें बनविणें हें त्याअगोदरचें परम आवश्यक किंबहुना अपरिहार्य कर्तव्य आहे. या सत्याकडे डोळेझांक करणें आत्मघातकीपणाचें, राष्ट्रघातकीपणाचें ठरेल.

■ ■ ■

## हें घडवावयाचें आहे

**विशुद्ध भारतीय राष्ट्रवादी नागरिक आम्हांला नव्या पिढींतून घडवावयाचा आहे.** विशुद्ध भारतीय म्हणजे भारतीय निष्ठा, श्रद्धा, परंपरा यांची आदरपूर्वक जोपासना करणारा; आणि राष्ट्रवादी म्हणजे त्यांतून उपलब्ध होणाऱ्या राष्ट्राच्या स्वाभिमानी स्वातंत्र्य-रक्षणासाठीं कोणत्याहि त्यागाला कटिबद्ध असलेला.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे

**कार्य समजेना अंतरें। तें काय झुंजेल बिचारें॥**

नेमकें काय घडवावयाचें आहे याचीच निश्चित कल्पना किंवा जाणीव नसेल तर तें मिळविण्यासाठीं मनःपूर्वक धडपड, निकराचा प्रयत्न किंवा अटीतटीचा लढा तरी माणूस कसा करूं शकेल ? आज भारतांत

नेमकें जर कांहीं – सर्वच क्षेत्रांत – घडत असेल तर तें हेंच आहे, असें आम्हांला नम्रपणें म्हणावेंसें वाटतें. इंग्रजी भाषेचें शिक्षण असावें कीं नाहीं येथपासून स्वदेशाच्या सीमेवरील आक्रमकांशीं गुळमुळीत-पणानें वागावें कीं त्यांना जमेल त्या साधनांनीं जरब बसवावी, येथपर्यंत देशांतील सर्वच प्रश्न आपल्याला या देशांत नेमकें काय घडवावयाचें आहे, हें आपण अद्यापि न ठरविल्यामुळें लळतलोंबत राहिलेले आहेत. 'भाकरी कां करपली? घोडा कां अडला? आणि पानें कां कुजलीं?' या तिन्ही प्रश्नांचें उत्तर जसें एकच – 'न फिरविल्यामुळें !'; तसेंच आपल्या सर्व राष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक कसल्याहि प्रश्नांचें उत्तर एकच – 'न ठरविल्यामुळें !'

अद्यापि हें जें ठरविलें गेलें नाहीं तें 'ठरविण्यासाठीं' किंबहुना अधिक नेमकें सांगावयाचें तर तें ठरविण्यास उद्युक्त करण्यासाठीं महान् विराट राष्ट्रीय प्रयत्न व्हावयास हवा आहे.

नव्या पिढीवर प्रयत्नपूर्वक व विशिष्ट असे संस्कार घडविल्या-शिवाय या राष्ट्राचा तरणोपाय नाहीं, हें आतां प्रत्येक विचारी माणसाला पटूं लागलें आहे. मुलांवरील संस्कार हा अत्यंत महत्त्वाचा राष्ट्रीय प्रश्न आहे, या जाणिवेनेंच जे त्या उद्योगाला उद्युक्त झाले त्यांना त्यांतून एक समाधानाची गोष्ट आढळून आली – समाजांत या गोष्टीसंबंधीं मोठी जिज्ञासा आहे; यांतून कांहीं तरी मार्ग निघायला हवा, याची जाणीव आहे. 'निधर्मी'पणानें या देशाला सुख-स्वास्थ्य लाभणार नाहीं, किंबहुना हें 'निधर्मी' धोरण असेंच पुढें चालू राहिलें तर भारताला स्वाभिमानी, तेजस्वी राष्ट्रीय जीवन लाभण्याची शक्यता नाहीं, हें समाजांतल्या शुद्ध राष्ट्रीय विचार करणाऱ्या सामान्य माणसालाहि कळून चुकलें आहे, असें दृष्टोत्पत्तीस येत आहे.

पण हें ठरविण्याचें काम 'नेते' करूं शकणार नाहींत; निदान सध्यांचे नेते तरी करूं शकणार नाहींत. राष्ट्रांतील सर्वसामान्य माणसांनींच

आतां हें ठरविलें पाहिजे. 'नेते' आज आहेत; उद्यां नसतील – नेते म्हणून तरी नसतील. पण सर्वसामान्यांचा हा समाज कायम टिकणारा आहे. व्यक्ति-स्वार्थ, गट-स्वार्थ, पक्ष-स्वार्थ यांत रमलेल्यांकडून अथवा नेमकी राष्ट्रीय व्यावहारिक स्वार्थाला तिलांजलि देऊन काल्पनिक तात्त्विक जागतिक स्वार्थाच्या मागें लागलेल्यांकडूनहि या राष्ट्राचें तेजस्वी भवितव्य घडविण्याची आशा या देशांतील सर्वसामान्य विचारी माणसाला तरी सुतराम् दिसत नाहीं. त्यामुळें या देशांतल्या सर्वसामान्य राष्ट्रिकांनींच या राष्ट्राच्या भवितव्याची चिंता वाहण्याची गरज आज निश्चितपणें उत्पन्न झाली आहे. लोकशाहीच्या दृष्टीनें हेच सर्वसामान्य राष्ट्रिक म्हणजे खरें राष्ट्र आहे; तेच त्याचे धनी आहेत, अधिकारी आहेत. आणि म्हणूनच त्याला जबाबदारहि आहेत.

या सर्वसामान्य राष्ट्रिकांच्या मनांत आपल्या या राष्ट्रांत नेमकें काय घडवावयाचें आहे याचा वर उल्लेख केलेला विचार जागा व्हावा, जागावा; आणि त्यांतून उच्चार-आचाराची परंपरा यथाकाल निर्माण व्हावी अशी इच्छा आहे. कारण एखाद्या प्रश्नासंबंधीं विचार उत्पन्न होणें, एखाद्या धोक्यासंबंधीं – संकटासंबंधीं जाणीव उत्पन्न होणें हीहि महत्त्वाची वाट आचाराकडे जात असते; जाणिवेंतूनच त्याबाबतची इच्छा व कृतीहि उत्पन्न होत असते. तेव्हां पुढच्या भविष्यकाळांत – दूरच्या का होईना – प्राप्त होणाऱ्या भारतीय संस्कृतिमातेच्या कृपाप्रसादाचीं व त्यांतून उत्पन्न होणाऱ्या तेजस्वी, समृद्ध व शिवसुंदर अशा राष्ट्रीय जीवनफळाचीं हीं प्रसादचिन्हेंच समजावयास हरकत नाहीं.

ऑक्टोबर १९६०

■ ■ ■

## देशभक्तीचे संस्कार हवेत

झाड कांहीं एका दिवसांत वाढलेलें कधीं दिसत नाहीं. सुबक मूर्ति अकस्मात् घडून समोर दिसूं लागली असें कधीं होत नाहीं. घर बांधायला सकाळीं सुरुवात केली नि संध्याकाळीं घर तयार झालें, असें केव्हां आढळत नाहीं. लहान मूल आपोआप वाढून एकदम लहानाचें मोठें माणूस होतें, असेंहि म्हणतां येत नाहीं. देशभक्ताची घडणसुद्धां अशीच झटपट कधीं होत नसते.

देशभक्ति हा जन्मजात गुण असावा अशी परिस्थिति आपल्या-कडे अजूनपर्यंत तरी नाहीं. तसें असतें तर आपल्या या दुर्दैवी देशाचा इतिहास फार वेगळा घडलेला आपल्याला दिसला असता. तसें असतें तर आज अवघड प्रश्न म्हणून वाटणाऱ्या किती तरी गोष्टी या देशांत कधीं घडत्याच ना. तसें असतें तर कदाचित् जागतिक इतिहासाला निराळें वळण लावण्याचें खरेंखुरें ( नुसतें शाब्दिक नव्हे ! ) सामर्थ्य आपल्या ठिकाणीं अवश्य रहातें. पण प्रत्यक्षांत परिस्थिति याहून अगदीं वेगळी आहे. एखाद्याच्या देशभक्तीचा गौरव करण्याची गरज आपल्याला भासते. त्यासाठीं त्याला तनखा देण्याची मागणी होते. यावरूनच देश-भक्ति ही चीज या देशांत दुर्भिळ आहे, या देशांत देशभक्ति ही कांहीं तरी अलौकिक गोष्ट आहे असेंच सिद्ध होत नाहीं काय ?

याचाच अर्थ असा कीं, या राष्ट्राच्या प्रत्येक राष्ट्रघटकाच्या ठिकाणीं देशभक्ति उत्पन्न करण्यासाठीं प्रयत्न करणें आवश्यक आहे पूर्वींहि होतेंच. आणि ही देशभक्ति नुसती निष्क्रिय किंवा बोलघेवडी नव्हे तर क्रियावान्, प्रत्यक्ष राष्ट्रोद्धारासाठीं तनमनधनानें झटणारी अशी पाहिजे आहे.

राष्ट्रांत जेव्हां एखादी राष्ट्रीय चळवळ सुरू होते तेव्हां साह-जिकच त्या चळवळीचे पुढारी त्यासाठीं प्रचार करतात. त्या प्रचाराच

परिणाम म्हणून देशांतील कित्येक लहान-थोर घटक त्या चळवळींत सामील होतात. त्यामुळें ती चळवळ कांहीं प्रमाणांत कांहीं काळ यशस्वीहि झाल्यासारखी दिसते. परंतु एकंदर राष्ट्राच्या प्रदीर्घ इतिहासाचा, अखंड राष्ट्रीय जीवनाचा विचार केला तर अशी एखादी चळवळ आणि तिनें उत्पन्न केलेली खळबळ ही अळवावरच्या पाण्यासारखी वाटते. संपूर्ण राष्ट्रीय विचारसागरांत कित्येकदां ती 'दर्यामें खसखस' ठरते ! अर्थात् अशा लहान-मोठ्या चळवळींचेहि कांहीं बरे-वाईट गुण असतातच; आणि ते राष्ट्राच्या घडणीवर अल्प-अधिक प्रमाणांत तरी बरे-वाईट परिणाम केल्यावांचून रहातहि नाहींत. परंतु राष्ट्रामध्यें एक सलग, अखंड, चिरंतन व स्वाभाविक राष्ट्रीय चैतन्य फुलविण्यास अशा चळवळी समर्थ ठरलेल्या नाहींत. विशिष्ट जखमेसाठीं विशिष्ट मलमपट्टी करण्यापलीकडे या चळवळींचा कांहीं उपयोग होऊं शकलेला नाहीं.

हा देश माझा आहे, हा धर्म माझा आहे, ही संस्कृति माझी आहे; आणि या धर्म-संस्कृति – भू-प्रदेशांनीं बनणारा जो माझा देश त्याच्या सन्मानासाठीं, स्वातंत्र्यासाठीं नि गौरवासाठीं सदैव जागरूक नि कटिबद्ध रहाणें हें माझें कर्तव्य आहे, अशी जाणीव ज्या अंतःकरणांत सदैव जागी असते तोच खरा देशभक्त. त्याचें वागणें हेंच खरें देशभक्तीचें. पण असा देशभक्त एका दिवसांत जादूच्या झाडाप्रमाणें कांहीं उत्पन्न होत नाहीं. त्यासाठीं सतत व दीर्घकाळ तीव्र संस्कारांची गरज असते.

मार्च १९६१

■ ■ ■

## नव्या वर्षाचें स्वागत

शके १८८१ संपून शके १८८२ हें आपलें नवें वर्ष आतां सुरू होईल. आपल्या वर्षाला आपण शक म्हणतों. या शकाचा आरंभ चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे चैत्र महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यांतील पहिल्या दिवशीं होत असतो. यालाच वर्षप्रतिपदा किंवा गुढीपाडवा असें म्हणतात. इसवी सन किंवा ख्रिश्चन शक अथवा ख्रिस्ताब्द याचें नवें वर्ष सुरू होतें तो दिवस १ जानेवारी हें आपणां सर्वांना माहीत असतें. त्या दिवशीं वृत्तपत्रांतून 'नव्या वर्षाचा संदेश आणि स्वागत' प्रसिद्ध होत असतें. कांहीं आपल्याला विशेष सुधारलेले समजणाऱ्या मंडळींत त्या दिवशीं 'नव्या वर्षाच्या शुभेच्छा' प्रगट करण्याचीहि प्रथा पडली आहे.

परंतु आपलें खरें नवें वर्ष सुरू होत असतांना यांपैकीं कसलाहि प्रकार घडतांना फारसा दिसत नाहीं. याचें मुख्य कारण त्या मंडळींना आपलें नवें वर्ष खरें केव्हां सुरू होतें याची जाणीवच नसते.

आपलें काय हें समजून त्यासंबंधीं आदर, अभिमान बाळगणें हें प्रत्येक देशाच्या नागरिकांकडून अपेक्षित असतें. अर्थात् याचा अर्थ तो नागरिक, जें आपलें नव्हे आणि जें दुसऱ्याचें आहे त्याचा द्वेषच करीत असतो, असा मुळींच नव्हे. द्वेष करावा असें आपण तर कधींच सांगत नाहीं. आपण १९४७ सालापूर्वी कित्येक वर्षें इंग्रजांच्या गुलामगिरींत होतों. त्यांनीं आपल्या सर्व गोष्टी आम्हांला शिकवल्या आणि कांहीं तर आमच्यावर लादल्या. त्या वेळीं त्या नाइलाजानें आपण स्वीकारल्या.

परंतु आतां इंग्रजांची गुलामगिरी संपून, पारतंत्र्य नाहींसें होऊन आपण स्वतंत्र झालों; त्यालाहि आतां बारा वर्षें उलटून गेलीं. तरीहि इंग्रजांनीं लादलेल्या त्यांच्या परक्या गोष्टी आपण अजून आपल्या उराशीं बाळगून बसलों आहोंत.

१ जानेवारी हाच आपला वर्षारंभ असें आपण धरून चालतों. आमच्या शाळांना नाताळ म्हणजे जो ख्रिस्ती सण परदेशांत फार मोठ्या प्रमाणावर साजरा होतो त्याचीच लांबलचक सुटी मिळते. इंग्रजांचा क्रिकेट हाच जणुं आमचा राष्ट्रीय खेळ आहे, अशा भावनेनें आपण त्यासाठीं वेडे होतों. एखाद्या समारंभासाठीं जावयाचें असलें किंवा शाळेंत एखाद्या बाबतींत प्रावीण्य मिळाल्यानें आपलें छायाचित्र काढावयाचें असलें कीं, गळपट्टा – 'नेकटाय' घालून जाण्याचा मोह आपल्याला होतो. पारितोषिक स्वीकारतांना आपण नमस्कार करण्याऐवजीं मोठ्या माणसासमोरहि बिनदिक्कत हस्तांदोलनासाठीं हात पुढें करतों.

अशा आणखी किती तरी गोष्टींची यादी देतां येईल. परंतु थोडक्यांत सांगावयाचें तर आपल्या मनावरचा इंग्रजी पगडा अद्यापि गेलेला नाहीं. इंग्रजांचें राज्य गेलें असलें तरी मनानें आपण अद्यापि त्यांच्याच अमलाखालीं वावरतों आहोंत. हें कांहीं स्वतंत्र देशाच्या नागरिकत्वाचें लक्षण खासच नव्हे ! हा शुद्ध आंधळेपणा आहे. ही निव्वळ गुलामगिरी आहे.

मोठीं – वयानें – माणसें कशीं वागतात हें तुम्ही या बाबतींत न पाहिलेंत तरी चालेल. तुमच्या तुम्हांला अनेक गोष्टी शिकल्या, केल्या पाहिजेत; आग्रहानें घडविल्याहि पाहिजेत.

नाताळचा ख्रिस्ती सण कसा आला, त्या वेळीं काय करतात हें तुमच्यापैकीं पुष्कळांनाच माहीत असेल. कारण तें तुमच्या क्रमिक पुस्तकांत आतां आग्रहानें दिलेलें असतें. परंतु तुमचें खरें नवें वर्ष केव्हां सुरू होतें ? याला शक कां म्हणतात ? ज्याच्या नांवानें हा शक सुरू झाला तो शालिवाहन केवढा पराक्रमी होता ! त्याची हकीगत किती स्फूर्तिदायक आहे ! आपण पाडव्याला गुढी कां उभारतों ? या गोष्टी तुमच्यापैकीं किती जणांना माहीत आहेत ?

वर आपला जो आंधळेपणा सांगितला, जी गुलामगिरी वर्णन केली, जें अज्ञान दाखविलें, त्या सर्वांचें कारण एकच – स्वाभिमानाचा

अभाव. या स्वाभिमानांतूनच छत्रपति श्रीशिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याची इच्छा झाली. या स्वाभिमानांतूनच लोकमान्य टिळकांना स्वराज्य मिळविण्याची धडपड करावीशी वाटली. या स्वाभिमानांतूनच गांधीजींनीं आणि इतरांनीं स्वातंत्र्य मिळविलें. आणि हा स्वाभिमान असेल तरच स्वराज्य, स्वातंत्र्य टिकतें, तेजस्वी होतें. पक्कें रहातें. माणूस स्वाभिमानी असला पाहिजे, हें जितकें खरें तितकेंच किंबहुना त्याहूनहि अधिक, राष्ट्रांतील नागरिकांनीं आपल्या राष्ट्रीय स्वाभिमानाबद्दल जागरूक रहाणें आवश्यक आहे. लक्षांत ठेवा कीं, बूड नसलेलें भांडें कधींहि उभें रहात नाहीं; तसेंच स्वाभिमानाचें बूड गमावलेलें राष्ट्र कधींहि तेजस्वीपणानें आणि समर्थपणानें जगांत उभें राहूं शकत नाहीं.

मार्च १९६० [ संदर्भ : गुडीपाडवा ]

■ ■ ■

## राष्ट्रीय बैठक पक्की हवी

रशियाचा मेजर गागारिन अंतराळांत जाऊन आला. पृथ्वीप्रदक्षिणा करून आला. त्याचा सर्वत्र जयजयकार झाला. आपल्या देशांत तो अजूनहि चालू आहे.

त्यानंतर अमेरिकेचा शेपर्ड आकाशांत उड्डाण करून आला. थोड्याबहुत प्रमाणांत जगांत त्याचाहि जयजयकार झाला. आपल्या देशांत अर्थातच तो चालू आहे.

माणसानें केलेल्या कोणत्याहि चांगल्या गोष्टीचा गौरव आपण अवश्य करायला हवा. त्याबद्दल त्या माणसाची पाठ जरूर थोपटायला हवी. पण त्याबरोबरच जणुं कांहीं आपणहि कृतकृत्य झालों, अशा वेडगळ समजुतींत नि बावळट समाधानांत आपण रहातां कामा नये.

गागारिन म्हणाला, "माझा पक्ष व सरकार जी कोणतीहि कामगिरी मजवर सोंपवील ती पार पाडण्यास म'ी सज्ज आहें. अंतराळचा भेद करण्याचा पहिला मान माझ्या मातृभूमीनें मिळविला याचा आनंद मला अपार आहे."

शेपर्ड म्हणाला, "मी माझ्या देशाची सेवा करण्यास तयार आहें."

हें अगदीं खरें आहे कीं, साऱ्या माणसांनीं सबंध जगावर प्रेम केलें पाहिजे. आपल्या ऋषि-मुनींनीं आणि साधु-संतांनीं तेंच सांगितलें : 'वसुधैव कुटुंबकम्'; 'अवघें विश्वाचि माझें घर.' पण हा थोरामोठ्यांच उपदेश आहे; सामान्यांचा व्यवहार नव्हे. गागारिनचा जयजयकार करतांना किंवा शेपर्डची पाठथोपटणी करतांना आपण जणुं स्वतःच कांहीं अघटित घडविलें आहे असा आव आणतों. पण ही निव्वळ फसवणूक आहे – स्वतःची फसवणूक आहे; आणि ती अत्यंत घातक आहे.

ज्याला आपल्या आईबद्दलचें प्रेम नाहीं, तो आपल्या मातृभूमीवर कसलें प्रेम करणार ? आणि जो आपल्या मातृभूमीच्या प्रेमानें अथांग भरलेला नाहीं त्यानें आपण जगावर प्रेम करतों असें म्हणणें हें निव्वळ हास्यास्पद आहे !

गागारिनच्या पृथ्वीप्रदक्षिणेमागें रशियाची आणि शेपर्डच्या अंतराळ उड्डाणामागें अमेरिकेची केवढी तपश्चर्या उभी आहे ! ही तपश्चर्या काय केवळ त्यांनीं जगावर उपकार करण्यासाठीं केली ? अब्जावधि रुपये, हजारों माणसांचे परिश्रम आणि अनेक वर्षांचा काळ खर्ची घातला तो काय तुमचें-आमचें कल्याण घडवून आणायचें होतें म्हणून ? आणि या सर्व खटाटोपाच्या बुडाशीं राष्ट्रीय स्वाभिमानाची प्रखर ज्योत नसती तर ? – तर हें सर्व घडूं शकलें असतें काय ? 'नसतें' असें याचें परखड उत्तर आहे.

१२ : किशोर मित्रांनो !

भारताचे महामंत्री पं. जवाहरलाल नेहरू हे तर प्रख्यात आंतरराष्ट्रीयवादी आहेत हें नव्यानें सांगायला नको. पण त्यांनींहि ( पुणें विद्यापीठ : १४–५–६१ ) एका भाषणांत स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, " राष्ट्रीय वृत्तीचा स्वीकार करणें याचाच अर्थ आंतरराष्ट्रीय व्यापक दृष्टिकोन स्वीकारणें. **पण आंतरराष्ट्रीयत्व स्वीकारणें म्हणजे राष्ट्रीयत्व विसरणें असा याचा अर्थ नव्हे !** "

स्वाराची घोड्यावरची मांड पक्की असेल तर त्याला घोडा कोठेंहि घालतां येतो. पण ती मांड पक्की नसेल तर मात्र भरधांव जातांना घोडा स्वाराला कधीं कोठें फेंकून देईल याचा नेम नसतो !

जून १९६१ [ संदर्भ : गागारिनचें अवकाशभ्रमण ]

■ ■ ■

## ' स्वातंत्र्याचे अम्ही शिपाई '

आपण स्वतंत्र झालों, आपल्या देशांत पुन्हां स्वराज्य आलें – त्याला आतां तेरा वर्षें होत आलीं. १९४७ मधील १५ ऑगस्ट या दिवशीं भारत स्वतंत्र झाला; त्यानंतर एक तप उलटून गेलें.

त्या वेळीं तुमच्यापैकीं अनेकजण मराठी पहिली-दुसरींत शिकत होते. ते आतां मॅट्रिक होऊन महाविद्यालयांतहि दाखल झाले. आणि त्या काळीं अठरा-वीस वर्षांचे कॉलेजांत – महाविद्यालयांत शिकणारे तरुण मुलगे होते, ते आज मोठे पुरुष होऊन त्यांचीं मुलें खेळूं लागलीं.

म्हणजे केवढा थोरला काळ होऊन गेला बघा ! या मोठ्या थोरल्या काळाची जेव्हां जाणीव होते, तेव्हां मन मोठें खट्टू होतें. कशाची तरी रुखरुख लागून रहाते.

— वाटतें कीं, आपण स्वतंत्र झालों खरे, पण आपलीं मनें ? — तीं खरोखरींच स्वतंत्र झालीं काय ?

या प्रश्नाचें उत्तर मन अस्वस्थ करणारें असतें. मोठी काळजी उत्पन्न करणारें असतें.

अजून आपल्या देशाचा कारभार राष्ट्रभाषेंतून चालत नाहीं. अजून आपल्या देशांतील लोक आपल्याच सरकारचे कर चुकवतात. अजून आपल्या देशाच्या सीमेवर दुसरीं राष्ट्रें हल्ले करतात आणि आपले प्रदेश दांडगाईनें बळकावतात.

पण हे मोठ्यांचे प्रश्न झाले. ह्या राजकारणाच्या बाबी झाल्या.

आपण सध्यां केवळ तुमच्यापुरतें, मुलांच्यापुरतें, कुमारांच्यापुरतें पाहूं. तिथें तरी काय दिसतें ? तुम्ही तुमची शाळेंतली शिस्त अद्यापि पाळीत नाहीं. प्रार्थना किंवा राष्ट्रगीत चालू असतांना गडबड करतां; इतकेंच नव्हे तर शिस्तींत उभें रहाणारांची टिंगलहि करतां. तुम्हां सगळ्यांना तुमचें सारें राष्ट्रगीतहि अद्यापि पाठ येत नाहीं.

या तर किती साध्या, प्राथमिक गोष्टी आहेत ! स्वतंत्र राष्ट्रांतल्या, खरोखरी स्वतंत्र असलेल्या राष्ट्रांतलीं मुलें कशीं वागतात, तुम्हांला माहीत आहे का ? हो, तीं तुमच्यासारखींच खोडकर असतात, व्रात्य असतात. अगदीं खरें आहे तें !

पण, तीं आपापल्या राष्ट्राचीं मुलें असतात, ह्याबद्दलची त्यांची जाणीव सदा जागी असते. त्यांच्या खोड्या, त्यांचा दंगा राष्ट्रगीत सुरू होतांच जागच्या जागीं थांबतात. देशाचा आदर कसा राखायचा हें त्यांना लहानपणापासून माहीत असतें. आणि त्याप्रमाणें तीं वागत असतात. आपल्या राष्ट्राबद्दल, आपल्या राष्ट्रध्वजाबद्दल, आपल्या राष्ट्रगीताबद्दलचा आदर तीं मुलें आपल्या वागणुकींत प्रत्यक्ष दाखवीत असतात.

तुम्ही म्हणाल, ' आम्हांला तसें कोणी शिकवीत नाहीं. ' — तसें पाहिलें तर तुमची ही तक्रार तितकीशी बरोबर नाहीं; ती अगदीं

पुरी पटतहि नाहीं. तरी पण धरून चालू कीं, ही तुमची तक्रार खरी आहे.

पण, सगळ्या गोष्टी शिकवाव्याच लागतात का? कांहीं गोष्टी वाचून, पाहून नि समजून घेतां येत नाहींत का?

आपल्या देशाच्या पंतप्रधानांनीं – पं. नेहरूंनीं एकदां भाषण करतांना म्हटलें होतें : "तुम्ही उद्यांचे नेते आहांत. भारतासारख्या वाढत्या राष्ट्राची जबाबदारी आणि भार तुम्हांला यशस्वीपणें वाहावयाचा असेल तर प्रथम **तुम्ही स्वतःला शिस्त लावून घेतली पाहिजे.**" (गोहत्ती, १७ जुलै).

तुम्ही आपल्या मनाला असा एकच प्रश्न विचारा – 'माझ्या देशाचा सुपुत्र म्हणवून घेण्यासारखी माझी वागणूक आहे का?'

वरील प्रश्नाचें उत्तर होकारार्थी देणारीं मुलें तुमच्यांत किती आहेत? ज्यांचें उत्तर नकारार्थी असेल – आणि असेच बहुसंख्य असतील – त्यांना आपला देश स्वतंत्र झाला म्हणजे काय झालें, हें अजून समजलेंच नाहीं, असें मानावें लागेल.

तुम्ही, स्वदेशी वस्तूच्या वापरासाठीं मोठा त्याग करणारांच्या गोष्टी वाचतां. स्वदेशाच्या मानासाठीं स्वतःचे प्राणहि अर्पण करणारांचीं चरित्रें पहातां. स्वदेशाच्या राष्ट्रगीताकरितां उघड्या अंगावर फटके खाणारांचे गोडवे गातां. – हें सारें मग कशासाठीं? काय पुस्तकांत वाचून फक्त पुस्तकांतच ठेवून देण्यासाठीं?

तुमचें वागणें, बोलणें, रहाणें – सारें सारें भारतीय मुलाला साजेसें असलें पाहिजे; भारत देशाच्या स्वाभिमानाला शोभणारें ठरलें पाहिजे. कारण, आजचीं तुम्ही मुलें उद्यांचे नागरिक आहांत. आजचे तुम्ही बाल नि कुमार उद्यांचे तरुण आहांत. आज तुम्ही गमतीचीं गाणीं म्हणत असलांत तरी उद्यां तुम्हांला म्हणावयाचें आहे नि ठरवावयाचें आहे कीं –

'स्वातंत्र्याचे अम्ही शिपाई !' कारण, स्वदेशाच्या स्वातंत्र्य-रक्षणाची कामगिरी तुमच्यावरच येऊन पडणार आहे.

ऑगस्ट १९६० [ संदर्भ : तेरावा स्वातंत्र्यदिन ]

■ ■ ■

## आपण मोठे भाग्यवान् आहोंत !

या महिन्यांत एक फार मोठी घटना घडणार आहे. ती घटना आपल्याला पहावयास मिळत आहे याबद्दल आपण स्वतःला मोठे भाग्यवान् समजलें पाहिजे.

या घटनेचें महत्त्व फार मोठें आहे. १९४७ सालीं आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळालें, आपलें स्वराज्य झालें. त्याबद्दल आपल्याला केवढा आनंद झाला ! त्याच्या खालोखाल या नव्या घटनेचें महत्त्व आहे.

ती घटना म्हणजे या महिन्यांत 'महाराष्ट्र राज्य' स्थापन होत आहे. मराठी भाषा बोलणारांच्या प्रदेशाचें हें राज्य आहे. स्वतःला महाराष्ट्रीय म्हणविणाऱ्या लोकांचें हें राज्य आहे. वास्तविक तें यापूर्वी केव्हांच स्थापन व्हावयास हवें होतें. कारण भारतांत अशीं एकेक भाषा बोलणारांचीं वेगवेगळीं राज्यें पूर्वीच स्थापन झालीं आहेत. महाराष्ट्राचें राज्यहि वास्तविक तसेंच अस्तित्वांत यावयाचें. परंतु राजकारणांतल्या कांहीं अनिष्ट गोष्टींमुळें तें तसें घडूं शकलें नाहीं. आजहि जें घडत आहे त्यासाठीं फार किंमत मराठी माणसांना द्यावी लागलेली आहे.

*

या भावी घटनेवरून एका जुन्या भव्य-दिव्य अशा प्रसंगाची आठवण आपल्याला होणें अगदीं साहजिक आहे. कोणती ती घटना ?

सुमारें तीनशें वर्षांपूर्वी रायगडावर हिंदवी स्वराज्याची संस्थापना झाली. अखिल भारतवर्षांत भारतीयांचें स्वराज्य स्थापन करण्याच्या प्रयत्नांची ही परिणति होती. परदेशांतून आलेल्या, परधर्माच्या, परसंस्कृतीच्या लोकांनीं आपल्यावर लादलेलें पारतंत्र्य झुगारून देण्याचा लढा यशस्वी झाल्याची ती निशाणी होती. या हिंदुस्थान देशाला, या भारताला आपली मातृभूमि, पूण्यभूमि आणि कर्मभूमि मानणारांचें राज्य येथें असावें असा तो खटाटोप होता. आणि तें स्वप्न साकार झाल्याचें दृश्य रायगडावर श्रीशिवाजी महाराजांना 'छत्रपति' म्हणून राज्याभिषेक झाला तेव्हां दिसलें. श्रीशिवछत्रपति हे भारतीयांच्या तत्कालीन स्वराज्याचे प्रतिनिधि होते. भारतांत कांहीं विशिष्ट भूप्रदेशापुरतें का होईना, खरेंखुरें स्वराज्य प्रस्थापित झाल्याची शिवराज्याभिषेक ही खूण होती.

श्रीशिवाजी महाराजांनीं चालविलेला उद्योग ' हिंदवी स्वराज्या 'चा होता; केवळ ' मराठ्यांची दौलत ' उत्पन्न करण्याचा नव्हता. तो इतिहास यानिमित्तानें नीट वाचा, समजून घ्या. म्हणजे मग महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्याचा अभिमान आणि आनंद कां मानायचा हें कळेल. तसेंच महाराष्ट्र राज्य हें भारतीय स्वराज्याचें एक अभिन्न व अभेद्य अंग कसें आहे तेंहि तुम्हांला समजून येईल. जे हिंदु आहेत त्यांनीं स्वतःला हिंदु म्हणवून घेण्यांत जसा कोणताहि राष्ट्रीय कमीपणा नाहीं, अपराध नाहीं; तसेच आपण जे महाराष्ट्रीय आहोंत त्यांनीं स्वतःला महाराष्ट्रीय म्हणवून घेण्यांत खंत बाळगण्याचें कारण नाहीं. आपण भारताचे सुपुत्र आहोंत, तसेंच महाराष्ट्रभूमीचेहि सुपुत्र आहोंत. या भावना परस्परांशीं विसंगत नाहींत. आपल्या आईवर प्रेम करणारा मुलगा आपल्या वडिलांवरहि प्रेम करतो; तसेंच महाराष्ट्रभूमीवर प्रेम करणारा महाराष्ट्रीय हा भारतभूमीवर तितकेंच प्रेम करूं शकतो; नव्हे त्यानें केलेंच पाहिजे, तरच तो महाराष्ट्राचा खरा आदर्श सुपुत्र होऊं शकेल.

गेल्या तीनशें वर्षांच्या इतिहासांतहि या महाराष्ट्रभूचीं अनेक शकलें झालीं. तत्पूर्वींहि तीं झालेलीं होतींच. त्याचा बराच मोठा भाग या नव्या घटनेनें सांधला जात आहे. गोव्यासारखा प्रदेश अद्यापि आपल्या या नव्या महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट झालेला नाहीं, याची दुःखपूर्ण जाणीव या वेळीं आणि पुढेंहि आपल्या मनांत सदैव जागती राहिली पाहिजे. कारण तें राष्ट्रीय शल्य आपल्यालाच कधीं तरी उपसून काढून टाकावें लागणार आहे.

'मराठी असे आमुची मायबोली,' असें या महाराष्ट्र राज्याला आतां सार्थपणें म्हणतां येईल. आपल्या या राज्याचा कारभार मराठी भाषेंतूनच प्रामुख्यानें चालेल. आणि 'महाराष्ट्र राज्य' करण्याचा श्रीसमर्थ रामदासस्वामींचा संकल्प अशा रीतीनें सफळ होत असलेला पाहून आपलीं अंतःकरणें आनंदानें व अभिमानानें फुलून येतील. हा सोहळा प्रत्यक्ष आपणांसमोर घडत असल्यामुळें आपण खरोखरीच मोठे भाग्यवान् आहोंत यांत संशय नाहीं.

[ संदर्भ : महाराष्ट्र राज्यसंस्थापना ]

■ ■ ■

## जें घडवायचें तें या परंपरेला शोभण्यासारखें

आपली सर्वांचीं अंतःकरणें आज आनंदानें नुसतीं फुलून गेलीं आहेत. आपल्या उत्साहाला अक्षरशः उधाण आलें आहे.

आणि हें अगदीं साहजिक आहे. कारण जें मिळवावें म्हणून आपण गेलीं कित्येक वर्षें झगडत होतों तें आज आपल्या पदरांत पडलें आहे. त्याबद्दल आपल्याला आनंद होणें रास्त आहे; आणि तो असाप असणेंहि अगदीं सहज आहे.

तथापि नेमक्या अशाच वेळीं आणखी एका जाणिवेनें आपल्या मनाला जागृत ठेवण्याची गरज आहे. हिंदींत एक म्हण आहे – ' घी देखा लेकिन बडगा नहीं देखा । ' त्याचा भावार्थ – लाभ दिसला, पण त्याच्याबरोबर येणाऱ्या अडचणी तुम्ही पाहिल्या नाहींत; किंवा अधिक स्पष्ट म्हणजे अधिकार नि स्वातंत्र्य मिळालें, पण त्यांतून येणाऱ्या जबाबदाऱ्या आणि त्यामुळें शिरावर येऊन पडणारी अवघड कामगिरी चटकन् लक्षांत आली नाहीं.

असें आपलें होऊं नये अशी आपणांतील सर्व जाणत्यांची, जबाबदारी ओळखणारांची इच्छा आहे. या महाराष्ट्र राज्य-स्थापनेनिमित्त अनेक लहानथोरांचीं भापणें झालीं; अनेकांनीं लेख लिहिले. प्रत्येकानें एक गोष्ट न विसरतां नमूद केली आहे. भविष्यकाळांत या महाराष्ट्रावर फार मोठी जोखीम पडणार जाहे. या अवघड जोखमीची फोड फारशी स्पष्टपणें कोणी केलेली आढळली नाहीं. तरी पण त्यांच्या मनांतली जाणीव अस्फुट अशी प्रगट झाली आहेच. आणि ही अवघड जोखीम विशेषेंकरून येऊन पडणार आहे ती नव्या, उगवत्या पिढीवर. आज कुमार-वयांत असलेल्या मुलांमुलींची जी पिढी पुढें मोठी होणार आहे तिच्यावरच ही अवघड जोखीम पार पाडण्याची जबाबदारी येऊन पडणार आहे.

ही जोखीम पार पाडण्यासाठीं विशुद्ध वैयक्तिक चारित्र्य आणि दृढ डोळस देशश्रद्धा यांची फार मोठी गरज आहे. या दोन्ही गोष्टी वयानें मोठें झाल्यावर एकदम कांहीं पदरांत येऊन पडत नाहींत. त्या लहान-पणापासूनच कमवाव्या, वाढवाव्या आणि जोपासाव्या लागतात. त्या दोहोंचा संगम, समन्वय म्हणजेच राष्ट्रीय चारित्र्य असें म्हणतां येईल. या दोहोंचा समन्वय आपल्या या महाराष्ट्रभूमींत ३०० वर्षांपूर्वींच झालेला आहे. त्याची तत्त्वप्रणालि तत्कालीन भाषेंत प्रथम प्रतिपादली ती श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं; आणि त्याचा व्यवहार घडविला तो श्रीशिवाजी महा-राजांनीं. कृष्णार्जुनापासून चालत आलेला तोच तो कर्मयोग. तोच

शिवसमर्थांनीं पुढें चालविला. टिळकांनीं त्यांचाच कित्ता गिरविला. आणि तोच वारसा खरा आपला आहे. त्याच मार्गानें आपल्याला जावयाचें आहे. म्हणून खरोखरी 'नवमहाराष्ट्र' किंवा 'महाराष्ट्र-संस्थापना' हे शब्द-प्रयोग बरोबर वाटत नाहींत; योग्य दिसत नाहींत. नवीन कांहीं झालें असेल तर तें महाराष्ट्र राज्य. महाराष्ट्र पूर्वीपासूनच आहे. त्याची संस्था-पना शेंकडों वर्षांपासूनच झाली आहे. त्याचें एक सलग राज्य पूर्वीं एकदां होतेंहि. आतां सुमारें तीनशें वर्षांनंतर तें राज्य पुन्हां प्रस्थापित होत आहे. हेंच विशेष.

जुन्या परंपरा विसरून नवा महाराष्ट्र उभा राहूं शकणार नाहीं. आणि नवें जें कांहीं घडावें असें आपणांतील थोरथोरांना वाटतें तें जुन्याच्या तोंडावळ्याचें आहे. याचाच अर्थ रामदासस्वामींसारखा समर्थ तत्त्वज्ञानी, शिवाजी महाराजांसारखा पुण्यप्रतापी लोकाग्रणी, लोकमान्यां-सारखा विशुद्ध चारित्र्याचा महापुरुष हे आमचे आदर्श असायला हवे आहेत. आणि तसें, निदान त्यांच्या परंपरेचा वारसा सांगतां येण्यासारखें आपल्याला कसें होतां येईल याची धडपड जाणत्या वयाच्या मुलांत प्रारंभापासूनच असायला हवी आहे.

मे १९६० [ संदर्भ : महाराष्ट्र राज्यस्थापना ]

■ ■ ■

## महाराष्ट्राच्या इतिहाससंबंधीं व्यापक अपेक्षा

'महाराष्ट्र', आणि 'इतिहास' या दोन्ही शब्दांना मोठा अर्थ आहे; या दोन्ही शब्दांमागें फार मोठा इतिहास आहे.

या इतिहासाचीं वैशिष्ट्येंहि दोन सांगतां येतील. एक, या इतिहासांतील घटितें साऱ्या भारतावरील महान् संकटें निवारण्यासाठीं

किंवा थोपवून धरण्यासाठीं वडलेली आहेत. आणि दुसरें, या इतिहासामागें जें राजकारण आहे त्याला प्रत्यक्ष जीवनस्पर्शी व शाश्वत मानवी मूल्यांच्या तत्त्वज्ञानाची भक्कम बैठक आहे.

महाराष्ट्रांतील नवी, उगवती पिढी आमच्या या खऱ्या, अखंड, तेजस्वी नि अतएव स्फूर्तिदायक इतिहासापासून वंचित राहूं नये असा आमचा आग्रह आहे. सरकारी पातळीवरून हें कांहीं कारणांमुळें सध्यां तरी होऊं शकत नसेल तर निदान संस्थाद्वारां व व्यक्तिद्वारां तरी यासाठीं पद्धतशीर आणि प्रबळ प्रयत्न झाला पाहिजे. कारण, पारमार्थिक जीवनाच्या घडणींत आत्मज्ञानाला जें महत्त्व तेंच महत्त्व राष्ट्राच्या, राष्ट्रीय पिढीच्या ऐहिक जीवनाच्या घडणींत इतिहासाला असतें, हें विसरून चालणार नाहीं. आजवर सरकारकडून व त्याला बऱ्यावाईट रीतीनें तसें करावयास प्रवृत्त करणाऱ्या 'तज्ज्ञां'कडून नि 'विचारवंतां'कडून हेतुतः वा अजाणता या इतिहास-शिक्षणाची जी हेडसांड झाली व चालली आहे तिला आळा बसलाच पाहिजे. त्या दृष्टीनें संस्था, संघटना, चळवळी ज्या उभारल्या जातील त्या जाणें आवश्यकच आहे. तसा सामुदायिक व संघटित प्रयत्न, या बाबतींत होईल तेव्हां होवो; परंतु तेवढ्यासाठीं थांबण्याचें किंवा अडून रहाण्याचें कारण नाहीं. आपापल्या घरांत आणि शाळेंतहि पालक शिक्षकांनीं मनांत आणलें तर मुलांना—विद्यार्थ्यांना खऱ्याखुऱ्या इतिहासाचें खरेंखुरें शिक्षण देणें अशक्य नाहीं. तसा मनापासून प्रयत्न हवा. यांतहि एक अडचण आम्हांला दिसते ती अशी कीं, शालेय शिक्षणक्रमाच्या जखडबंदींतून मुक्त असें महाराष्ट्राच्या किंवा भारताच्या इतिहासाचें सुटसुटीत पुस्तकच मराठींत उपलब्ध नाहीं. पण तरीहि न खोळंबतां असतील त्या पुस्तकांनिशीं हें शिक्षण चालू ठेवलेंच पाहिजे.

[ संदर्भ : महाराष्ट्र राज्य वर्धापन दिन ]

■ ■ ■

१५९२०

## पानिपताचें स्मरण म्हणजे राष्ट्रीय स्फुरण

पानिपत ही युद्धभूमि आहे. येथें आजपर्यंत अनेक महत्त्वाच्या लढाया लढल्या गेल्या. त्यांनीं इतिहासाचा ओघ पालटविला. त्या लढाया क्रांतिकारक ठरल्या. त्यांतील सर्वांत अलीकडची लढाई म्हणजे इ. स. १७६१ ची. ही लढाई मराठे व अब्दाली यांच्यामध्यें झाली. याला ' पानिपतचें तिसरें किंवा शेवटचें युद्ध ' म्हणतात.

तशी पानिपतची युद्ध-परंपरा फार जुनी आहे. कौरव-पांडवांमधील प्रसिद्ध भारतीय युद्ध पानिपतापाशींच कुरुक्षेत्र येथें घडलें. त्याला सुमारें पांच हजार वर्षें होऊन गेलीं. त्यानंतर ऐतिहासिक काळांतील क्रांतिकारक असें पानिपतावरील युद्ध १९ एप्रिल १५२६ रोजीं झालें. त्या वेळीं दिल्लीच्या गादीवर इब्राहिमखान लोदी हा बादशहा होता. हिंदुस्थानांतील मोंगल साम्राज्याचा संस्थापक बाबर यानें इब्राहिमखानावर स्वारी करून पानिपतावर त्याचा पूर्ण पराभव केला आणि तेव्हांपासून हिंदुस्थानांत मोंगलांची सत्ता स्थिर झाली.

पानिपतचें दुसरें युद्ध इ. स. १५५६ सालीं झालें. बिहारच्या अफगाण सुलतानाचा वजीर हिमु आणि अल्पवयी अकबराला बरोबर घेऊन आलेला बहरामखान यांच्यामध्यें पानिपत येथें निकराची लढाई झाली. तींत हिमूचा पराभव होऊन दिल्ली अकबराच्या हातीं आली; आणि एकदां अस्तंगत झालेली मोंगल बादशाही पुन्हां दिल्लींत उदयाला आली.

त्यानंतरचें युद्ध १७६१ मधील. हें तिसरें युद्ध मराठे व अफगाणिस्तानचा शहा अहमदशहा अब्दाली यांच्यामध्यें घडून आलें. क्रूर व रानटी नादीरशहाचा अब्दाली हा मानसपुत्र एवढें सांगितलें तरी पुरे ! युद्धांत रणांगणावर मराठ्यांचा पराभव होऊन त्यांचें जवळ जवळ सर्व सैन्य ठार झालें हें खरें; परंतु त्याचबरोबर मराठ्यांनीं त्या रणांगणावर जें विलक्षण शौर्य प्रगट केलें त्यामुळें अब्दालीचीहि पराभवाइतकीच हानि

झाली; अखेर तो परत स्वदेशीं निघून गेला. आणि हिंदुस्थानावर येऊं पाहणाऱ्या एका रानटी सत्तेच्या संकटापासून हिंदुस्थान वांचला !

आपल्या हिंदु-भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणें शरीर नाहींसें झालें, शरीर धारण करणारा माणूस मेला तरी त्या देहांतील आत्मा मरत नाहीं. आत्मा हा सदा अविनाशी अमर असतो. जें व्यक्तीचें तेंच देशाचें – राष्ट्राचें. देशांतील, राष्ट्रांतील माणसें मरण पावलीं, नाहींशीं झालीं म्हणून देश मेला, राष्ट्र मेलें असें आपण कधीं म्हणत नाहीं आणि खरोखरी तसें घडतहि नाहीं. फक्त प्रश्न असतो तो हें मरण कसें आलें याचा. पूर्वी १७७० सालीं बंगाल प्रांतांत दुष्काळ पडला तेव्हां बंगालच्या लोकसंख्येपैकीं जवळ जवळ एकतृतीयांश लोक त्या दुष्काळांत 'अन्न' 'अन्न' करून मेले. त्यानंतर अलीकडे चालू शतकांत झालेल्या बंगाल्यांतील भयंकर दुष्काळांतहि पस्तीस लाख लोक खायला अन्न नाहीं म्हणून तडफडून मृत्युमुखीं पडले. हें जें देशांतील लोकांचें मरण आहे तें एक प्रकारचें. पण दुसऱ्या प्रकारचेंहि एक मरण असतें; जें १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत घडून आलें. तसेंच आपल्या अलीकडील स्वातंत्र्यलढ्यांतहि घडलें.

वरीलपैकीं, दुष्काळांत अन्नाच्या अभावीं आलेलें मरण हें दीनहीन मरण आहे. यानें देशाचें – राष्ट्राचें चैतन्य कधीं जागें होत नाहीं. आणि दुसऱ्या प्रकारचें जें मरण आहे तें वीरमरण असतें. यानें मात्र देशाचें चैतन्य प्रस्फुरित होतें, अधिक तेजस्वीपणानें चमकूं लागतें. बंगालच्या दुष्काळांत घडलें तें दीन-हीन मरण; तर पानिपतावर १७६१ झालीं घडून आलें तें वीरमरण; थोर मरण ! स्वदेशाची प्रतिष्ठा, स्वाभिमान राखण्यासाठीं आजपर्यंत जगांत हजारों लढाया झाल्या. त्यांत लाखों माणसें ठार झालीं. तीं माणसें मरून गेलीं; पण त्यांनीं आपल्या देशाची प्रतिष्ठा वाढविली, स्वाभिमान उजळविला, राष्ट्रीय चैतन्य कायम राखलें.

एखादी व्यक्ति आपल्या उच्च ध्येयासाठीं मरण पावली तर तिनें आत्मबलिदान केलें असें आपण म्हणतों; आणि त्या व्यक्तीचा गौरव

करतों. उलट केवळ परीक्षेंत उत्तीर्ण होतां आलें नाहीं म्हणून जीव देणाऱ्यानें आत्महत्या केली असें म्हणून त्याची आपण कींव करतों. जसा शीख बालवीर हकीकतराय – स्वधर्मपालनाठीं त्यानें मरण पत्करलें. तो हुतात्मा ठरला. त्यानें आपल्या मरणानेंच राष्ट्रीय जीवन उजळविलें. तीच गोष्ट पानिपतावर मराठ्यांनीं अपूर्व पराक्रम आणि अतुल शौर्य गाजवून धारातीर्थीं देह ठेविले याबद्दल म्हणतां येईल. मराठ्यांच्या त्या शौर्याचा नि पराक्रमाचा विजयी अब्दालीलाहि एवढा धसका बसला कीं, पुन्हां हिंदुस्थानाचें नांव काढण्याची हिंमत त्याला झाली नाहीं. मराठी माणसें मेलीं, पण मराठ्यांचें राष्ट्रीय चैतन्य जिवंतच राहिलें. आणि पुढें पानिपताचें अपयशहि सव्याज धुऊन निघालें !

पानिपताचें आज दोनशें वर्षांनीं पुन्हां स्मरण करावयाचें तें यासाठीं. आजहि दुर्दैवानें आपल्या देशावर परकीय आक्रमणाचें संकट आ वासून उभें आहे. त्या संकटाशीं दोन हात करतांना आपल्या राष्ट्रांतील माणसें मरतील म्हणून देशाचा स्वाभिमान, राष्ट्राची प्रतिष्ठा यांच्यावर पाणी सोडून केवळ माणसें वांचविण्याची निष्फळ खटपट करीत बसावयाचें काय ? अशा प्रश्नांचीं उत्तरें इतिहासच देऊं शकतों. कारण इतिहासांतूनच राष्ट्र घडत असतें. त्या इतिहासानें शिकविलेले तेजस्वी धडे आचरणांत आणणें याचाच अर्थ इतिहास शिकणें. पानिपतासारख्या प्रसंगाचें स्मरण म्हणजे राष्ट्रीय चैतन्याचें स्फुरण.

जानेवारी १९६१ [ संदर्भ : पानिपत स्मृति समारंभ ]

■ ■ ■

## हिमालयाचा संदेश

प्रिय भारतीय जनहो !

'वैदिक काळापासून हिमालय ही आमची – भारताची उत्तर सरसीमा आहे' हें सांगावयास तुमचे पंतप्रधान कशाला हवेत ? आजवर कोटि कोटि मुखांनीं 'आसेतुहिमाचल' ही तुमच्या प्रिय स्वदेशाची दक्षिण-उत्तर सीमा असल्याचें सततच उद्घोषिलेलें आहे. त्याचे निनाद माझ्या कानांवर येऊन लाखों वेळां आदळलेले आहेत. त्यांचा पडसाद माझ्या गिरिगव्हरांतून सहस्रों वेळां उमटलेला आहे.

आणि मला त्याबद्दल अभिमान आहे. तो मान रक्षिण्यासाठीं मी सदैव कटिबद्ध आहें. हजारों वर्षें मी हा असाच येथें तिष्ठत उभा आहें.

तुमच्या पंतप्रधानांकडून खरी अपेक्षा अशी होती कीं, त्यांनीं प्रगट रीतीनें सांगितलेली ही जी वस्तुस्थिति, ती संरक्षिण्यासाठीं, प्रत्यक्षांत सिद्ध करण्यासाठीं तुम्हांला वेळींच जागरूक करावयास हवें होतें; राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीनें वेळींच स्वयंसिद्ध बनावयास हवें होतें.

दुर्दैवानें तसें घडलेलें नाहीं – नव्हे, दुर्दैवानें असें म्हणणेंहि बरोबर नव्हे; तर तुमच्या भोंगळ निष्क्रियतेमुळें तुम्ही तसें घडूं दिलें नाहीं !

निदान माझ्या उदरांत सामावलेल्या तिबेटवर जेव्हां परकीयांचा घाला पडला तेव्हां तरी तुम्ही जागे व्हाल अशी अपेक्षा होती. पण तुमच्या बावळटपणाला आणि आत्मघातकीपणाला खरोखरी सीमा नाहीं !

माझ्या कुशींत तप करणाऱ्या ऋषींनीं साऱ्या जगाला स्वाभिमानी जीवनाचें तेजस्वी तत्त्वज्ञान दिलें. त्याच ऋषींचे तुम्ही वंशज आज खरोखरीच त्या स्वाभिमानी तेजस्वी जीवनाला पारखे व्हावेत, याचा मला अत्यंत विषाद वाटतो ! दुष्टांच्या दमननीतीला आपण होऊन

खतपाणी घालण्याच्या तुमच्या वृत्तीची – आणि तेंहि तुम्ही एक स्वतंत्र राष्ट्र झालेले असतांना – मला खरोखरीच चीड येते ! तुमच्या दांभिकतेचा संताप येतो आणि भ्याडपणाची कींव वाटते !

– पण, पण ... तरीहि तुम्ही माझे आहांत; आणि मी तुमचा आहें. सदैव तुमचाच रहावें अशी माझी मनोमन इच्छा आहे. आज हजारों वर्षे तुमची सीमा संरक्षिण्याचें कर्तव्य मी अचूक, बिनधोक पार पाडीत आलों आहें. पण आजवर जें घडलें नाहीं तें तुम्ही घडवूं पहात आहांत – शत्रूनें मित्रासारखें वागावें अशी अपेक्षा करीत आहांत. विषवल्लींतून अमृताचा वर्षाव होईल अशी आशा बाळगीत आहांत.

पण असें कधीं घडलें नाहीं; पुढें कधीं घडणार नाहीं. तुमच्या शत्रूपासून तुमचें स्वतःचें रक्षण तुम्हांला आपल्या बाहुबलावरच करावें लागेल; राजनीतीचे जे दंडक आहेत ते डावलून नव्हे, तर ते सारे पाळूनच तुम्हांला तुमचें स्वातंत्र्य राखतां येईल.

मी स्वतः काय करणार ? मी तर दगड नि बर्फ ! माझ्यांत चैतन्य आहे तें तुमच्या भावनांचें नि ईर्ष्येचें. नुसत्या बदुंका कधींच लढत नसतात; त्या पेलणारीं मनगटें लढतात; नव्हे तीं मनगटें धारण करणारीं मनेंच खरीं लढूं शकतात. तें मन तुम्ही माझ्या पाठीशीं उभें करा, म्हणजे मग माझें चैतन्यहि लढेल. केवढ्याहि बलिष्ठ शत्रूशीं प्राणपणानें झुंजून तुमची सीमा संरक्षील.

पण हिमालय हा आमचा उत्तरसीमा-संरक्षक असें खरोखरी मानणारीं मनें तुमच्या सर्वांत आहेत काय ? पहा, तपासा, शोध घ्या. जीं मनें तशीं नसतील तीं तुमच्या देशाचीं शत्रु आहेत हें नीट समजा; आणि अंतर्बाह्य रणासाठीं, झुंजीसाठीं निदान, आज मनानें तरी सिद्ध व्हा !

जानेवारी १९६०

[ संदर्भ : चिनी आक्रमण ]

१०४९२० ... २२।३।६९

## अन्यायांविरुद्ध उभे रहा !

जगाचा कांहीं हजार वर्षांचा इतिहास पहा. अन्याय करणारे आणि तो मोडून काढण्याचा प्रयत्न करणारे यांच्या संघर्षानें हा इतिहास भरलेला दिसेल.

रावणानें ऋषींवर केलेले अन्याय. कंसानें वसुदेवादिकांवर चालविलेला अन्याय. औरंगजेबानें हिंदूंवर लादलेला अन्याय. ब्रिटिशांनीं भारतीयांवर गुदरविलेला अन्याय. आणि या साऱ्या अन्यायाचा प्रतिकार करणारे राम-कृष्ण-शिवाजी-गांधीजी. अशी ही अखंड परंपरा चालतच आलेली आहे. आपल्याच देशांत असें नव्हे, तर जगांत सर्व ठिकाणींच.

इटलींत मॅझिनी उभा राहिला. आयर्लंडमध्यें डी व्हॅलेरानें गर्जन केली. अमेरिकेंत जॉर्ज वॉशिंग्टननें आवाज उठविला. रशियांत लेनिन जागा झाला. हे सारे त्या त्या ठिकाणीं चाललेल्या अन्यायाविरुद्ध शस्त्र परजून खडे झाले – ज्याच्या ज्याच्या हातीं जें जें घेण्यासारखें होतें तें घेऊन.

जे अन्याय करीत होते त्यांची शक्ति प्रचंड होती. ते अति बलाढ्य होते. त्या मानानें जे त्यांच्या प्रतिकारासाठीं दंड थोपटून पुढें आले त्यांचें सामर्थ्य अगदींच अपुरें होतें. त्या लढाईत त्यांना यश लाभेल असें वाटण्यासारखें त्याच्यापाशीं कांहींच नव्हतें. तरी पण ते सारे एकाच भावनेनें उभे राहिले होते – ‘ समोर घडतो आहे तो अन्याय आहे; आणि तो मला मोडून काढायलाच हवा. ’ हीच त्यांची प्रखर भावना होती.

अन्यायाविरुद्ध उभें रहाण्याची ही जी भावना ती खरी मानवी भावना आहे. त्या भावनेची तीव्रता वाढली कीं, प्रसंगीं ईश्वरी सामर्थ्यहि त्याच्या पाठीशीं उभें रहातें. कारण ईश्वर म्हणजे तरी मानवाचीच अत्युत्कृष्ट निर्दोष प्रतिकृति नव्हे का ?

म. गांधींची जयंती आणि पुण्यतिथीहि देशांत प्रतिवर्षीं साजरी होत असते. त्या वेळीं अनेक नियतकालिकांतून त्यांचा गुणगौरव होत असतो. परंतु गांधीजींच्या जीवनांतल्या एका विशेष गोष्टीकडे आमच्या बालमित्रांचें लक्ष वेधावें असें आमच्या मनांत होतें. म्हणून त्यांचा दांडी-यात्रेचा दिवस त्यांच्या परिचयासाठीं आम्हीं निवडला.

या बाबतींत आमचें आणखीहि एक म्हणणें आहे. विशिष्ट व्यक्तीवर श्रद्धा ठेवून चालण्याचा गुण आपल्या देशात आतां अगदीं पराकोटीला पोहोंचला आहे. यांत दोन प्रकारचे धोके आहेत. एक तर यामुळें माणसाची स्वतंत्र विचारशक्ति नष्ट होण्याचा, मारली जाण्याचा संभव असतो. आणि दुसरें असें घडतें कीं, खरी श्रद्धा नसतेच; त्या श्रद्धेचा नुसता देखावा करून मनुष्य आपला स्वार्थ साधण्याच्या किंवा जबाबदारी अंगावर घेऊन काम करण्यांत चुकारपणा करण्याच्या मार्गाला लागतो. हे दोन्ही धोके राष्ट्राच्या दृष्टीनें हानिकारकच. त्यापेक्षां त्या त्या व्यक्तींतील राष्ट्रजीवनाला, समाजोन्नतीला आवश्यक तेवढेच गुण घ्यावेत, त्या बाबतींतल्या त्याच्या कामगिरीपुरताच त्याचा आदर्श ठेवावा आणि आपलें जीवन स्वतंत्रपणें घडविण्याचा विचार करावा, हें उत्तम.

तेव्हां याच दृष्टीनें गांधीजींच्या एका महत्त्वाच्या वैशिष्ट्याकडे नव्या पिढीचें लक्ष वेधावें असें आम्हांला वाटतें. आणि तें वैशिष्ट्य म्हणजे अन्यायाविरुद्ध, त्याच्या प्रतिकारासाठीं निर्भयपणें उभें रहाणें. अन्याय करणारा कोणीहि असो. परकीय सरकार असो नाहीं तर स्वकीय स्वबांधव असो. जिथें जिथें म्हणून अन्याय दिसेल तिथें तिथें त्याविरुद्ध गांधीजी अनेकदां उभे राहिलेले आहेत. त्यांच्या आयुष्यांत अशा अनेक घटना आहेत. आणि म्हणून त्यांचा तो आदर्श नव्या पिढीनें आपल्या-समोर ठेवला पाहिजे.

कित्येकदां इतिहासांत असेंहि घडतें कीं, प्रथम अन्यायाशीं झगडण्याकरितां म्हणून जे उभे राहिले नि विजयी झाले आणि तेच पुढें

आपण स्वतःच अन्याय करूं लागले. सीझर, नेपोलियन, क्रॉम्वेल हीं परदेशांतलीं आणि कित्येक आधुनिक संस्थानिक आणि कांहीं आधुनिक राज्यकर्तें यांची आपल्या देशांतलींहि उदाहरणें यासाठीं सांगतां येतील. पण अशा अन्यायकर्त्यांविरुद्धहि त्या त्या ठिकाणीं कांहींना पुढें व्हावेंच लागतें; आणि तसें घडणें अपरिहार्यहि असतें.

अन्याय हा केवळ राज्यकर्त्यांकडूनच घडतो असें नव्हे. आपल्या शिक्षकांनीं केलेल्या अन्यायाविरुद्ध लहानपणीं आगरकर आणि टिळक न भितां उभे राहिले, हें तुम्ही वाचलेंच असेल. प्रत्यक्ष पित्यानें चालविलेल्या अन्यायाविरुद्ध उभा ठाकलेला मृत्युंजय नचिकेता तुम्हांला माहीत असेल. कैकयीनें केलेल्या अन्यायाचा प्रतिकार प्रत्यक्ष तिचा मुलगा भरत याला करावा लागला हेंहि तुम्हांला ठाऊक आहे. आणि नव्याण्णव कौरवबंधूंनीं चालविलेल्या अन्यायाविरुद्ध कडाडून बोलणारा एकाकी लहानगा निःस्पृह कौरवकुमार विकर्ण – त्याची तर तुम्ही ओळख करून घेतलीच पाहिजे.

याचा इत्यर्थ इतकाच कीं, अन्याय मग तो कसलाहि नि कोणीहि चालविलेला असो, त्याच्याविरुद्ध निर्भयपणें बोलण्याची वृत्ति पाहिजे; त्याविरुद्ध तेजस्वीपणानें वागण्याची धमक पाहिजे. गांधीजींच्या चरित्रांतून आणि इतिहासांतून हेंच शिकावयाचें.

लक्षांत ठेवा, अन्याय करणाराइतकाच तो चालवून घेणारा, सहन करणाराहि अपराधी असतो, शिक्षेला पात्र असतो !

एप्रिल १९६६ [ संदर्भ : दांडीयात्रा-स्मृति ]

■ ■ ■

## बावळटपणा म्हणजे संकटाला आमंत्रण !

किशोर मित्रांनो !

साधेपणा म्हणजे बावळटपणा नव्हे; हें तुम्हांला समजतें. तसेंच, दुबळेपणा म्हणजे सज्जनपणा नव्हे. आणि तसाच भोळेपणा म्हणजेहि सज्जनपणा नव्हे.

तुम्ही स्वतः एक व्यक्ति – एक मुलगा किंवा एक मुलगी – हा राष्ट्राचा भावी नागरिक. या अनेक व्यक्ति मिळून समाज होतो. अनेक नागरिक मिळून राष्ट्र होतें.

तुम्ही व्यक्ति म्हणून आणि समाज म्हणून; किंवा भावी नागरिक म्हणून बावळट, दुबळे आणि भोळे राहूं नये अशी अपेक्षा आहे.

आपला समोरचा प्रतिस्पर्धी किंवा शत्रु खरोखर कसा आहे; किती दुष्ट आणि पाताळयंत्री आहे हें न समजणें म्हणजे बावळटपणा. अशा बावळट माणसाला इतर लोक हंसतात. अशा बावळट राष्ट्राला जगांतलीं इतर धूर्त राष्ट्रें हंसत असतात.

आपल्या शरीराच्या मानानें, वयाच्या मानानें आपल्या अंगांत शक्ति नसणें म्हणजे दुबळेपणा. असा माणूस आणि असें दुबळें राष्ट्र पाहिलें कीं, साहजिकच त्याची हेटाळणी होते. अशा दुबळ्या माणसाला रस्त्यांतून जातांना पाहून कोणीहि त्याची उगीचच खोडी काढतो. त्याला दगड मारतो; एखादे वेळीं त्याचे कपडेहि हिसकावून घेतो. तो दुबळा माणूस त्या लुबाडणाराकडे नुसता पहातच रहातो ! फार तर चिडतो.

असें दुबळें राष्ट्र पाहूनच त्याच्या सरसीमेवरील दुसरीं राष्ट्रें त्याच्या सीमेवरील प्रदेशावर हल्ले करतात. ते हिसकावून घेतात. हें दुबळें राष्ट्र मग त्याचा निषेध करतें !

आणि भोळा कशाला म्हणतात ? कोणी तुमची स्तुति तुमच्या तोंडावर केली कीं, तुम्हांला वाटतें, खरेंच हा स्तुति करतो तसे आपण

आहोंत. ह्या स्तुति करणाराच्या मनांत खरोखर काय हेतु आहे ? तो आपली स्तुति कशासाठीं करतो आहे ? त्याची ती स्तुति खोटी कीं खरी ? हें न समजणें म्हणजे भोळेपणा. हें जसें व्यक्तीबद्दल तसेंच समाजाबद्दल. जसें एका माणसाबद्दल तसेंच राष्ट्राबद्दल.

एखादी अशी व्यक्ति किंवा माणूस बावळट, दुबळा नि भोळा असला तर काय होतें ? त्या व्यक्तीचें – माणसाचें नुकसान होतें. त्याला स्वतःला त्रास होतो. इतकेंच काय, त्याच्या कुटुंबांतील इतर व्यक्तींनाहि त्याचा वाईट परिणाम भोगावा लागतो.

पण एखादें सारें राष्ट्रच असें बावळट, दुबळें नि भोळें असलें तर ? – मग त्या साऱ्या राष्ट्राचीच हानि होते. त्या सबंध राष्ट्रावरच संकटें एकामागून एक कोसळतात.

इतकेंच नव्हे तर अलीकडच्या काळांत असें एखादें राष्ट्र बावळट, दुबळें, भोळें राहिलें तर साऱ्या जगावरहि एखादें संकट कोसळतें – मोठ्या जागतिक लढाईचें, महायुद्धाचें.

म्हणून अर्थातच तुम्हांला बावळट, दुबळें, भोळें राहून चालणार नाहीं. कारण तुम्ही तसे राहिलात तर तुमचें हें भारतीय राष्ट्रहि तसेंच राहील. तुम्हांला एकेकट्याला जसा त्यामुळें त्रास होईल तसाच तुमच्या-सारखे अनेक नागरिक मिळून होणाऱ्या या राष्ट्रालाहि तो होईल. तें संकटांत सांपडेल.

■ ■ ■

## विज्ञानहि सांस्कृतिकच

गोड गाणीं म्हणणें, छानसें नृत्य करणें, सुंदर गोष्टी सांगणें, हें 'सांस्कृतिक' म्हटल्या जाणाऱ्या कार्यक्रमांत मोडतें. हळुवार नाजूक हातांनीं एखादी कलाकृति सादर करणें हेंहि 'सांस्कृतिक' कार्यक्रमांत येतें.

पण – विज्ञानांतील एखादा नवा शोध कशांत बसतो ? सांस्कृतिक शिकवणींत त्याचा समावेश करावयाचा कीं नाहीं ? 'सांस्कृतिक' शिकवणींत तें सांगावयाचें कीं नाहीं ?

वास्तविक असा प्रश्नच पडूं नये. कारण, माणसांतील सुसंस्कृतपणा हा केवळ कलांच्या प्रगतीनें होत नाहीं. त्याला त्यासाठीं विद्येचीहि गरज असते. विज्ञान म्हणजे विद्या.

फार फार जुन्या काळीं अग्नीचा शोध लागला. चाकाचा शोध लागला. माणूस त्या शोधांमुळें हळूहळू सुधारूं लागला. त्यामुळें त्याच्या सुखांत भर पडूं लागली.

अग्नीवर अन्न शिजवितां येतें; आणि त्याच्या योगानेंच दुसऱ्यांचीं घरेंहि जाळतां येतात. पण तो कांहीं अग्नीचा दोष नव्हे. तो दोष असेल तर त्या अग्नीचा उपयोग करणाराचा.

एखाद्या गोष्टीचा चांगला उपयोग करावा असें मनापासून वाटूं लागणें म्हणजे सुसंस्कृतपणा. पण तो चांगला उपयोग कसा करावयाचा हेंहि त्याला शिकावें लागतें. ती विद्या अभ्यासावी लागते. ती विद्या म्हणजेहि विज्ञानच आहे. चांगले विचार आचारांत आणण्यासाठीं विज्ञानाची गरज पडते.

आपण जेवतों तें अन्न अग्नीवर शिजविलेलें असतें. या अग्नीचा शोध माणसाला लागला तेव्हांच खरें विज्ञान सुरू झालें. अणुबाँबचा शोध, मोटारीचा शोध म्हणजे कांहीं केवळ विज्ञान नव्हे; विज्ञानाचा प्रारंभ फार फार जुन्या काळापासून झालेला आहे.

अग्नीचा शोध, चाकाचा शोध हे विज्ञानाचेच टप्पे आहेत.

हें विज्ञान जसें जसें पुढें पुढें जात चाललें तसें तसें जग सुधारत चाललें, जग सुसंस्कृत होत चाललें, असें आपण म्हणतों.

या विज्ञानाच्या वाटचालीकडे डोळेझाक केली म्हणून आपला देश परतंत्र झाला. स्वातंत्र्याचें सुख आपण गमावून बसलों. आणि इतर कांहीं देशांनीं, विशेषेंकरून युरोप-अमेरिकेनें, परमार्थाकडे, अध्यात्माकडे दुर्लक्ष केलें, म्हणून ते मानसिक उन्नतीला पारखे झाले. खरें म्हणजे या दोन्हींची सांगड घालणें, संगति राखणें, समन्वय ठेवणें, दोन्ही बाजू सारख्या सांभाळणें हा सुसंस्कृतीचा मार्ग आहे.

विज्ञान म्हणजे शास्त्रीय ज्ञान. प्रत्यक्ष अनुभवाचें, पारखून घेऊन मग खरें ठरणारें तें विज्ञान – अशी सुटसुटीत व्याख्या केली तरी चालेल. या विज्ञानाची गोडी लहानपणापासून लागावी लागते. तेव्हांच एकंदर राष्ट्रांत विज्ञानाच्या वाढीला अनुकूल असें वळण उत्पन्न होतें.

■ ■ ■

## आपण हें करूं शकतों

कुमारी आरती सहा हिचें नांव तुम्हीं ऐकलें, वाचलें असेलच. तिनें केलेल्या विक्रमाबद्दलहि तुम्हीं वाचलें असणारच.

अवघ्या १९ वर्षांच्या या मुलीनें – तरुणीनें म्हणू वाटलें तर – इंग्लिश खाडी पोहून जाण्याचा विक्रम केला. एका दमांत तिनें २५ मैल लांबीची इंग्लिश खाडी पोहून पार केली. एवढें अंतर पोहून जायला तिला फक्त १६ तास आणि २० मिनिटें लागलीं.

कु. आरती सहा ही भारतीय कन्या आहे. ही कलकत्ता विद्यापीठाची विद्यार्थिनी. ही आग्नेय रेल्वेमध्यें नोकरी करते.

या तिन्ही गोष्टी आपल्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत. ती नोकरी करते त्या अर्थीं ती कांहीं एखाद्या लक्षाधिशाची मुलगी नसली पाहिजे खास. विद्यापीठाचें शिक्षण घेतलेली म्हणजे ती चांगली सुशिक्षित आहे. मन लावून अभ्यास करणारी व उत्तीर्ण होऊन वरच्या वर्गांत जाणारी आहे. आणि ती भारतांतली आहे, ती एक मुलगी आहे.

तरीहि कु. आरती सहानें असा विक्रम केला आहे कीं, केवळ भारतांतच नव्हे तर साऱ्या आशिया खंडांत असा विक्रम करणारी ती पहिलीच स्त्री आहे.

इंग्लिश खाडी पोहून जाण्याच्या यापूर्वीं अनेक स्पर्धा झाल्या. त्या स्पर्धेंत भाग घेऊन एक भारतीय कन्या यशस्वी होऊं शकते आपल्या देशाचें नांव उज्ज्वल करूं शकते, हें आतां सिद्ध झालें आहे.

मागें तेनसिंग नोर्के यांनींहि हें सिद्ध करून दिलें आहे कीं, आम्ही भारतीय जगांतल्या इतर लोकांइतकेच साहसी आहोंत, पराक्रमी आहोंत. पूर्वी तर होतोंच, आजहि आहोंत. कु. आरती सहानें तीच गोष्ट पुन्हां एकदां जगासमोर स्पष्टपणें मांडली आहे.

याचा अभिमान तर आपल्याला वाटणारच. पण, नुसता अभिमान बाळगून काय कामाचा ? कु. आरती सहाच्या विक्रमाबद्दल वाचणाऱ्या तुमच्यापैकीं एखाद्याच्या – किंवा एखादीच्याहि – मनांत तसें कांहीं तरी विशेष करण्याचें यावें; तशी धडपड तुम्हीं सुरू करावी ही अपेक्षा आहे. कारण, हें आतां तुमच्यासमोर उदाहरणच आहे कीं, जगांतले इतर लोक जें करतात तें आपणहि करूं शकतो; इच्छा आणि धडपड मात्र पाहिजे.

नोव्हेंबर १९६६

■ ■ ■

## ‘ उत्कट भव्य तेंचि घ्यावें ’

‘ मनाचे श्लोक ’ माहीत नाहींत असा मुलगा किंवा मुलगी महाराष्ट्रांत तरी सांपडणें कठीण ! ‘ मनाचे श्लोक ’ कोणी केले आहेत ? श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं. रामदासांची पुण्यतिथि माघ महिन्यांत वद्य नवमीला येते. या निमित्तानें तरी रामदासस्वामींचें चरित्र सर्व मुलां मुलींनीं वाचलें पाहिजे.

श्रीरामदासस्वामींनीं पुष्कळ लिहून ठेवलें आहे. त्यांत मुख्य ग्रंथ तीन – ‘दासबोध’, ‘मनोबोध’ किंवा ‘ मनाचे श्लोक ’ आणि ‘आत्माराम’. यांपैकीं ‘आत्माराम’ हा आध्यात्मिक ग्रंथ असल्यामुळें त्याचा विचार तुम्हांला आत्तांच करतां येणार नाहीं. परंतु ‘मनोबोध’ तर तुम्ही सगळाच्या सगळा पाठ केला पाहिजे; आणि ‘दासबोध’ – निदान त्यांतला कांहीं विशिष्ट भाग तरी तुम्ही वाचायला लागलें पाहिजे.

‘ मनाचे श्लोक ’ अवघे २०५ आहेत. तुम्ही मनांत आणलेंत तर एखाद्या मोठ्या सुटींत, दिवाळींत किंवा मे महिन्यांत, ते सर्व तुम्ही सहज पाठ कराल. पाठांतराचा उपयोग फार मोठा असतो; तो तुमच्या आज लक्षांत आला नाहीं, तरी मोठेपणीं अवश्य येईल. हे श्लोक पाठ केल्यानें, म्हटल्यानें काय मिळतें याबद्दल स्वतः रामदासस्वामींनींच सांगून ठेवलें आहे. प्रत्येक जुन्या ग्रंथाबद्दल असें सांगितलेलें असतें. त्याला फलश्रुति म्हणतात. ‘ मनाच्या श्लोकां ’ची फलश्रुति अशी :

**मनाचीं शतें ऐकतां दोष जाती ।**
**मतीमंद ते साधनायोग्य होती ।**
**चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं ।**
**म्हणे दास विश्वासितां मुक्ति भोगी ॥**

‘दासबोध’ हा ग्रंथ बराच मोठा आहे. परंतु त्यांतले कांहीं निवडक समास म्हणजे पोट-प्रकरणें तुम्हांलाहि वाचतां येतील, समजूं शकतील.

उदाहरणार्थ – ११ व्या दशकांतला ३ रा समास 'शिक्षानिरूपण'; ११ व्या दशकांतला ६ वा समास 'महंतलक्षण'; १२ व्या दशकांतला १० वा समास 'उत्तमपुरुषलक्षण'; १२ व्या दशकांतला ७ वा समास 'यत्ननिरूपण'. असे आणखी कित्येक सांगतां येतील.

याशिवाय समर्थांची प्रासंगिक स्फुट कविताहि पुष्कळ आहे; आणि तींतहि 'संभाजी महाराजांना लिहिलेलें पत्र', 'आनंदवनभुवन' इत्यादि कांहीं अमोलिक कविता तुमच्यासारख्या विद्यार्थ्यांनीं वाचून पाठ करावी अशी आहे. श्रीसमर्थांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे –

**ऐकल्याविण कळलें। सिकल्याविण शाहाणपण आलें।**
**ऐसें देखिलें ना ऐकिलें। भूमंडळीं॥**

म्हणून खूप वाचलें पाहिजे, खूप शिकलें पाहिजे. तसें केलें तर –

**तरीच प्राणी शाहाणा होतो। नाहीं तरी मूर्खचि राहातो।**
**लोक खाती आपण पाहातो। दैन्यवाणा॥**

श्रीरामदासस्वामींचें सारें वागणें-बोलणें, करणें-सांगणें प्रत्यक्ष अनुभवाचें आणि स्पष्ट खणखणीत आहे. त्यांनीं स्वतःच सांगितलें आहे :

**साधें वोषध परी गुणवंत। साधें बोलणें सप्रचीत। तैसें माझें॥**

त्यांनीं जें जें कांहीं लिहिलें तें सारें या देशांतलीं माणसें शहाणीं, तेजस्वी, सदाचारी व्हावींत, हा देश स्वतंत्र नि सामर्थ्यसंपन्न व्हावा, आपला हिंदु धर्म तेजस्वीपणानें नांदावा यासाठीं. त्यांच्या सांगण्या-लिहिण्याचें सार त्यांच्याच एका वाक्यांत सांगतां येईल –

**उत्कट भव्य तेंचि घ्यावें। मळमळीत अवघेंचि टाकावें।**
**निःस्पृहपणें विख्यात व्हावें। भूमंडळीं॥**

फेब्रुवारी १९६१ [ संदर्भ : दासनवमी ]

■ ■ ■

## ‘ मला स्मरून युद्ध कर ’

युद्ध, लढाई म्हणजे कांहीं चांगली गोष्ट नव्हे, असें अनेक थोर लोक म्हणतात.

खरेंच आहे. लढाईत हजारों माणसें मरतात. गांवेंच्या गांवें जळून खाक होतात. हें लढाईमुळें घडतें – तेव्हां लढाई चांगली नव्हे हें तर खरेंच.

पण – आपण थोडा इतिहास पाहूं.

प्रभु श्रीराम, भगवान् श्रीकृष्ण, छत्रपति शिवाजी महाराज. एवढीं तीन नांवेंहि पुरेत. हे तिघेहि थोर पुरुष होते. आपण तर त्यांना प्रत्यक्ष परमेश्वरी अवतार मानतों. परमेश्वर हा तर परम दयावन आहे. त्याचे हे अवतारहि अतिशय दयाळू होते. थोर मनाचे होते.

त्या तिघांनींहि युद्ध केलें; भयंकर लढाई केली.

श्रीरामांनीं दुष्ट रावणाला ठार मारलें.

श्रीकृष्णांनीं क्रूर कंसाचा वध केला.

शिवछत्रपतींनीं कपटी अफझलखान ठार केला.

समजा, हें त्यांनीं केलें नसतें – तर ?

तर – तर त्या तिघांनाहि आपापल्या शत्रूच्या तलवारीला बळी पडावें लागलें असतें !

आणि त्यामुळें काय झालें असतें माहीत आहे ?

रामाऐवजीं रावणाचें राज्य पृथ्वीवर झालें असतें. कृष्णाऐवजीं कंसाची छाप या भारतावर पडली असती. शिवाजी महाराजांऐवजीं जुलमी मुसलमानी बादशहांनीं हा सारा देश व्यापून टाकला असता. आणि आणि – हा भारत, भारत राहिला नसता. हा भारत हिंदुस्थान राहिला नसता. भारतीय हिंदु धर्म, संस्कृति, समाज औषधाला सुद्धां उरला नसता.

परंतु त्या तिघांनींहि युद्ध केलें, लढाई केली. आणि हा आपला प्रिय स्वदेश, थोर धर्म, तेजस्वी संस्कृति आणि प्राचीन समाज कायम राखला; त्याचें संरक्षण केलें. युद्ध करावयाचें नाहीं, लढाई करावयाची नाहीं, हातीं शस्त्र धरावयाचें नाहीं असें त्या तिघांनीं ठरविलें असतें तर ? तर – हें किंवा यांपैकीं कांहींहि घडूं शकलें नसतें.

मग लढाई चांगली कीं वाईट ? हातीं शस्त्र धरणें चांगलें कीं वाईट ?

याचें उत्तर 'गीता' ग्रंथांत उत्तम रीतीनें दिलें आहे.

'गीता' हें नांव तुम्हीं वाचलें आहे. 'गीता' म्हणजे खरी 'भगवद्गीता'. भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलेला उपदेशग्रंथ. त्याचें नांव 'भगवद्गीता'.

माणसानें जगावें कसें नि कां ? मरावें तर कशासाठीं नि केव्हां ? याबद्दल सगळें कांहीं गीतेंत सांगितलें आहे.

गीता हा भारताचा थोर ग्रंथ आहे. केवळ धर्म-ग्रंथ नव्हे, केवळ संस्कृति-ग्रंथ नव्हे; तर जीवन-ग्रंथ.

या जीवनग्रंथांत सांगितलें आहे – " **मामनुस्मर युध्य च ।** "

म्हणजे " मला स्मरून युद्ध कर – लढ. "

'मला म्हणजे श्रीकृष्णाला, परमेश्वराला आठवून खुशाल लढाई उभा रहा.'

कशासाठीं ? केव्हां ? जेव्हां – आपल्या देशाचे, धर्माचे, संस्कृतीचे, समाजाचे शत्रु प्रबळ झाले असतील, जेव्हां ते उन्मत्त झाले असतील, जेव्हां ते आपला मान पायदळीं तुडवीत असतील, तेव्हां – आपल्या देश – धर्म – संस्कृति – समाजाच्या मानरक्षणासाठीं ! युद्ध कर, लढ. पण लढाई एकदम करतां येत नाहीं. लढाई करायची तर लढाईचें शिक्षण घ्यावें लागतें. त्यासाठीं व्यायाम करावा लागतो. चांगल्या संवयींनीं वागावें लागतें.

मित्रांनो ! हें सारें तुम्हांला करावें लागणार आहे. कारण, तशी परिस्थिति आपल्या या देशांत आज येऊन ठेपली आहे. – आजच त्याला प्रारंभ करा. त्यासाठीं एक उत्तम दिवस सांगतों – 'गीताजयंती'. ज्या दिवशीं श्रीकृष्णांनीं रणांगणावर अर्जुनाला गीता सांगितली तो दिवस – मार्गशीर्ष शुद्ध एकादशी. व्यायामानें शरीर बलवान् होईल. गीतेच्या अभ्यासानें मन प्रसन्न होईल, बुद्धि तेजस्वी बनेल. लढाई कशासाठीं नि केव्हां करावी तेंहि कळूं लागेल.

डिसेंबर १९५९ [ संदर्भ : गीताजयंती ]

■ ■ ■

## श्रद्धा : एक प्रचंड कार्यशक्ति

'श्रद्धेनें पर्वत हालवितां येतात,' असें म्हटलें आहे. खरोखरीच श्रद्धा ही अशी एक प्रचंड कार्यशक्ति आहे.

'श्रद्धा असणाराला ज्ञान मिळतें' असेंहि सांगितलेलें आहे. कारण असें आहे कीं, कोणतेंहि ज्ञान संपादन करण्यासाठीं विद्यार्थी बनावें लागतें; विद्यार्थी नम्र असावा लागतो; आणि श्रद्धेशिवाय नम्रता अंगीं येत नाहीं.

'देव, औषध, गुरु इत्यादींच्या ठिकाणीं आपण जशी भावना ठेवूं तसें फळ श्रद्धेला येतें' अशा अर्थाचें एक सुभाषित आहे. नाहीं तर, दगडाच्या देवानें माणसाचा उद्धार कधीं केला नसता; नुसत्या पाण्याच्या किंवा राखेच्या बळावर रोग बरे झाले नसते; आणि मातीच्या मूर्तीपासून एकलव्यासारख्यांना विद्येची प्राप्तीहि झाली नसती.

श्रद्धेच्या थोरवीविषयींचीं अनेक उदाहरणें आपल्या पुराणांतून आणि इतिहासांतून आहेत. परमेश्वरावर – नारायणाच्या नामावर श्रद्धा होती म्हणून प्रल्हाद प्राणघातक संकटांतूनहि जिवंत राहिला. अंबाजीची

आपल्या गुरूवर – समर्थांवर अपार श्रद्धा होती म्हणूनच तो 'कल्याण-स्वामी' या महनीय पदावर चढला.

आपण परमेश्वराची प्रार्थना करतों. आपलें पाऊल चुकीच्या मार्गावर पडूं नये, म्हणून आपण परमेश्वराची विनवणी करतों. आम्हांला सुख लाभूं दे, आमच्यावरील संकटांचें निवारण होऊं दे असेंहि त्या प्रार्थनेंत आपण म्हणत असतों. पण ही प्रार्थना ऐकणारा, ही विनवणी समजून घेणारा आणि त्याप्रमाणें फळें आपल्याला देणारा परमेश्वर तर आपल्याला दिसत नाहीं. तरीहि आपण प्रार्थना करतों. आपणच लहान मुलें, सामान्य माणसें, प्रार्थना करतों असें नव्हे, तर गांधीजींसारखे थोर पुरुषहि परमेश्वराची प्रार्थना करतात. स्वतः गांधीजी काय कमी सामर्थ्य-वान् होते, कमी बुद्धिवान् होते ? तरीहि ते परमेश्वराची नित्य प्रार्थना करीत असत. त्याचें कारण असें कीं, आपल्याला न कळणाऱ्या, आपल्या शक्तीबाहेरच्या, बुद्धीच्या पलीकडच्या अशा अनेक गोष्टी आहेत. त्यांचें नियमन किंवा नियंत्रण आपण करूं शकत नाहीं; तें करतो फक्त जग-चालक परमात्मा. म्हणून त्याच्यावर श्रद्धा ठेवून त्याची प्रार्थना करावयाची. आणि या श्रद्धापूर्वक केलेल्या प्रार्थनेला फळ मिळतें, असा हजारोंचा अनुभव आहे.

तुम्ही तर वयानें, बुद्धीनें, ज्ञानानें सर्वच बाबतींत लहान आहांत. दिसणारें जग म्हणजे काय हें सुद्धां तुम्हांला जिथें अजून समजत नाहीं, तिथें न दिसणारें 'पलीकडचें जग' काय आहे याची कल्पना तरी तुम्ही कशी करूं शकणार ?

म्हणूनच वडील माणसांवर, विशेषतः आई-वडिलांवर, शिक्षकांवर गुरुजनांवर श्रद्धा ठेवून चालणेंच तुम्हांला आवश्यक आहे, हिताचें आहे. जेव्हां एखाद्या वेळीं आपल्या गुरुजींची – शिक्षकांची टिंगल करण्याची इच्छा तुमच्या मनांत उत्पन्न होते तेव्हां, साहजिकच त्याचा अर्थ तुमची त्या गुरुजींविषयींची श्रद्धा नाहींशी झालेली आहे हें उघड होतें. पण

तुम्हांला या बाबतींत आणखी एक सूक्ष्म, बारकाव्याचा विचार सांगावासा वाटतो. तो म्हणजे, श्रद्धा ही केवळ व्यक्तीवरच ठेवली जाणारी नसते; तर श्रद्धा ही मुख्यतः एखाद्या तत्त्वावर असते. त्या विशिष्ट तत्त्वाचा प्रतिनिधि म्हणून त्या व्यक्तीवर श्रद्धा बसत असते. जसें सरकार हें राज्य चालविणारें एक तत्त्व आहे; त्याचा प्रतिनिधि म्हणून लोक रस्त्यावर उभ्या असलेल्या आरक्षकाला – पोलिसाला मान देतात, त्याच्या आज्ञा मानतात. तो मान किंवा तें आज्ञापालन त्या आरक्षक – पोलीस या व्यक्तीचें, माणसाचें नसून तो ज्या सरकारचा प्रतिनिधि आहे त्या तत्त्वाचें असतें.

यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं, जी विद्या शिकण्यासाठीं तुम्ही शाळेंत जातां त्या विद्येचाच अपमान तुम्ही गुरुजींच्या टिंगलीमुळें करीत असतां. कारण ते गुरुजी, ते शिक्षक हे त्या विद्येचेच प्रतिनिधि असतात. आपण असें समजूं कीं, आपटे-कुलकर्णी-देशपांडे असे कोणी तुमचे शिक्षक आहेत. असेंहि धरून चालूं कीं, ते दिसायला चांगले नाहींत; किंबहुना त्यांना नीट शिकवतांहि येत नाहीं. पण म्हणून, या कारणासाठीं तुम्ही त्यांची टिंगल करूं लागलांत, त्यांचा अपमान करूं लागलांत तर तो अपमान तुम्ही कोणाचा करतां ? त्या आपटे-कुळकर्णी-देशपांडे या व्यक्तीचा नसून विद्येचा प्रतिनिधि असलेल्या शिक्षकाचा. पुढल्या वर्षी हे आपटे-कुळकर्णी-देशपांडे जाऊन त्यांच्या जागीं दुसरे कोणी डांगे-सबनीस-भोसले येतील; ते कदाचित दिसायला सुरेख असतील, शिकवीतहि चांगले असतील. पण तुमची गुरुजींची टिंगल करण्याची, अपमान करण्याची एकदां जडलेली संवय कांहीं सुटणार नाहीं; आणि मग तुम्ही त्यांचीहि मागील वर्षीच्या शिक्षकांप्रमाणेंच टिंगल करीत रहाल. पण जर का तुम्हांला हें समजलें, पटलें नि तुमच्या मनांत पक्के झालें कीं, आपण शाळेंत विद्या शिकायला येतों आणि ती विद्येवर श्रद्धा ठेवल्यानेंच शिकतां येईल; तर तुमच्या हातून असें गैरवर्तन कदापि होणार नाहीं. अशा गैरवर्तनानें तुम्ही शाळेची शिस्त बिघडवितां, आपलें व आपल्याबरोबरच

वर्गातील इतर विद्यार्थ्यांचेंहि नुकसान करतां; एवढेंच नव्हे तर तुमच्या भावी आयुष्याला एक वाईट वळण लावीत असतां.

तुमच्यांतल्या म्हणजे विद्यार्थ्यांतल्या बेशिस्तीची साऱ्या देशभर चर्चा चालते. महाविद्यालयांतील कॉलेजांतील नव्हे ( कारण त्यांच्यासाठीं हें सारें सांगण्याचा खटाटोप नाहींच ), तर अगदीं शाळांतील विद्यार्थ्यांपर्यंतहि हें लोण कांहीं ठिकाणीं पोहोंचलेलें दिसतें. याचें एक कारण उघड आणि स्पष्ट आहे कीं, तुमची मनें 'रिकामीं' आहेत, ( इंग्रजी म्हणीप्रमाणें रिकाम्या मनांत सैतान वावरत असतो, म्हणतात ! ) 'रिकामीं' याचे अर्थ दोन – एक म्हणजे त्यांत कांही काम, अभ्यास, हव्यास, ध्यास भरलेला नाहीं; आणि दुसरा अर्थ तीं श्रद्धाहीन बनलेलीं आहेत. तुम्हांला कोणाविषयींच प्रेम, जिव्हाळा, भक्ति श्रद्धा उरलेली नाहीं. अशा दोन्ही अर्थांनीं 'रिकामीं' मनें म्हणजे वाऱ्यावर सुटलेले, दोरा तुटलेले पतंग. वारा वाहील तसे ते भरकटत जाणार. आणि त्यांचें भवितव्य ? कोठल्या तरी झाडाच्या शेंड्यावर किंवा तारेवर अडकून ते फाटून फुकट जाणार ! म्हणून कोठें तरी श्रद्धा ठेवलीच पाहिजे; मग त्या श्रद्धेंतून कांही ध्यास-हव्यास उत्पन्न होईल आणि मन व शरीर त्यासाठी धडपडूं लागेल, योग्य मार्गावरून चालूं लागेल.

आषाढी पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा असते. या दिवशीं प्राचीन काळापासून गुरूचें पूजन करण्याची प्रथा आहे. पण कोणाचीहि खरी पूजा श्रद्धेशिवाय होत नसते. श्रद्धा ही मानवी जीवनाचा पाया आहे. तुम्ही या श्रद्धेचा पायाच उखडलात म्हणजे तुमच्या जीवनाचा पाया उखडून टाकलात असें समजा. कारण पक्क्या, भक्कम पायाशिवाय इमारत उभी राहूं शकत नसते, टिकत नसते – मग ती दगडाची असो नाहीं तर मानवी जीवनाची असो !

[ संदर्भ : गुरुपौर्णिमा ]

■ ■ ■

## आग्रहाचें आवाहन

सरकारचें लक्ष कशाकशाकडे वेधावें ! ' यथा राजा तथा प्रजा ही म्हण आतां जुनी झाली, खोटी ठरली. आतां उलट म्हणावयाला हवें आहे कीं ' यथा प्रजा तथा राजा. ' कारण लोकशाहीचें युग आहे. तथापि, आज सत्ताधारी जें करूं म्हणतील तें घडत आहे. म्हणून एक प्रश्न मनांत खटकतो, त्याचा उल्लेख येथें प्रकटपणें केल्यावांचून रहावत नाहीं.

प्राथमिक शाळेंतील कोवळ्या वयाच्या मुलांपासून लष्करांतल्या कसलेल्या सैनिकांपर्यंत तुम्ही सरसकट सर्वांना विश्वबंधुत्वाचे, जागतिक शांततेचे, मानवप्रेमाचे धडे देऊं पहात आहांत. जणुं कांहीं साऱ्या जगाची मक्तेदारी या, तसें पाहतां नुकत्याच स्वतंत्र झालेल्या, एका राष्ट्राकडे आलेली आहे अशा आविर्भावांत हें तत्त्वज्ञान त्या सगळयांच्या गळीं उतरविण्याचा आपला सतत अट्टाहास चालू आहे. यांत आम्हांला कळत नाहीं तें एवढेंच कीं, या जगद्धितेच्छु शिकवणींतून आपल्या स्वतःच्या देशाबद्दलचें उत्कट प्रेम नि कार्यकारी निष्ठा कशी उत्पन्न व्हावयाची ? तुम्ही शिकवीत असलेलें तत्त्वज्ञान फार उच्च आहे, याबद्दल वाद न करतांहि एवढें म्हणावेंसें वाटतेंच कीं, ' न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ! ' एवढी भगवद्गीतेची जनहितकर सूचनाहि या बाबतींत तुम्हांला लक्षांत घ्यावीशी वाटत नाहीं काय ?

आमचे बालमित्र, वडीलधारी मंडळी आणि सत्ताधारी सरकार या सर्वांनाच आमचें एक आग्रहाचें आवाहन आहे कीं, आपण जरा अधिक व्यावहारिक बनूं या. या प्रत्यक्ष डोळ्याला दिसणाऱ्या, मुला-माणसांच्या भौतिक राष्ट्राचा व्यवहार अधिक राष्ट्रीय व्यवहारी बुद्धीनें साधूं या. कारण आकाशांतील तारे दिसायला कितीहि तेजस्वी असले तरी त्यांच्यावर विसंबून हातांतला जो असेल तो लहानसा उजेड दाखविणारा दिवा विझविणें कधींच श्रेयस्कर नाहीं !

■ ■ ■

## ‘ मासानां मार्गशीर्षोऽहम् ’

पावसाळा संपून गेला. ऑक्टोबर महिन्यांतला अकालीं येणारा उन्हाचा कडकाहि मागें पडला. आतां आले आहेत थंडीचे दिवस. पण तशी थंडीहि अजून कडाक्याची पडूं लागलेली नाहीं.

या दिवसांत गांवाबाहेर एखाद्या टेकडीवर किंवा जंगलांत-रानांत जाऊन तुम्हीं कधीं पाहिलें आहे का ? सगळीकडे हिरवेंगार असतें. हवेंत थंडपणा असला तरी तो जोमदार वाटतो. आकाश निरभ्र असतें. पावसाळ्यांत झालेला चिखल नाहींसा होऊन सगळीकडे निसर्गाची केरसुणी फिरलेली आढळते.

कोठेंहि हिरवळीवर जरा वेळ बसा आणि आसपास दृष्टि फेका. तुम्हांला वाटेल – आजूबाजूला पसरलेलीं झाडेंझुडपें, वृक्षराजी जणुं तुम्हांला गप्पागोष्टी करायला बोलावीत आहेत; संथपणें वाहणारा एखादा ओढा तुम्हांला मधुर संगीत ऐकवतो आहे; झाडाझाडावर किलबिल करणारे पक्षी तुम्हांला गोष्टी सांगताहेत.

वेळ सकाळची असेल; आणि त्यांत सूर्योदयाची असेल तर आणखीनच बहार. सूर्यनारायण पूर्व क्षितिजावरून हळूच डोकावून लाल रंगाची उधळण करीत असेल. त्याच्या सोनेरी किरणांनीं सारी वृक्षराजी सोन्याचा मुलामा दिल्यासारखी चमचम करीत असेल. आणि तें दृश्य पाहून तुमचें मन विलक्षण आनंदानें भरून जाईल.

– कधीं तुम्ही स्वतः असा अनुभव घेतला आहेत का ? पुस्तकांत नि चित्रपटांत सुद्धां अशीं वर्णनें काय थोडीं असतात ? ‘ अमर भूपाळी ’ चित्रपट ज्यांनीं पाहिला असेल त्यांच्या डोळ्यांपुढें त्या चित्रपटांतलें हें दृश्य नाचत असेलच. पण पुस्तकांत वाचणें किंवा पडद्यावर पहाणें यापेक्षां प्रत्यक्ष स्वतःच्या डोळ्यांनीं पहाणें, आपल्या मनानें अनुभवणें ही अगदीं वेगळी गोष्ट. जेवणाच्या वाढलेल्या ताटाचें चित्र पाहून किंवा

तें ताट पाहूनहि तुमचें पोट भरत नाहीं; त्यासाठीं पानावर बसून प्रत्यक्ष जेवावें लागतें. घास तोंडांत घालावा लागतो. तसेंच वाचणें – पहाणें आणि प्रत्यक्ष अनुभवणें यांत फरक आहे.

निसर्ग म्हणजे सहजता, अकृत्रिमता; म्हणजे जसें मुळांत आहे तसें असणें. परमेश्वरानें ही सृष्टि निर्माण केली ती अशी अकृत्रिम आहे, सहज आहे. टेकड्या, डोंगर, पर्वत, झरे, नद्या, समुद्र, गवत, झुडपें हें सारें परमेश्वराच्या सृष्टीचें अकृत्रिम रूप आहे. आणि त्या रूपाचा प्रभाव असा आहे कीं, त्या रूपाचें अगदीं जवळ जाऊन दर्शन घेणाऱ्याच्या मनांतले परमेश्वरी अकृत्रिम भावहि आपोआप जागे होतात.

गांवांत, गल्लींत, घरांत, चार कोंदट भिंतींच्या आड स्वतःला कोंडून घेण्यांत तर दिवसाचा बहुतेक वेळ जातो. पण दिवसांतून थोडा वेळ, निदान आठवड्यांतला एक सुटीचा दिवस – रविवार या दिवशीं तरी तुम्ही गांवाबाहेर उघड्यावर अगदीं मोकळेपणानें भटकलें पाहिजे. तुम्ही मित्र मित्र मिळून जमून गेलांत तर उत्तमच; तें नाहीं जमलें तर घरांतल्या वडील मंडळींच्या मागें लागून त्यांना बरोबर घेऊन तुम्ही असें गांवाबाहेर पडलें पाहिजे. सकाळचा सूर्योदय न पाहतां आला तर निदान संध्याकाळचा सूर्यास्त तरी पाहिला पाहिजे. निसर्गाच्या कुशींत थोडा वेळ तरी मनमोकळेपणानें घालविला पाहिजे.

भगवद्गीतेंत कृष्ण परमात्म्यानें कोणत्या ठिकाणीं आपलें रहाणें विशेष असतें तें सांगितलें आहे. त्यांत 'मासानां मार्गशीर्षोऽहम्' असें म्हटलें आहे. आधीं निसर्ग ही परमेश्वराची सहज कृति; आणि त्यांत हा मार्गशीर्ष महिना तर त्याचें स्वतःचें विशेष रूप. तेव्हां आतां ठरवा पाहूं – निदान या महिन्यांत गांवाबाहेर निसर्गाच्या सान्निध्यांत तास दोन तास तरी आपण स्वच्छंदपणानें घालविणार. बघा तर खरी त्यांत काय जादू आहे ती !

डिसेंबर १९६०

■ ■ ■

## या सगळ्यांचा प्रारंभ ' आपल्या घरापासून '

आपण ' आपलें घर ' असे शब्द उच्चारतों. पण, आपलें म्हणजे कोणाचें ? घर म्हणजे काय ? याचा तुम्हीं कधीं शांतपणें, एके जागीं बसून विचार केला आहे का ? बहुधा केला नसेल. आपण आतां करूं.

आपलें म्हणजे सर्वसाधारणपणें आपल्या सर्व कुटुंबियांचें. आई, वडील, भावंडें आणि आजोबा-आजी असल्यास त्यांचेंहि. हें सर्व कुटुंब कोणाचें आहे ? म्हणजे कोणत्या समाजाचें आहे, देशाचें आहे, राष्ट्राचें आहे, धर्माचें आहे, संस्कृतीचें आहे – हेहि सारे प्रश्न यामागोमागच येतात. आणि याशिवाय आणखी एका गोष्टीचा विचार याच वेळीं करावा लागतो – तो म्हणजे राष्ट्रभाषा, मातृभाषा.

भारतीय समाजाचें एक कुटुंब, हिंदुस्थान देशांतील एक कुटुंब, भारतीय राष्ट्राचें कुटुंब, हिंदु धर्माचें कुटुंब, हिंदु संस्कृतीचें कुटुंब आणि अखेर एक मराठी कुटुंब असाच उल्लेख केला जातो. कुटुंब म्हणजेच घर. याचा अर्थ कुटुंबाचें, घराचें कांहींतरी स्वतःचें असें वैशिष्ट्य असतें.

भारतीय समाजाला थोर परंपरा आहे. हिंदुस्थान देशाला दिव्य भव्य इतिहास आहे. भारतीय राष्ट्राला स्वतःची अस्मिता आहे. हिंदु धर्माला अतिप्राचीन थोर वारसा आहे. हिंदु संस्कृतीला अभिमानास्पद, अतूट, अखंड असा गौरव आहे. मातृभाषा मराठी हा तर आपला अभिमानास्पद ठेवा आहे. मग यांपैकीं, आपल्या अलीकडच्या, विशेषतः शहरांतील पांढरपेशा मध्यमवर्गीय कुटुंबांत – घरांत वरीलपैकीं कशा-कशाच्या खुणा तुम्हांला आढळतात ? कशावरून म्हणायचें हें भारतीय, हें मराठी घर आहे म्हणून ? आंतून अथवा बाहेरून पाहिल्यावर असा कोणता ठसा पाहणाराच्या मनावर उमटतो, कीं जो तें घर भारतीय आहे, मराठी आहे असें सिद्ध करतो ?

वर हा मुख्यतः निवारा आहे. ऊन-वारा-पाऊस; तसेंच चोर, जनावरें, उपद्रवी कीटक अशा अनेक तऱ्हांच्या त्रासांपासून, संकटांपासून निवारा, रक्षण ही कल्पना या 'वरा'मागें आहे. कशाकशाचें रक्षण या घरांत व्हावें अशी अपेक्षा असते ? 'अर्थात् माणसाचें !' हें उत्तर चूक नव्हे, पण अपूर्ण आहे. माणसाला दोन कान, दोन डोळे, एक नाक इत्यादि अवयव असतात. तितके अवयव असलेला म्हणजे माणूस असेंहि सांगून भागणार नाहीं. त्या माणसाच्या ठिकाणीं जी माणुसकीची भावना आहे तिच्यासह असलेली ही मानवाकृति इतका वास्तविक अर्थ त्यांत अभिप्रेत आहे; निदान असायला हवा.

पण माणूस कांहीं आकाशांतून पडत नाहीं कीं हवेंत तरंगत नाहीं. माणूस कोणत्या तरी एका विशिष्ट समाजांत जन्माला येतो, त्यांतच वाढून लहानाचा मोठा होतो नि मगच माणूस म्हणून तो ओळखला जातो. याचा अर्थ समाजविरहित माणूस अशी कल्पनाच आपण करूं शकत नाहीं. लांडग्याच्या कळपांत अगदीं लहानपणापासून वाढलेल्या मुलांच्या गोष्टी आपण ऐकतों. त्या मुलांना माणूस – आपल्यासारखा माणूस – समजायची कांहीं आपली तयारी नसते. त्याला आपण 'लांडगा-मुलगा' ( वुल्फ बॉय ) असेंच म्हणतों. हा जो फरक आहे तो संस्कारांचा. म्हणजे माणसांच्या समाजांत त्या मुलावर लहानपणापासून होणारे संस्कार आणि लांडग्यांच्या कळपांत होणारे संस्कार यांत फरक आहे. आणि हाच फरक महत्त्वाचा आहे. या संस्कारांतील फरकामुळेंच माणसाचा पशु बनतो. आणि कांहीं प्रमाणांत या संस्कारांनीं पशू सुद्धां माणसाच्या जवळपास येऊं शकतो; त्यालाच आपण माणसाळलेला असें म्हणतों. मूल जन्मल्यापासून त्याच्यावर प्रत्यक्षपणें, अप्रत्यक्षपणें संस्कार करीत करीत त्याला माणूस बनविण्याच्या दृष्टीनें आपल्या भारतीय संस्कृतीनें, हिंदु धर्मानें फार सूक्ष्म विचार करून तपशीलवार योजना केलेली आहे. आज तिचा लोप होत चालला तरी ती ग्रंथांतून नमूद आहे.

हे सर्व संस्कार करण्याचें मुख्य ठिकाण म्हणजेच घर. म्हणूनच आपल्या संस्कृतींत घराला फार मोठें महत्त्व दिलेलें दिसेल. घराचें घरपण खरें या संस्कारांवर अवलंबून आहे. मग एक वेळ हे संस्कार वनांतल्या एखाद्या पर्णकुटींत, झोपडींत केले तरी तें 'घरच' ठरेल; पण उलट वैभव-संपन्न राजवाड्यांतहि तेथील मुलांवर जर असे संस्कार होत नसतील तर तें 'घर' या पदवीला पात्र होणार नाहीं.

म्हणजे तुम्ही ज्याला ' आपलें घर ' म्हणतां तें प्रथम वरील अर्थानें संस्कार करणारें 'घर' असलें पाहिजे; आणि दुसरें तें 'आपलें' म्हणण्याइतकें तुमचें स्वतःचें वाटण्यासारखें असलें पाहिजे. घराची मालकी कोणाची आहे, तुम्ही स्वतःच्या मालकीच्या घरांत राहतां का भाड्यानें बिऱ्हाडांत राहतां हा प्रश्न तितकासा महत्त्वाचा नाहीं. तुम्ही ज्या चार भिंतींत राहतां त्या बिऱ्हाडांतहि तुमच्यावर—तुम्हां मुलांवर तुमचे स्वतःचे असे संस्कार त्या जागेंत होत आहेत का, हाच महत्त्वाचा मुद्दा.

तुमच्यापैकीं कोण कोणत्या जातीचा आहे, हाहि विचार नंतरचा. प्रथम तुम्ही एकाच भारतीय धर्मसंस्कृतीचे, भारतीय राष्ट्रीयत्वाचे आहांत आणि नंतर महाराष्ट्रीय-मराठी आहांत. त्यानंतर मग तुम्ही ब्राह्मण, मराठा, कुणबी कीं महार, कोण हा विचार. पण तुम्हां सर्वांवर कांहीं किमान आवश्यक संस्कार तुमच्या घरांत लहानपणापासून व्हायला हवेत हा आग्रह आहे.

अशा प्रकारचे संस्कार ज्या घरांतून घडतात, वडविले जातात तेंच तुमचें खरें ' आपलें घर. ' चोरी करूं नये, दुसऱ्याचें लुबाडून घेऊं नये, खोटें बोलूं नये, दुसऱ्याच्या उपयोगी पडावें अशा नीतीच्या गोष्टी तर कोणालाहि घरांत सामान्यपणें सांगितल्या जातातच; पण एवढ्यानें भागत नाहीं. माणूस कणखर बनण्यासाठीं आणखीहि अनेक संस्कार त्याच्यावर व्हावे लागतात. त्यांत पुढील शिकवण अवश्य आहे; माणसानें

दुर्बळ राहूं नये, सशक्त झालें पाहिजे. स्वतः अन्याय कोणावर करूं नये, तसा अन्याय सहनहि करूं नये. अहंमन्य असूं नये, नम्रता ठेवावी। पण; त्याचबरोबर स्वाभिमान आणि तेजस्वीपणा यांना पारखें होऊं नये. या व यासारख्या गोष्टीहि मुलांच्या मनावर लहानपणापासून बिंबविल्या पाहिजेत. परंतु तरीहि वरील सर्व गोष्टी माणुसकीच्या म्हणुन सर्वसामान्यच झाल्या. अस्सल भारतीयत्वाचे धार्मिक-सांस्कृतिक, सामाजिक-राष्ट्रीय असे विशिष्ट संस्कार प्रत्येक भारतीय घरांतून व्हावेत हा खरा आग्रह आहे. त्यासाठीं अगोदर हें भारतीयत्व कशाकशानें येतें, त्याचे विशिष्ट संस्कार कोणकोणते याची माहिती करून घेतली पाहिजे; आणि मग ते मुलांच्या मनावर बिंबविण्याचा पद्धतशीर, चिकाटीनें, कसून प्रयत्न केला पाहिजे. 'राष्ट्रीय चारित्र्य', 'राष्ट्रीय एकात्मता' हे जे आजकाल मोठमोठे शब्द जाहीर लेखां-व्याख्यानांतून वापरले जातात ह्या शब्दांना खरा आवश्यक तो अर्थ प्राप्त व्हावयाचा असेल आणि त्यांचा प्रत्यक्ष इष्ट व्यवहार या विशाल राष्ट्रांत दिसावयाचा असेल तर त्यासाठींहि प्रथम 'आपल्या घरा'पासूनच प्रारंभ करावा लागेल.

ऑक्टोबर १९६३

■ ■ ■

## आपलें घर – कसें होतें, आहे, असावें ?

आज सर्वसाधारणपणें एकंदर जगांतच आणि विशेषतः, आपल्यापुरता विचार करावयाचा तर, आपल्या देशांत – भारतांत 'आपलें घर' ही वस्तु जाग्यावर कशी राहणार, राहणारच कीं नाहीं अशी शंका किंवा काळजी वाटण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झालेली आहे. जगांतील आणि

या देशांतील – राजकीय स्वार्थाच्या आहारीं गेलेले सोडून – जे विचारवंत आहेत त्यांना या गृहनिर्मूलनाची भयंकर भीति भेडसावीत आहे. घर मोडणार नाहीं, तें जाग्यावर कसें राहील यासाठीं उपाययोजना ही मंडळी आपापल्यापरी सुचवीत आहेत. फटिंग, गृहहीन मनुष्य बेदरकार, बेजबाबदार असणेंच जास्त शक्य असतें, हें सिद्ध करण्यासाठीं ग्रंथ लिहिण्याची कांहीं गरज नाहीं. उलट घर – पार्थिव नि भावनिक – असलेला, त्याच्याशीं निगडित झालेला, किंवा वाटल्यास जखडलेला म्हणा; माणूस समाज म्हणून कांहीं मानतो; त्याचीं बंधनें एखाद वेळीं जाचक वाटलीं तरी स्वीकारतो, हेंहि सिद्ध करण्यासाठीं प्रयोग करण्याची गरज नाहीं. माणसाच्या या घरांनींच समाजाची धारणा होत असते हेंहि निर्विवाद सत्य आहे.

पण, मग हें घर टिकविण्यासाठीं जाणीवपूर्वक पद्धतशीर असे कांहीं उपाय योजण्याची गरज आहे कीं नाहीं ? विशेषतः प्रौढ वाचकांपुढें हा प्रश्न विचारासाठीं ठेवावा असें वाटतें. आणि त्याचबरोबर हें 'घर' नुसतेंच 'घर' न रहाता 'आपलें घर' – भारतीय घर कसें राहील, टिकेल याचाहि विचार व्हावा, असें मनांत येतें.

ज्या लाल साम्यवादाचा ( कम्युनिझमचा ) आपल्याला तिटकारा येतो, भीतीहि वाटते त्या लाल साम्यवादाचा परिपूर्ण प्रयोग करणाऱ्या चीनमधील 'कम्यून्स'च्या हकीकती वाचल्या म्हणजे आपल्या अंगावर शहारे येतात. घर ही वस्तूच, भावनाच नष्ट करण्याचा तो एक पद्धतशीर प्रयत्न आहे हें आपल्या लक्षांत येतें. मानवी गुणांचा उत्कर्ष साधण्यास हा प्रयत्न मारक आहे हेंहि आपल्या लक्षांत येतें. मग जी घातकी स्थिति चीनमध्यें राजकीय सत्ताधाऱ्यांनीं सत्तेच्या बळावर बळजबरीनें तेथील लोकांवर लादली तशीच परिस्थिति आपल्या देशांत आपण होऊन – भविष्यकालांत का होईना – ओढवून घेत आहोंत कीं काय याचा विचार आपल्याला कर्तव्य नाहीं क ?

आपलें भारतीय घर पूर्वी कसें होतें, आज कसें आहे नि पुढें कसें असावें ह्याची चर्चा हा एक फार मोठा प्रबंधाचा विषय आहे. तथापि, या लेखापुरता अगदीं थोडक्यांत या विषयाचा विचार – अर्थात् अगदीं मर्यादित -- येथें करतां येईल.

वेदकालीं म्हणजे अतिप्राचीन काळीं आपलें घर कसें होतें याची माहिती वेदमूर्ति पं. सातवळेकर आणि डॉ. वाटवे इ.च्या ग्रंथांतून सविस्तर आली आहे. ती वाचली तर आपलें घर प्राचीन काळीं कसें होतें याची कल्पना येऊं शकेल. मुसलमानी अमदानींत आमचें घर फारसें बदललेलें दिसत नाहीं. मात्र ब्रिटिश राजवटीनें तें आमूलाग्र बदलून टाकलें हें कबूलच केलें पाहिजे. आणि आज स्वातंत्र्य येऊन – मिळवून नव्हे ! – पंधरा वर्षांपेक्षां अधिक काळ लोटला तरी त्या आमूलाग्र बदललेल्या घरांत आपल्याकडून कांहीं इष्ट, आवश्यक बदल घडले आहेत असें फारसें दिसत नाहीं. उलट त्या बाबतींत आपण दिवसानुदिवस अधिकाधिक परावलंबी, अंधानुकरणी आणि सर्वांत वाईट म्हणजे कृत्रिम होत चाललों आहोंत असें दिसून येईल. याचें बरेंचसें श्रेय ( ! ) 'राजा कालस्य कारणम्' या न्यायानें विद्यमान 'निधर्मी' राजवट राबविणाऱ्या नोकरशाहीकडे येतें, हें मान्य करायलाहि हरकत नसावी. कृत्रिमता आणि मिथ्याचार किंवा ढोंग यांच्यांतील सीमारेषा अति सूक्ष्म, वरवर पाहतां न दिसणारी अशी असते. अधिक वाईट म्हणजे त्या मिथ्याचाराकडे – ढोंगाकडे आपण अधिकाधिक झुकत चाललों आहोंत कीं काय अशी साधार भीति वाटते; आणि तसें असेल तर त्याला मात्र मुख्यतः राजकीय वातावरणच जबाबदार आहे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं.

समता, स्वातंत्र्य आणि लोकशाही या गोष्टी आपण पाश्चिमात्यांकडून घेतल्या असें कांहीं विद्वान् मंडळी सांगतात. त्या समता – स्वातंत्र्य – लोकशाहीचा गैरवापर आपण केवळ राजकीय क्षेत्रांतच करतों आहोंत असें नव्हे, तर तो आपल्या घराघरांतून, कुटुंबाकुटुंबांतून

क्र. १५९२०


आता सुरू झाला आहे, असें थोडें अंतर्मुख होऊन पाहिल्यास आपल्या लक्षांत येईल. राजकीय बाबतींतील या त्रयीच्या गैरवापरामुळें काय अनिष्ट झालें, होत आहे किंवा भविष्यकाळांत होईल हा प्रस्तुत चर्चेचा विषय नव्हे. तथापि, तें अनिष्ट राष्ट्रमंदिराच्या पायावरच घाव घालूं पहात आहे एवढें आपण उमजलों तरी पुष्कळ झालें ! आपल्या घराच्या बाबतींत सुद्धां नेमकी हीच स्थिति येऊं पहात आहे असें त्या दृष्टीनें पाहणाराच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

जुनीं मोठीं घरें मोडलीं. एकत्र कुटुंबपद्धति नष्ट झाली. चाळींतल्या एका खोलींत 'तो-ती' चिमुकला संसार थाटला गेला. आर्थिक, औद्योगिक, सामाजिक स्थित्यंतरामुळें हें घडलें असें आपण समजूं. पण जुन्या घराबरोबर मनाची – विचाराची भव्यता व दिव्यता गेली. एकत्र कुटुंबपद्धतीबरोबर कौटुंबिक जिव्हाळा मर्यादित झाला, किंबहुना हिणकस झाला. आणि चाळींतल्या चार भिंतींत सर्व तऱ्हेच्या – मानसिक, शारीरिक, सामाजिक, कौटुंबिक – विशालत्वाचा, विस्तृततेचा भव्यतेचा, दिव्यतेचा, मोकळेपणाचा, नैसर्गिकतेचा थोरपणाचा, कोंडमारा झाला. त्यावर आपण काय उपाय योजला ? 'यो वै भूमा तत् सुखम्' अशा भव्यतेंत, विशालत्वांत सुख पाहणाऱ्या भारतीय संस्कृतीच्या वारसदारांना 'छोट्याशा, चिमुकल्या, इवल्याशा घरट्या-मधल्या' खुरटलेल्या गृहसंसाराचे गोडवे गाण्यांत गौरव वाटूं लागला. 'नाल्पे सुखमस्ति' या मंत्राऐवजीं 'सुंदर सान छोटें छान' असा मंत्र आपण घोकूं लागलों. परंतु चालू जमान्याशीं – म्हणजे त्यांतल्या उद्घोषणांशीं हें अल्पप्रेम, ही संकुचितता विसंगत असल्यामुळें तसें तोंडानें म्हणणें किंवा कबूल करणें कमीपणाचें वाटूं लागलें. म्हणून मग मार्ग पत्करला तो मनानें मोठें होण्याचा, वर्तनानें विशाल बनण्याचा नव्हे तर वाणीनें वाग्गौरव करण्याचा, मुळांत नसेल त्याचा देखावा करण्याचा !

[illegible] ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
क्रमांक ...७७६९० ... वि. निबंध

आज आपलें घर कसें आहे ? सार्वजनिक नळावर लावलेल्या “ जाहीर नोटिशी ”सारखें ! जाहीर हा शब्द उर्दू म्हणजे परकीय; नोटिस हा इंग्रजी; ते दोन्ही लिहिलेले असतात मराठी नागरी लीपींत; तेहि अशुद्ध ! आणि सार्वजनिक नळावर लावलेली ‘नोटिस’ कोणी कधींच वाचीत नसतें आणि त्याप्रमाणें वागत तर कोणीच नसतें.

आमच्या आजच्या घराचा तोंडावळा आहे इंग्रजी-पाश्चिमात्य, परकीय भौतिक संस्कृतीची छाप असलेला. आपली राहणी ना धड पौर्वात्य (भारतीय तर नाहींच नाहीं), ना पूर्ण पाश्चिमात्य; म्हणजेच उर्दूसारखी ! धेडगुजरी, सरभेसळ, बिनबुडाची. त्या सार्वजनिक नळावर लावलेल्या मजकुरांत सार्वजनिक हिताचे नियम असतात त्याप्रमाणें आपल्या पोथ्या-पुस्तकांतून नि संतग्रंथांतून अनेक जनकल्याणाच्या, तसेंच कौटुंबिक व व्यक्तिहिताच्या गोष्टी सांगितलेल्या असतात. परंतु त्या उघडून वाचण्याचे श्रम आपण कधीं घेत नाहीं; आणि वाचले तरी ते वाचण्यापुरतेच असतात अशी ( गैर ) समजूत सोयिस्कर रीतीनें करून घेऊन त्याप्रमाणें वागण्याचें तर आपल्या कधींच मनांत येत नाहीं. पाश्चिमात्यांच्या सुधारणा घेतलेले आपण सुधारलेले म्हणविणारे सुसंस्कृत, ‘नाईटसूट’चा पट्ट्याचा पायजमा घालून सार्वजानिक रस्त्यानें खुशाल दिवसाढवळ्याहि हिंडतों; त्यांत गैर आपल्याला कांहीं वाटत नाहीं. मराठीचा अभिमान मिरविणाऱ्या आम्हांला आपल्या मुलानें ‘डॅडी’ म्हणण्यांत धन्यता वाटते. ‘टाटा’ तर ( अर्थ माहीत नसतांनाहि ) आतां अशिक्षित निरक्षरांपर्यंत जाऊन पोहोंचला. मूल बोबडें बोलूं लागण्यापूर्वींच त्याच्या तोंडांत हा ‘टाटा’ कोंबण्याची आपल्याला कोण घाई ! आपलीं मुलें अद्ययावत् बनविण्याच्या हौसेनें कॉन्व्हेंट स्कूलमध्यें घातलेलीं मुलें गणेशचतुर्थीला ‘ गणपतीचा बर्थ-डे ’ म्हणूं लागलीं याकडे आपलें लक्ष नाहीं. रक्त सांडून मराठीचें राज्य मिळविणाऱ्या आपल्या किती मराठी ( सुशिक्षित ) घरांतून ‘ज्ञानेश्वरी’, ‘गाथा’, ‘दासबोध’ सांपडेल ? किती किती घरांत

शिवछत्रपतींचें किंवा लोकमान्यांचें सुंदर चित्र टांगलेलें दिसेल ? ‘ आपलें घर ’ म्हणायजोगें आपल्या मराठी घरांत काय शिल्लक आहे ? खुर्ची, टेबल, रेडिओ ! या निर्जीव वस्तूंनीं घर बनतें ? – आणि ‘ आपलें घर ’ म्हणायजोगें आपल्या भारतीय घरांत काय जाग्यावर आहे ? भगवद्‌गीता, एखादी देवमूर्ति, एखादी तसबीर ? – देश नि राष्ट्र जसें दगडामातींनीं बनत नसतें तसें ‘घर’सुद्धां सीमेंट-विटांनीं तयार होत नसतें. त्याला लागतात कौटुंबिक जिव्हाळा, सामाजिक भावना, राष्ट्रीय अस्मिता, पूर्व-परंपरेचें ज्ञान नि जाणीव – या नि असल्या गोष्टी

नोव्हेंबर १९६३

■ ■ ■

## समृद्ध जीवनाकडे –

एखादी सुंदर भव्य इमारत तुम्ही पहातां. ती पाहून तुमच्या डोळयांना बरें वाटतें, तुमचें मन प्रसन्न होतें. ती इमारत ज्यानें बांधली असेल त्याच्याबद्दल तुमच्या मनांत आदरभाव उत्पन्न होतो, त्याचें कौतुक वाटतें. पण एखादवेळीं भूकंप झाला आणि त्या इमारतीचा पायाच उखडून गेला; किंवा एखाद्या वेड्या महंमदाच्या डोक्यांत आलें कीं, या इमारतीचा पायाच काढून टाकावा, तो निरुपयोगी झालेला आहे; तर त्या दृष्टीला दिसणाऱ्या सुंदर, भव्य इमारतीचें काय होईल ? तिथें काय दिसेल ? तिथें इमारत जाग्यावर दिसणारच नाहीं; दिसलीच तर त्या इमारतीचे उद्ध्वस्त खंड मात्र इतस्ततः विखुरलेले दिसतील.

ज्या भारतीय संस्कृतीचे आपण गोडवे गातों आणि तिची थोरवी सांगतों, त्या भारतीय संस्कृतिभवनाचा पाया म्हणजे संस्कृत भाषा. पारतंत्र्याच्या दीडशें वर्षांत संस्कृतचा जाणूनबुजून ऱ्हास करण्यांत आला;

आणि स्वातंत्र्याच्या गेल्या पंधरा वर्षांच्या काळांतहि तिच्याकडे पुरेशा आस्थेनें लक्ष पुरविलें गेलें नाहीं. आतां अलीकडे पुनः संस्कृतच्या पुनरुज्जीवनाची कल्पना सरकारच्या मनांत आणि जाणत्यांच्या ध्यानांत आली आहे असें दिसतें. तथापि, अजूनहि संस्कृत ही पदार्थसंग्रहालयांत ( म्यूझियम ) जतन करून ठेवण्याची एक वस्तु एवढीच मर्यादित भावना अनेकांच्या मनांत वावरतांना दिसते; आमच्या राष्ट्रीय जीवनाचा, हिंदुस्थानाच्या इतिहासाचा, भारतीय संस्कृतीचा तो मूलस्रोत आहे आणि त्याच दृष्टीनें तो जतन करून जोमानें वाढवीत ठेवला पाहिजे, सतत जिवंत राखला पाहिजे ही जाणीव प्रकर्षानें आढळत नाहीं. आणि नेमक्या याच उणीवेकडे लोकांचें लक्ष वेधावें – तुम्ही मुलें, तुमचे पालक आणि शिक्षक यांचें लक्ष वेधून घ्यावें म्हणून हा प्रयत्न आहे.

आमची राष्ट्रीय एकता, तादात्म्यता यांचा संस्कृत हा तर प्राण आहे. हिंदुस्थानाच्या एकतेचा असा एकहि मुद्दा नाहीं कीं ज्याचा संस्कृतशीं संबंध नाहीं, जो संस्कृत भाषेवर अवलंबून नाहीं. आमचा इतिहास, आमचा धर्म, आमची संस्कृति, आमचीं शास्त्रें, आमच्या कला, आमचे आचारविचार – सारें सारें या संस्कृत सरितेनें आमच्यापर्यंत वाहत आणलें. ती सरिता वाहत आहे म्हणून तें सारें अद्यापि जिवंत आणि गतिमानहि आहे. ही सरिता आटली तर एखाद्या निराधार, अनाथ, पोरक्या, अधांत्रीं लोंबकळणाऱ्या माणसासारखी आपली स्थिति होईल.

यासाठीं, संस्कृत भाषेचा, साहित्याचा परिचय तुम्हीं करून घेतला पाहिजे. संस्कृत ही शिकायला खरोखरीच अवघड नाहीं; आणि ती तशी असली तरी आपलें सांस्कृतिक, राष्ट्रीय कर्तव्य म्हणून ती शिकली पाहिजे, आवश्यक झालें तर कष्ट करूनहि शिकली पाहिजे. सरकारनें संस्कृत भाषेचा अभ्यास माध्यमिक शाळांतून सक्तीचा-अनिवार्य करावा अशासाठीं राष्ट्रहितैषी मंडळी खटपट करीतच आहेत. सरकार ती गोष्ट मान्य करून अमलांत आणील तो सुदिनच ! तथापि, तुम्ही मुलांनीं संस्कृत

शिकण्याचा हट्ट धरून तशी ईर्षा बाळगून संस्कृतच्या अभ्यासाकडे आपण होऊन वळलांत तर ती अत्यंत आवश्यक अशी राष्ट्रीय हिताची गोष्ट लवकर घडून येण्यास मदत होईल.

एखादें तरी संस्कृत भाषेंतील पुस्तक तुम्हीं संपूर्ण वाचलें पाहिजे. तुम्हांला थोडीं तरी संस्कृत स्तोत्रें पाठ आलीं पाहिजेत. सोपें संस्कृत बोलणें तुम्हांला समजलें पाहिजे. एकंदरींत संस्कृत तुम्हांला परकी किंवा तुम्ही तिला परके वाटत कामा नये. आजीबद्दल नातवाला जितकें प्रेम आणि आदर वाटावा तितका तुम्हांला संस्कृतबद्दल अवश्य वाटला पाहिजे. तिच्या अध्ययनानें तुमचें मन सुसंस्कृत होईल. तिच्या पठणानें तुमची वाणी शुद्ध होईल. सुसंस्कृत मनांत सुसंस्कृत विचारांचा उगम होईल आणि त्यांचा उच्चार शुद्ध भाषेंतून तुम्ही करूं शकाल. सुसंस्कृत व शुद्ध विचार-उच्चारांतूनच सुंदर आचार संभवतो आणि सुंदर आचारांतून सम्पन्न समृद्ध जीवनाची प्राप्ति होत असते – हें निरंतर लक्षांत ठेवा.

• • •

राष्ट्रीय चारित्र्य एका दिवसांत घडत नाहीं. देशाचें राष्ट्रीय सामर्थ्य चुटकीसरसें तयार होत नाहीं. नव्या पिढीची राष्ट्रीय चारित्र्यनिर्मिती हें कणाकणानें आणि क्षणाक्षणानें घडणारें, सातत्यानें चालणारें, दीर्घकालीन असें काम आहे.

आज आपल्या देशावर परचक्र येऊन कोसळलें आहे; आणि त्याच्या निवारणासाठीं मातृभूमीच्या नांवानें, राष्ट्राच्या नांवानें देशांतले नेते हाक फोडीत आहेत. अगदीं स्वच्छ शब्दांत सांगावयाचें तर तहान लागल्यावर विहीर खणावयास लागण्याचाच हा प्रकार आहे. आपल्या देशाला जें भलेंबुरें स्वातंत्र्य मिळालें त्याला आतां पंधरा वर्षें होऊन गेलीं. सव्वा तपाचा काळ लोटला. एका तपांत इकडची सृष्टि तिकडे करतां येते – पण ती तपानें ! आपण यासाठीं कांहीं तप केलें का ? तसें दिसत नाहीं. फार तर 'तप करायला हवें' 'तप करायला हवें' असें आपण नुसतें

तोंडानें म्हणत राहिलों असूं; प्रत्यक्षांत मात्र तें कधींच केलें नाहीं की नव्या पिढीकडून तें करवून घेण्याचा कसोशीनें प्रयत्न केला नाहीं. आणि याचा परिणाम – तपाच्या अभावाचा परिणाम – सर्व तऱ्हेच्या राष्ट्रीय तापांत झाला, होत आहे आणि कदाचित् आणखी बराच काळपर्यंत होत राहील असेंहि दिसत आहे. हा ताप राष्ट्रीय आहे म्हणजे देशांत सर्वत्र आहे, सर्वांना आहे; समाजाला आहे आणि व्यक्तीलाहि आहे. आणि त्याला आपण सर्वचजण जबाबदार आहोंत – सामुदायिकरीत्या आणि व्यक्तिशः सुद्धां.

तथापि, अजून कांहीं सारें संपलें असें नाहीं. राष्ट्राचा इतिहास पिढ्यांनीं मोजावयाचा असतो. तेव्हां, जें चालू पिढींत घडलें नाहीं तें पुढील – नव्या उगवत्या पिढींत तरी घडावें, घडवावें अशी खरोखरीच इच्छा असल्यास, तशी तळमळ लागली असल्यास त्याकरितां मनापासून कामाला लागलें तर इष्ट तें घडवून आणतां येईल. आदर्श भारतीय नागरिक म्हणजे जगाच्या प्रगतीकडे पाठ फिरविलेला; कोणत्याहि तऱ्हेच्या धार्मिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय स्वाभिमानाला पारखा झालेला; कसल्याहि प्रकारच्या अपमानानें वा अत्याचारानें चीड न येणारा; अथवा स्वतःच्या राष्ट्रीय सुरक्षिततेबद्दल पूर्ण बेफिकीर असलेला नि जगाच्या शांतता-सुख-स्वास्थ्यासाठीं रात्रंदिन काळजींत झुरणारा कोणी अलौकिक असामान्य पुरुष असावा अशी आपली समजूत करून दिली गेली त्याचे दुष्परिणाम भोगावयाचे ते अजून पुढेंच आहेत. परंतु या फसव्या समजुतीच्या जाळ्यांत निदान नवी पिढी फसूं नये, तिनें जग आणि आपणहि जसें आहे तसेंच समजून घ्यावें, त्याच्या धक्काबुक्कींत टिकून रहातां येईल अशीच आपली शारीरिक-मानसिक, व्यक्तिगत-राष्ट्रीय बैठक बनवावी हें आवश्यक आहे. आम्हांला, या देशांत स्वाभिमानानें कसें जगावें आणि जरूर तेव्हां इतरांनाहि जगवावें हें अंगांत बाणविणारा सुसंस्कृतपणा या देशांतील नव्या उगवत्या पिढीला शिकवावयाचा आहे. मग त्यासाठीं

संगीतापासून समशेरीपर्यंत आणि नम्रतेपासून प्रखरतेपर्यंत जें जें शिकवावें लागेल तें तें सारें सांस्कृतिक या सदरांत मोडतें असें गृहीत धरून शिकविण्याचा आपला संकल्प हवा.

डिसेंबर १९६२

■ ■ ■

## नमस्कारांतील संस्कृति

आपण भारतीय एकमेकांना भेटलों म्हणजे नमस्कार करतों. दोन्ही हात जोडून, डोकें व मान वाकवून आपण नमस्कार करतों.

आपल्या देशांत असा नमस्कार करतांना कांहीं शब्दहि उच्चारले जातात. महाराष्ट्रांतली खेडूत मंडळी एकमेकांना भेटली म्हणजे म्हणतात " राम राम ". गुजराथेकडील लोक म्हणतात " जय गोपाळ ". आणखी कांहीं जण नमस्कार करतांना एकमेकांना म्हणतात " जय देवा ". संन्यासी असतात ते दुसऱ्याला प्रत्यक्ष नमस्कार करीत नाहीत; तरीपण म्हणतात "नारायण."

देशांत निरनिराळया ठिकाणीं असे निरनिराळे शब्द उच्चारले जात असतात. या सगळयांचा अर्थ एकच – परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे. समोर दिसणाऱ्या व्यक्तीला त्याच्याच रूपानें समजून नमस्कार करावयाचा. देवाला किंवा संत-सत्पुरुषांना नमस्कार करतांना आपण साष्टांग नमस्कार घालतों. शरीराचीं आठहि अंगें – अवयव जमिनीला टेंकवून नमस्कार करतात त्याला म्हणावयाचें साष्टांग – स + अष्टांग = आठ अंगांसह. पूजनीय व्यक्तीला किंवा देवाला विशेष आदरभाव दाखविण्यासाठीं साष्टांग नमस्कार घालतात. श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे : साष्टांग नमस्कारास अधिकारू। नाना प्रतिमा देव गुरू ॥ "

नमस्काराची महती श्रीसमर्थांनीं अशी सांगितली आहे :

**नमस्कारें लीनता घढे। नमस्कारें विकल्प मोडे।**
**नमस्कारें सख्य घडे। नाना सत्पात्रासीं ॥**
**नमस्कारें दोष जाती। नमस्कारें अन्याय क्षमती।**
**नमस्कारें मोडलीं जडती। खमाधानें।**

इतकेंच काय पण –

**परम अन्याय करूनि आला। आणि साष्टांग नमस्कार घातला।**
**तरी तो अन्याये क्षमा केला। पाहिजे श्रेष्टीं ॥**

आपण देवाला नमस्कार करतों. आई-वडिलांना नमस्कार करतों. सूर्याला नमस्कार करतों. इतकेंच काय मुक्या गाईला नि निर्जीव वाटणाऱ्या दिव्यालाहि नमस्कार करतों. आपल्या संस्कृतींत नमस्काराला मोठें महत्त्व आहे. असा नमस्कार करण्यांत परमेश्वर सर्वत्र भरला आहे ही खरोखरी भावना असते; त्याची जाणीव मात्र आपल्याला झाली पाहिजे.

दुसऱ्याला नमस्कार करण्यांत स्वतःबद्दलचा अहंपणा नाहींसा करण्याचें शिक्षण असतें दुसऱ्याला नमस्कार करण्यांत दुसऱ्याबद्दल आदर दाखविण्याचें वळण असतें. हंसतमुखानें, हात जोडून केलेला नमस्कार हें खरोखरीच सुसंस्कृतपणाचें बोलकें चिन्ह आहे.

पहांटे उठल्याबरोबर अंथरुणांतून बाहेर पडण्यापूर्वींच देवाचें नामस्मरण करावें, त्याला नमस्कार करावा अशी आपल्याकडे पद्धत आहे. उठून बाहेर आल्यानंतर 'विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे' असें म्हणून भूमातेला आपण नमस्कार करतों. प्रातःकाळचे विधि आटोपल्यावर 'वक्रतुंड महाकाय' म्हणून आपण सर्वारंभीं गणपतीला नमन करतों. कांहीं घरांतून आई-वडिलांना व घरांतील वृद्ध मंडळींनाहि नमस्कार करण्याची पद्धत आहे.

स्नानाच्या वेळीं त्या गंगारूप जलाला नमस्कार करावयाचा. तदनंतर प्रत्यक्ष देवपूजेंत नमस्कार आहेच. जेवायला बसतांनाहि अन्नब्रह्माला

नमस्कार. अध्ययनाला प्रारंभ करण्यापूर्वी अक्षरब्रह्माला, श्रीगजाननाला किंवा देवी शारदेला नमस्कार.

सायंकाळीं दीपज्योतीला नमस्कार केवळ मुलेंच करतात असें नव्हे, तर दिवे लागले कीं, भारतीय संस्कृतींत वाढलेल्या मोठ्या माणसांचेहि हात उजळत्या दिव्याला आपोआप जोडले जातात. दिवसाचे सर्व कार्यक्रम आटोपून रात्रीं अंथरुणावर अंग टाकतांनाहि देवाला नमस्कार करूनच कोणीहि भाविक भारतीय झोंपीं जातो.

नमस्कार हा जणुं भारतीय संस्कृतींत सर्वत्र भरून राहिलेला आहे. श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे :

**याकारणें नमस्कारापरतें। आणीक नाहीं अनुसरतें।**
**नमस्कारें प्राणीयातें। सद्बुद्धि लागे॥**

मार्च १९६२

■ ■ ■

## जोंवर आमच्यांत राम आहे

पाण्यावांचून पृथ्वी, माणसावांचून घर, हृदयावांचून माणूस, स्वरावांचून संगीत, रेषेवांचून चित्र किंवा शब्दावांचून साहित्य हीं सर्व जशीं निरर्थक, व्यर्थ, अर्थहीन तसेच रामावांचून आपण ! पृथ्वीवर पाणीच नाहींसें झालें तर जसें येथील जीवन नष्ट होईल, पृथ्वी पृथ्वीच रहाणार नाहीं; घरांत रहायला माणसेंच नसतील तर जसें त्याला घरपण उरणार नाहीं; हृदयच बंद पडलें किंवा नाहींसें झालें तर माणसाला जसा प्रेतपणा येईल; तसेंच आमच्या जीवनांतून राम काढून टाकला तर आमच्या जीवनाचें होईल. किंबहुना स्वरावांचून संगीत जसें संभवतच नाहीं; रेषेवांचून चित्र जसें आकाराला येऊं शकत नाहीं; अथवा शब्दाशिवाय साहित्याची

निर्मितीच ज्याप्रमाणें होऊं शकत नाहीं; तद्वतच राम नसला तर आमचें अस्तित्व उभेंच राहूं शकत नाहीं.

आजकाल 'रामराज्या'च्या गोष्टी आपल्या देशांत ऐकूं येतात. पण 'राम' मात्र या राज्यांतून नि देशांतून दूर चाललेला आहे असें दिसून येतें. इतकेंच काय, रामनवमीची ( नि कृष्णाष्टमीचीहि ) सार्वजनिक सुटी देण्याची गरज न वाटण्याइतके रामापासून आपण दुरावत आहोंत ! आधुनिक काळांत एखाद्या विशिष्ट जमातीसाठीं, एखाद्या विशिष्ट गटासाठीं किंवा वर्गासाठीं, कांहीं भलें-बुरें काम करून गेलेलीं माणसें आज आम्हांला अधिक थोर वाटूं लागलीं आहेत. वास्तविक ज्या रामामुळें शिवाजीसारखे देवतुल्य, अलौकिक महापुरुष या देशांत निर्माण झाले त्या रामाला विसरून त्याच्या तुलनेनें क्षणभंगुर, अल्पमूल्य, सामान्य प्रतीच्या व्यक्तींचें पूजन या देशांत सुरू झालें आहे. पण सरड्याची धांव वईपर्यंत असते. पावसाळ्यांत उगवलेलीं रोपटीं उन्हाळा लागण्यापूर्वीच सुकून जातात. एखाद्या विशिष्ट कार्यामुळें चमकणाऱ्या व्यक्ति इतिहासाच्या अफाट पसाऱ्यांत कोठल्या कोठें गडप होऊन जातात ! अशा व्यक्ति देशाची संस्कृति नि राष्ट्राचें जीवन घडवूं शकत नाहींत. रामाचा आदर्श आज हजारों वर्षें या देशांतील जनतेपुढें राहिला. त्यामुळेंच आम्ही भारतीय म्हणून राहिलों, भारतीय म्हणून जगलों आणि भारतीय म्हणून ओळखले गेलों.

राम हा आदर्श राजा, आदर्श योद्धा आणि तसाच आदर्श पति नि आदर्श भाऊहि होता. पण याहिपेक्षां तो माणसाचा उत्कृष्ट आदर्श होता – आदर्श माणूस होता. माणसानें कसें वागावें याचा आदर्श पाठ त्यानें घालून दिला होता. आणि त्या आदर्शाच्या सांच्यांतच आपली ही भारतीय संस्कृति घडविली गेली. स्फटिकासारखें शुद्ध चारित्र्य, अग्नीसारखा प्रखर पराक्रम, तलवारीच्या धारेसारखी कठोर कर्तव्यतत्परता, पर्वतासारखी दृढ धर्मपरायणता असलेला तो राम होता

एखाद्या गोष्टींत ‘ राम नाहीं ’ असें आपण म्हणतों तेव्हां ती गोष्ट निरर्थक आहे, निःसत्त्व आहे, निरुपयोगी-निकामी आहे असें आपण समजतों. इतका हा ‘राम’ आपल्या जीवनांत ओतप्रोत भरून गेलेला आहे. तो ‘राम’ आपल्या जीवनांतून काढला गेला किंवा नाहींसा झाला तर आपलें जीवन निःसत्त्व होईल. तो ‘राम’ आमच्यांतून काढून टाकला तर कणा नसलेल्या माणसासारखी या देशाची स्थिति होईल.

तो ‘राम’ आपल्यांत कायम राखणें हें आपलें कर्तव्य आहे. नव्या पिढीला त्या ‘रामा’पासून वंचित करण्याचें पाप कोणी करील तर तो आमच्या राष्ट्र-देश-धर्म-संस्कृतीच्या दृष्टीनें अपराधी ठरेल.

एप्रिल १९६४ [ संदर्भ रामनवमी ]

■ ■ ■

## आपला आदर्श – पुरुषोत्तम श्रीराम

न हि तद्भविता राष्ट्रं यत्र रामो न भूपतिः ।
तद्वनं भविता राष्ट्रं यत्र रामो निवत्स्यति ॥

‘ जेथें राम राजा नाहीं तें स्थळ कधींहि राष्ट्र होऊं शकणार नाहीं; आणि उलट राम ज्या ठिकाणीं राज्य करीत असेल तें वनहि राष्ट्र होईल. ’ वाल्मीकींनीं लिहिलेल्या रामायणांतील ( अयोध्याकांड : ३७–२९ ) हें वाक्य नव्या पिढींतील कुमारांनीं आणि कुमारींनींहि अवश्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे; किंबहुना त्याचें चिंतन-मनन करण्यासारखें आहे.

‘आजचीं मुलें हीं उद्यांचीं नागरिक आहेत’ असें म्हणतात ना? मग त्या दृष्टीनें तुम्हीं मुलांनीं आपल्या राष्ट्राबद्दलचा विचार आजपासूनच करायला शिकलें पाहिजे. शहाणपण जसें वयावर अवलंबून

नसतें, तसें विचार करणें ही गोष्टहि वयावर अवलंबून नसते. छत्रपति शिवाजी महाराजांनीं वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षींच देशाच्या स्वराज्याचा विचार केला. आणि श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं तर बार वर्षांचे होण्यापूर्वींच विश्वाच्या कल्याणाचा विचार सुरू केला. जें स्वातंत्र्य आपल्या देशाला मिळालेलें तुम्हांला आज दिसतें आहे तें मिळविण्या-साठींहि अनेकांनीं अगदीं लहान वयापासून विचार केला होता हें लक्षांत ठेवा. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, ' आम्ही तर लहान मुलें, आम्ही कसला विचार करणार ! ' अशी शंका तुमच्या मनांत राहूं नये.

आपलें राष्ट्र कसें असावें; तें राष्ट्र चालविणारे धुरीण किंवा नेते कसे असावेत; त्या राष्ट्राचे नागरिक कोणत्या गुणांनीं संपन्न असावेत; या सगळ्याचा विचार तुम्हांला करावा लागणार आहे. तुमचें सुदैव असें आहे कीं, ज्यांना तुम्ही आपला आदर्श मानावें अशा अनेक थोर थोर व्यक्ति या देशांत आजवर होऊन गेलेल्या आहेत. तरीपण आदर्श, ह नेहमीं बावनकशी सोन्यासारखा असावा लागतो; शंभरनंबरी सुवर्णा-सारखा लागतो. आदर्श शंभर टक्के गुणांचा असेल तर त्यांतले दहा टक्के तुमच्यापर्यंत येऊं शकतात; आणि त्यांतला जेमतेम एखादा टक्का तुम्ही तुमच्या स्वतःच्या वर्तनांत आणूं शकतां. म्हणून आदर्श हा नेहमीं शुद्ध बावनकशी असावा.

आपणां भारतीयांचा आदर्श खरोखरी श्रीरामच – त्याला मर्यादा-पुरुषोत्तम असें म्हटलें आहे. या पुरुषोत्तमांत सर्व प्रकारचे थोर दैवी आणि मानवी गुण तुम्हांला आढळतील : आदर्श बंधु, आदर्श पुत्र, आदर्श पति, आदर्श राजा, आदर्श लोकसेवक, आदर्श तपस्वी, आदर्श गृहस्थ, आदर्श योद्धा – जें जें म्हणून आदर्शासाठीं हवें असेल, तें तें या श्रीरामाच्या ठिकाणीं आहे. त्यासाठीं तुम्हीं रामायण सतत वाचलें पाहिजे. अगदीं लहानपणीं बाल-रामायण तुम्हीं वाचलें असेल तर आता संक्षिप्त रामायण वाचलें पाहिजे. आणि मोठे व्हाल तसतसें संपूर्ण

रामायणाचें मराठी आणि मग मूळ संस्कृत रामायणहि तुम्हीं वाचलें पाहिजे. रामायण-महाभारत हेंच आपणां भारतीयांचें मूळ आहे. रामायणांतच असें म्हटलें आहे कीं, ‘कोणत्याहि गोष्टीचें मूळ रक्षण करून ठेवलें पाहिजे.’ **मूलमर्थस्य संरक्ष्यम्।** (किष्किंधाकांड : ६५–२५ ). रामायण किंवा महाभारत हीं नुसतीं गंमतीसाठीं, मनोरंजनासाठीं लिहिलेलीं काव्यें नव्हेत; तो आपला खराखुरा वडलेला इतिहास आहे. त्याच्या पायावरच ही भरतभूमीची प्रचंड इमारत उभी झालेली आहे. भावी भारतालाहि त्याच भरभक्कम पायाची गरज आहे.

श्रीरामाचें गुणवर्णन किती तरी करतां येण्यासारखें आहे. तो पुरुषोत्तम श्रीरामचंद्रच आपला आदर्श. ‘तो ज्या ठिकाणीं आहे त्या ठिकाणीं भय नाहीं आणि पराजयहि नाहीं –’

**यत्र रामो भयं नात्र नास्ति तत्र पराभवः।**

( अयोध्याकांड : ४८ –१५ )

एप्रिल १९६२ [ संदर्भ : रामनवमी ]

■ ■ ■

## अजरामर रामकथा

**यावत्स्थास्यन्ति गिरयः सरितश्च महीतले।**
**तावद्रामायणकथा लोकेषु प्रचरिष्यति॥**

“ जोंपर्यंत पर्वत आणि नद्या पृथ्वीवर असतील तोंपर्यंत म्हणजे चिरकाल रामकथा जगांत प्रचलित राहील ” असा आशीर्वाद प्रत्यक्ष ब्रह्मदेवांनीं रामकथेला दिलेला आहे.

जगाचा विचार क्षणभर दूर ठेवून आपण तूर्त प्रथम आणि मुख्यतः आपल्या या देशाचा – भारतवर्षाचा, हिंदुस्थानाचा, भारताचा –

विचार करूं. आणि तसा विचार करूं लागलों म्हणजे एक स्पष्ट होतें कीं, आपण भारतीय म्हणून जे कांहीं आज आहोंत त्यांच्यामधील तेजस्वितेचा अंश रामकथेनें वडविलेला आहे. आमच्यांत अजूनहि जो कांहीं थोडाबहुत राम असेल तो या कथेमुळें टिकून आहे.

इदं पवित्रं पापघ्नं पुण्यं वेदैश्च संमितम् ।
यः पठेद्रामचरितं सर्वपापैः प्रमुच्यते ॥

" हें पवित्र, पापनाशक, पुण्यप्रद आणि वेदांप्रमाणें पूज्य असें रामचरित्र जो वाचील, त्याचें मनन करील तो सर्व प्रकारच्या पापांपासून मुक्त होईल. " अशी महती रामकथेची सांगितलेली आहे; आणि ती केवळ भाविक, श्रद्धाळू, धार्मिक व्यक्तीच्या पारमार्थिक कल्याणाविषयींचीच नाहीं; तर सबंध राष्ट्राचा, समाजाचा ऐहिक अभ्युदय साधण्याचें सामर्थ्यहि त्या रामकथेंत आहे.

श्रीमत् रामायण हें लौकिक संस्कृतांतील आदिकाव्य; महर्षि वाल्मीकि हे आदिकवि; आणि उपलब्ध इतिहासांतील भारतीय संस्कृतीचा श्रीराम हा आदिपुरुष. श्रीरामाचें चरित्र घडलें त्याला आतां सुमारें साडेचार हजार वर्षें झालीं. इतका अविछिन्न काळ ही रामकथा प्रचलित राहिली आणि याच भूमींत नव्हे तर इतरत्र जगांतहि सुदूर प्रसार पावली. जगांतल्या बहुतेक भाषांत तिचीं भाषांतरें झालीं.

परंतु वाल्मीकींचें रामायण हें अद्वितीय महाकाव्य असलें, त्यांतील काव्यगुण फार श्रेष्ठ दर्जाचे असले तरी आपणां भारतवासियांना तें केवळ काव्य म्हणून आदरणीय नाहीं; तर तो प्रत्यक्ष घडलेला इतिहास म्हणून आचरणीय आहे. वाल्मीकींनीं आपल्या काव्याला दिलेलें नांव आहे रामायण. राम+अयन म्हणजे रामायण. याचा अर्थच मुळीं रामाचें शत्रूवर चालून जाणें, रामाची स्वारी, रामाची मोहीम असा आहे. किंबहुना 'रावणवध' ( ' दशशिरसो वधः ' ) असेंहि नांव या काव्याला

दिलेलें आढळतें. याचाच अर्थ रामानें रावणाच्या जुलमी राजवटीचा नाश करण्यासाठीं त्याचा वध केला त्याचाच हा इतिहास आहे.

ऐतिहासिक दृष्टीनें रामकथेचें हें महत्त्व आहे, तसेंच सांस्कृतिक दृष्टीनेंहि तें फार मोठें आहे. श्रीरामाला 'मर्यादापुरुषोत्तम' असें म्हटलें आहे. श्रीरामाच्या तेजस्वी चरित्राचा देदीप्यमान आदर्श आपणां भारतीयांपुढें आज हजारों वर्षें आहे. भारतीय संस्कृतीची वाटचाल त्याच प्रकाशांत खरी प्रगत झालेली आहे.

अलीकडच्या ऐतिहासिक काळांतील दाखलाहि असाच आहे. इस्लामची हिंदुस्थानावरील सर्वभक्षक लाट परतवून लावण्यासाठीं श्रीसमर्थांनीं याच रामकथेची कांस धरली; आणि स्वराज्यसंस्थापक छत्रपति शिवरायांनींहि श्रीरामाचाच आदर्श स्वतःपुढें ठेवला, रामकथें-तूनच स्वतःच्या कार्याची स्फूर्ति घेतली.

उज्ज्वल चारित्र्याच्या श्रीरामाचें नांव तर आपल्या देशाच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक, तसेंच ऐहिक नि पार-मार्थिकहि क्षेत्रांत अंतर्बाह्य व्यापून राहिलेलें आहे.

रामकथा भारतीय जीवनाला अशी ही सर्व प्रकारें व्यापून राहिलेली आहे. ती कधींच जुनी, जीर्ण झाली नाहीं व होणारहि नाहीं; ती स्वतः अजरामर आहे आणि आपल्या कोट्यवधि वाचक-पाठक-अनुचरांना, त्यांच्या समाजाला, देशाला नि राष्ट्राला अजरामर करण्याचें महान् सामर्थ्यहि हिच्यांत परिपूर्ण आहे.

एप्रिल १९६५

[ संदर्भ : रामनवमी ]

■ ■ ■

## परिपूर्ण कृष्ण – आपला आदर्श

गोपालकृष्णाचीं अनेक नांवें. 'नंदनंदन,' 'गोपिकावल्लभ,' 'राधारमण' अशीं त्याचीं नांवें आहेत; 'चक्रपाणि,' 'कंसारि,' 'कालियामर्दन' आणि 'योगीश्वर' व 'जगद्गुरु' अशींहि नांवें श्रीकृष्णाला आहेत. नुसता गोकुळांत खेळणारा, गोपींशीं थट्टामस्करी करणारा गुळगुळीत कृष्ण हाच कृष्ण नव्हे; तो चक्र हातांत धरून दुष्टांचें निर्दाळण आणि सज्जनांचें रक्षण करणारा पराक्रमी वीर आहे; आणि तसाच अध्यात्ममार्गांतल्या अतिशय कठीण अशा योगविद्येचा तो श्रेष्ठ अधिकारी आहे, साऱ्या जगाला मार्ग दाखविणारा थोर उपदेशक आहे, गुरु आहे. स्नेह, संयम, शौर्य, शहाणपण, अनुशासन अशा सर्व सद्गुणांचा मिळून कृष्ण होतो. शिशुपालवधाचा प्रसंग हा भगवान् श्रीकृष्णाच्या चरित्रांतील एक अत्यंत महत्त्वाचा प्रसंग. त्या एकाच प्रसंगांत त्याच्या ठिकाणचे वरील सर्व गुण कसोटीला लागले आहेत; त्या प्रसंगीं त्या कसोटीला तो पूर्णपणें उतरला; आणि म्हणूनच तसा तो परिपूर्ण कृष्ण आपला आदर्श आहे. तोच आदर्श या देशाचा, या राष्ट्राचा, या समाजाचा, तुमचा – आपला नि साऱ्या जगाचाहि तारक, अशी दृढ श्रद्धा हवी; तीच कृष्णाष्टमीच्या निमित्तानें तुमच्या ठिकाणीं बाणावी अशी अपेक्षा.

सप्टेंबर १९६२ [ संदर्भ : गोकुळाष्टमी

■ ■ ■

## एका राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव

छत्रपति श्रीशिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरीवर झाला. त्या स्थानाचा जीर्णोद्धार करून तेथें आपण स्मारक केलें. पुण्यप्रताप शिवाजी महाराजांच्या या जन्मस्थानाचें राष्ट्रीय स्मारक आपल्याला सदैव स्फूर्ति देत राहणारच. लोकमान्य टिळकांच्या रत्नागिरी येथील जन्मस्थानाचेंहि आपण स्मारक बनविलें. तेंहि एक राष्ट्रीय स्फूर्तिस्थान म्हणून नव्या पिढी-पुढें राहील.

याच संदर्भांत श्रावण महिन्यांत साजऱ्या होत असलेल्या गोकुळा-ष्टमीच्या निमित्तानें एक विचार तुमच्यासमोर मांडावासा वाटतो. अर्थात् आज तुमच्या किशोरवयांत तुम्ही या बाबतींत कांहींच करूं शकणार नाहीं. परंतु तुमच्यांतूनच लोकशाही भारताच्या लोकसभेचे भावी सभासद आणि या प्रजासत्ताकाचे भविष्यकालीन कर्णधार उत्पन्न व्हावयाचे आहेत. तेव्हां तुम्हांला आपला इतिहास आणि त्याची सद्यःस्थिति माहीत असणें आवश्यकच आहे.

भगवान श्रीकृष्णांचा जन्म कुठें झाला हें तुम्हांला माहीत आहे? मथुरेंत. आणि मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामचंद्रांचा जन्म कुठें झाला? अयोध्येंत. मग तुमची कल्पना असेल कीं, या आपल्या देशाच्या अति-महान् पुरुषांच्या जन्मस्थानीं केवढीं भव्य स्मारकें उभीं असतील! खरोखरी तशीं असायला हवींत — आणि पूर्वीं नसलीं: तर निदान आपलें स्वराज्य आल्यानंतर अलीकडच्या सतरा वर्षांत तरी तीं अवश्य उभी रहायला हवीं होतीं. अतिप्रचंड, वैभवशाली — श्रीरामाच्या नि श्रीकृष्णाच्या अतिभव्य व्यक्तिमत्वाला साजेशीं भव्य, दिव्य नि प्रचंड.

पण खरोखरी आज या थोर पुरुषांच्या, आपण ज्यांना साक्षात् परमेश्वर समजतों त्या अवतारांच्या प्रत्यक्ष जन्मस्थानीं काय आहे? तिथें आज आहेत मुसलमानांनीं इतिहासकाळांत उभारलेल्या फक्त

मशिदी. त्या मशिदी तिथें कां आणि कशा उभारल्या गेल्या याचा विचार प्रस्तुत आपण करीत नाहीं. परंतु आज त्या स्थानांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन संपूर्ण राष्ट्रीय असला पाहिजे, असें कोणी म्हटल्यास त्यांत वावगें कांहींच नाहीं. आपल्या राष्ट्रीय पुरुषांचीं स्मारकें चालू आणि भावी पिढ्यांसाठीं स्फूर्तिस्थानें म्हणून उभारणें हें प्रत्येक राष्ट्राचें पवित्र नि आवश्यक कर्तव्यच असतें. राम आणि कृष्ण हे तर आपले आदर्श राष्ट्रपुरुष आहेत. तेव्हां त्यांच्या जन्मस्थानीं त्यांच्या गुणगौरवाला शोभून दिसतील, सुसंगत होतील अशीं भव्य-दिव्य स्मारकें उभारणें ही राष्ट्रीय कामगिरीच आहे. आणि ती पार पाडणें हें प्रत्येक स्वराष्ट्राभिमानी भारतीयाचें कर्तव्यच ठरतें.

तुम्ही मोठे होण्याच्या आंतच विद्यमान राष्ट्रधुरीणांनीं, आपलें कर्तव्य लक्षांत घेऊन, ही कामगिरी पार पाडली तर उत्तमच. मग त्या उभारलेल्या स्मारकांच्या वैभवांत भर घालण्याचें भाग्य तुम्हांला लाभेल. पण तसें घडलें नाहीं तर, तुम्ही तरुण वा प्रौढ होऊन आपल्या लोकसभेचे सदस्य बनून तेथें जाऊन बसाल तेव्हां अथवा देशांतील लोकांचें पुढारीपण स्वीकाराल तेव्हां ही कामगिरी तुमच्या शिरावर येऊन पडेल; आणि उचित मार्गांनीं ती पार पाडणें हें तुमचें कर्तव्यच ठरेल. जो जो भारतीय नागरिक आहे, या देशांत जन्माला आला नि येथेंच वाढला आहे, ज्याची ज्याची ही जन्मभूमि नि मातृभूमि आहे, ज्यांचा ज्यांचा भारत हा स्वदेश नि हें स्वराष्ट्र आहे अशा प्रत्येकाचें हें परमपवित्र कर्तव्य आहे. मग तो हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती कोणीहि असो – कारण हें राष्ट्रीय स्मारकासाठी राष्ट्रीय हितबुद्धीनें केलेलें आवाहन आहे. या ठिकाणीं कोणी धर्माचा किंवा जातीचा अभिनिवेश बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं. त्या बाबी राष्ट्रहिताच्या आड येऊं देणें हें एकपरी राष्ट्रद्रोहाचेंच ठरेल. छत्रपति शिवाजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी ह्या जशा राष्ट्रीय विभूति तशाच ज्यांच्यापासून या थोर

पुरुषांनीं स्फूर्ति घेतली ते राम आणि कृष्ण ह्याहि या देशाच्या राष्ट्रीय विभूति आहेत. या दृष्टीनें त्यांच्या राष्ट्रीय स्मारकांचा प्रश्न हा धार्मिक, सांस्कृतिक, सांप्रदायिक नव्हे तर राष्ट्रीय प्रश्न आहे; आणि त्याच दृष्टीनें तीं लवकरांत लवकर यथायोग्य रीतीनें उभारलीं जाण्याचा उद्योग व्हावयास पाहिजे.

गोकुळाष्टमीला मथुरा येथें भगवान श्रीकृष्णांच्या जन्मस्थानीं आणि रामनवमीला अयोध्येंत श्रीरामचंद्राच्या जन्मस्थळीं सरकारी रीत्या अखिल राष्ट्राचा – धर्म, जात, पंथ, संप्रदाय यांच्या अतीत – भव्य महोत्सव पहावयास प्रत्येक राष्ट्राभिमानी भारतीयाचे डोळे आसुसलेले असतील, वाट पहात असतील यांत शंका नाहीं.

ऑगस्ट, १९६५ [ संदर्भ : गोकुळाष्टमी ]

■ ■ ■

## गीतेचें सुस्पष्ट मार्गदर्शन

**संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ।**

सभ्य, स्वाभिमानी माणसाला दुष्कीर्ति ही मरणाहूनहि अधिक दुःखदायक असते. त्या अपकीर्तीपेक्षां त्याला मरून जाणें इष्ट वाटतें. आपली कीर्ति कलंकित होण्यापेक्षां मरण पत्करलें असें तो मानतो. – भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलेल्या गीतेंत हें एक सुभाषित आलेलें आहे. भगवंतांनीं तें अर्जुनाला उपदेश करीत असतांना सांगितलेलें आहे. आजच्या आपल्या देश-काल-समाजस्थितीबाबत अगदीं योग्य असेंच हें सुभाषित आहे.

आपल्या देशांतील अन्नपरिस्थिति बिकट झालेली आहे. आपली सैनिकी सिद्धता, लष्करी तयारी अपुरी आहे. आपल्या शैक्षणिक गरजा

आपण भागवूं शकत नाहीं. आर्थिक दृष्ट्या आपण गरीब आहोंत. औद्योगिक बाबतींत आपल्याला इतर देशांवर अवलंबून रहावें लागतें. अशी आपल्या देशाची स्थिति सध्यां असल्याचें जाणते लोक सांगतांना आपण ऐकतों; वाचतों. आणि आपण असेंहि ऐकतों – वाचतों कीं अशी परिस्थिति असल्यामुळें आपला सारा देशच एखाद्या " अनाथ विद्यार्थी गृहा " प्रमाणें झाला असून या प्रत्येक बाबतींत आपल्याला परदेशांपुढें मदतीसाठीं हात पसरावा लागतो; शुद्ध मराठी भाषेंत सरळ बोलावयाचें तर इतरांच्याकडे यासाठीं आपल्याला 'भीक' मागावी लागते !

आणि भीक मागणाराला कधींहि निवड करण्याचा अधिकार नसतो, बरें-वाईट ठरविण्याची सवलत नसते. या भिकेच्या मागें आणि पुढें नेहमीं एकेक बहीण असते – मागें असतें तिचें नांव भीड. या भिडे-पायींच, हिच्याच सहवासामुळें भीक आपल्या अंगाशीं येऊन चिकटते. आणि या भिकेच्या पुढें नेहमींच तिची दुसरी एक बहीण असते, तिचें नांव भीति. पण या भीतीला लागूनच तिच्या आणखीहि बहिणी उभ्या असतात – लाचारी, स्वाभिमानशून्यता, तत्त्वच्युति. आणि ही सारी आंधळ्यांची मालिका अखेर दुर्बलतेच्या कड्यावरून परवशतेच्या खोल दरींत कोसळत असते ।

एखादी व्यक्ति, एखादा माणूस भीक मागूं लागला कीं त्याची जी अवस्था होते तीच, किंबहुना त्याहूनहि वाईट अशी, एखादा समाज किंवा राष्ट्र भीक मागूं लागतांच त्या समाजाची किंवा राष्ट्राची होत असते. ' भिक्षापात्र अवलंबणें जळो जिणें लाजिरवाणें ' हें श्री तुकाराम महाराजांचें वचन एखाद्या माणसाच्याबाबत जितकें खरें, तितकेंच तें राष्ट्र किंवा समाज याच्याबाबतहि खरें आहे. तसेंच श्रीसमर्थ रामदासस्वामींनींहि एके ठिकाणीं म्हणून ठेवलें आहे – ' पापाकरितां दरिद्र प्राप्त। दरिद्रें होय पाप संचित ॥ ' व्यक्तिगत पापाचरणामुळें दारिद्र्य प्राप्त होतें आणि दारिद्र्य

प्राप्त झाल्यामुळ पाप वाढत जातें – हें दुष्ट चक्र आहे; आणि तें व्यक्ति-प्रमाणेंच राष्ट्राला किंवा समाजालाहि लागू आहे.

श्रीमद्भगवद्गीतेचा सर्व भर स्वकर्तव्यपालनावर – जें आपलें स्वतःचें म्हणून ठरलेलें, नेमून दिलेलें किंवा घेतलेलें काम असेल तें निष्ठेनें, आस्थेनें, सचोटीनें, कौशल्यानें पार पाडण्यावर आहे. या आपल्या कर्तव्याला चुकणें म्हणजेच पाप आणि तें कर्तव्य आचरीत राहणें म्हणजेच पुण्य अशी गीतेची थोडक्यांत शिकवण आहे. आपल्या देशाला स्वराज्य मिळालें त्याला कित्येक वर्षें लोटलीं. तेव्हांपासून आपण सारेजण आपलें कर्तव्य करीत राहिलों काय ? नाहीं – असें उत्तर विचारी नि जाणते लोक देतात. म्हणजेच आपण पापाचरण करूं लागलों, करीत राहिलों असा याचा अर्थ होतो. त्या पापांतूनच आपल्याला आजचें हें दारिद्र्य प्राप्त झालें. आणि हें दारिद्र्य आल्यामुळें त्या दुष्ट चक्रांत सांपडून आपण पुन्हां अधिकाधिक राष्ट्रीय पापें करीत राहिलों.

अर्जुन समरांगणावर उभा राहूनहि जेव्हां युद्ध टाळूं लागला तेव्हां तो पापाचरणच करूं लागला. त्याला स्वजनांची, आप्तांची, नातेवाइकां चि गुरुजनांची भीड पडली. 'यांना कसें मारूं ? हे तर माझे आप्त-स्वकीय_ गुरु-बंधु ! ' अशी भीड त्याला पडली. त्या भिडेला तो बळी पडला आहे असें पहातांच कर्तव्यदक्ष, जाणकार आणि सावधान असलेल्या श्रीकृष्णानें लगेच ओळखलें कीं, हा या भिडेच्या तावडींत सांपडून, आज तेजास्वितेनें सम्पन्न आहे तो पार्थ बावळट, नेभळट भिकारी बनेल. मग लोक याला काय म्हणतील ? " ते म्हणती गेला रे गेला। अर्जुन आम्हां विहाला ॥ ' त्याचा आत्मविश्वास नाहींसा होऊन तो भीतीनें ग्रस्त होइल. ज्या अन्यायाच्या निवारणासाठीं तो आज दंड थोपटून उभा आहे तो अन्याय सहन करण्याची त्याला संवय पडून जाईल. संघर्षाला भिऊन तो लाचार बनेल. आज जो स्वाभिमानी, ध्येयनिष्ठ असा तो ताठ उभा आहे, त्याची मान स्वाभिमानशून्यतेनें खालीं होईल; आपल्या ध्येयापासून तो ढळेल आणि

दुर्बळ, परतंत्र असा एक लोळागोळा होऊन पडेल. आणि ज्या दुष्कीर्तीला भिऊन रणांगणावरून पळून जाण्याचा तो विचार करीत आहे तीच नेमकी येऊन त्याला चिकटेल ! हें सारें चित्र दूरदृष्टि श्रीकृष्णाच्या डोळयांसमोर स्पष्ट दिसत होतें. म्हणून त्यानें त्याला बजावलें कीं, ' ज्याच्याविषयीं शोक करीत ऊर बडवून घेण्याचें कांहीं कारण नाहीं त्याच्याविषयीं दुःख करून, मोठ्या तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगून तूं त्याचें समर्थन करतो आहेस ! '

श्रीकृष्णांनीं त्याला पुढें सांगितलें तें असें : स्वधर्माचा म्हणजेच तुझ्या स्वतःच्या कर्तव्याचा विचार केला तरी तूं हें युद्ध टाळणें योग्य नव्हे. आणि तरीहि जर तूं हें धर्मयुद्ध करण्याचें टाळशील, तर स्वधर्म व स्वकीर्ति यांना मुकून तूं पापाची मात्र जोड करशील. तुझ्या कायमच्या दुष्कीर्तीचा नगारा सारें जग सतत बडवीत राहील ! आणि दुष्कीर्ति ही सभ्य, स्वाभिमानी माणसाला मरणाहूनहि अधिक दुःखदायक असते. शिवाय तत्त्वभ्रष्टतेचा बाऊ करून तूं जो युद्धापासून दूर रहात आहेस त्याऐवजीं लोक म्हणतील कीं, हा भ्याड होता, दुबळा होता म्हणून युद्धांतून पळून गेला. मग लोक जें बोलतील तें तुला निमूटपणें, परवश होऊन ऐकत बसावें लागेल !

भगवान् श्रीकृष्णांनीं हा जो उपदेश भांबावलेल्या, घाबरलेल्या अर्जुनाला केला आहे तोच उपदेश आज आपल्या देशाला खरोखरी हवा आहे. कशासाठीं कशाचा बळी द्यावयाचा हें आपल्याला उमगलें नाहीं. शांततेच्या मोहानें आपण राष्ट्राच्या संरक्षणाचा बळी दिला. स्वास्थ्याच्या लोभानें आपण संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला. ' जग आपल्याला काय म्हणेल ? ' या भोळसट भीतीनें आपण आपल्या राष्ट्रीय स्वाभिमानाला तिलांजलि दिली. परकीयांनीं केलेल्या खोट्या स्तुतीला भुलून आपण त्यांच्या बाबतींत भिडस्त झालों. अस्तनींतल्या निखाऱ्यांची गय करून आपण आपली प्रतिष्ठा वाढली असें समजलों. आणि देशांत आर्थिक, औद्योगिक समृद्धि आणण्यासाठीं एकदां दुसऱ्यापुढें झोळी पसरावयाची

जी संवय स्वतःला आपण लावून घेतली तींतून आपण लाचार झालों, स्वाभिमानशून्य बनलों. 'युद्ध नको, संघर्ष नको, शांतता हवी, स्वास्थ्य हवें' असा घोष करीत अखेर जीं श्रेष्ठ तत्त्वें म्हणून या प्राचीन राष्ट्रानें आजवर उराशीं बाळगलीं होतीं, ती तत्त्वनिष्ठाहि आपण दूर सारली. आणि इतकें सगळें करून मिळविलें काय ? – तर दुष्कीर्ति ! अपकीर्ति ! 'हिंदुस्थान दुबळा आहे'; 'भारत भिकारी आहे'; 'हा देश लाचार आहे'; 'हें राष्ट्र स्वाभिमानशून्य आहे.' असा साऱ्या जगभर सतत चाललेला दुष्कीर्तीचा, अपकीर्तीचा डिंडिम !

आजची चालू पिढी तिच्यापुरता याचा जो विचार करावयाचा असेल तो ती करील. गीताजयंतीच्या निमित्तानें आम्हांला येथें सांगावयाचें आहे तें फक्त नव्या पिढीसाठीं – आज कुमारवयांत असलेल्या मुलांमुलींसाठीं. त्यांनीं याचा विचार आजपासूनच करावा. कारण जुन्या पिढीची पुण्याई जशी त्यांना लाभणार आहे तसा त्या पिढीचा पापाचा सांठाहि या नव्या पिढीच्या डोक्यावर लादला जाणार आहे. त्यांना सर्व दृष्टींनीं मार्गदर्शन एकच – प्रभावी, परिणामकारक, निश्चित यशाची खात्री देणारें – श्रीमद्‌भगवद्‌गीता ! स्वकर्तव्याच्या जाणिवेसाठीं, परचक्र निवारण्यासाठीं, संघर्षाशीं दोन हात करण्यासाठीं, स्वाभिमान आणि स्वकीर्ति यांच्या रक्षणासाठीं.

डिसेंबर, १९६४ [ संदर्भ : गीताजयंती ]

■ ■ ■

## गीता आणि रणांगण

तुम्हांला माहीत आहेच कीं, गीता – श्रीमद्‌भगवद्‌गीता ही रणांगणावर सांगितली गेली. तुम्हांला हेंहि ठाऊक असेल कीं, गीता

ही रण लढविण्यासाठीं – युद्ध करण्यासाठीं सांगितली गेली. यावरून तुमच्या सहज लक्षांत येईल कीं, गीता आणि रणांगण यांचा अगदीं निकटचा संबंध आहे.

आपली अलीकडे अशी एक समजूत करून दिली गेली आहे – जातहि आहे कीं, रणांगण हें वाईट, त्याज्य, तिरस्करणीय ! पण गीता हा महाग्रंथ तर सर्व जागतिक जाणत्यांना आदरणीय, प्रत्येक भाविक भारतीयाला पवित्र, पूजनीय. मग तें वाईट, त्याज्य, तिरस्करणीय रण आणि ही आदरणीय, पवित्र, पूजनीय गीता यांची सांगड कशी घालावयाची ? अगदीं वरवर पाहिलें, फारसा विचार केला नाहीं तर हा प्रश्न गोंधळांत टाकणारा वाटेल खरा. पण त्याचें उत्तर थोडें खोलांत जाऊन पाहिलें, अधिक विचार केला तर सहज सांपडण्यासारखें आहे.

विष हें वाईट असतें कीं नाहीं ? अग्नि जाळणारा असतो कीं नाहीं ? समुद्र बुडविणारा असतो कीं नाहीं ? वारा सर्वनाश करणारा असतो कीं नाहीं ? – पण केव्हां ? विष चुकून, न जाणतां; प्रमाणापेक्षां अधिक पोटांत गेलें तर ! अग्नि आपल्या काबूंत राहिला नाहीं, भडकला, प्रमाणाबाहेर वाढला तर ! समुद्र खवळला, आपण बसलेली नाव लहान, क्षुल्लक असली तर ! वाऱ्याचा झंझावात सुटला, आपण भक्कम घराच्या आसऱ्याला बसलों नसलों तर !

नाहींतर रोगनाशक औषधें, अन्न शिजविणारी आंच, माणसांची नि मालाची दूरवर वाहतूक करणारीं जलयानें आणि माणसाला जिवंत ठेवण्यासाठीं लागणारा प्राणवायु हें कसें संभवलें असतें ? त्या त्या साधनापासून माणसाला ज्या सुखसोयी लाभल्या, जीवन शक्य नि सुलभ झालें तीं त्याला कशीं मिळालीं असतीं ?

याउलट, दूध, पाणी, अन्न व आराम हीं चांगलीं कीं नाहींत ? पण तींच प्रमाणाबाहेर सेवन केलीं गेलीं, अवेळीं घेतलीं गेलीं कीं निश्चित अपायकारक ठरतात. दोषी ताप आलेल्याला दूध, जलसंत्रास-

हायड्रोफोबियासारखा विशिष्ट रोग झालेल्या किंवा पोटाची शस्त्रक्रिया केलेल्याला पाणी, अजीर्ण झालेल्याला अन्न आणि चरबी वाढलेल्या माणसाला आराम हीं सारीं विषाप्रमाणें ठरतात.

रणाचेंहि, युद्धाचेंहि असेंच आहे. तुम्ही इतिहास थोडासा वाचला आहे. या देशांतल्या तथाकथित 'तज्ज्ञांनीं' तो तुमच्या हातीं विकृत करून दिला तसाच तुम्हीं तो वाचला आहे. परंतु तरीहि, त्यावरूनहि तुमच्या एक गोष्ट लक्षांत येईल कीं, हिंदुस्थान देशांतलीच काय पण जगांतली कोणतीहि चांगली क्रांति, कोणताहि हितकारक मोठा बदल हा रणाशिवाय – युद्धाविना घडून आलेला नाहीं. अगदीं अनत्याचारी, अहिंसक म्हटली जाणारी हिंदुस्थानांतील महात्मा गांधीप्रणित क्रांतीसुद्धां शेवटीं रक्ताचे सडे पडूनच पुरी झाली. छत्रपति शिवाजीमहाराज क्रूर होते ? युद्धपिपासू होते ? तसें कोणीं म्हटलें तर तुम्ही खवळून उठाल ! तर मग त्यांनीं युद्ध कां केलें ? हजारों 'माणसें' कां मारलीं ? फ्रान्सच्या नेपोलियन बोनापार्टनें वर्षानुवर्षें लढाया केल्या त्या त्याच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठीं असें कोणी म्हणेल. पण अमेरिकेमधल्या जॉर्ज वॉशिंग्टनबद्दल तर तसें कांहीं म्हणतां येणार नाहीं. त्यानेंहि युद्धच केलें, त्याला करावें लागलें – अमेरिकेच्या स्वातंत्र्यासाठीं. एवढा दयाळू अब्राहम लिंकन- गुलामांचा कनवाळू; मुक्तिदाता. त्याच्या नेतृत्वाखालीं केवढें घमासान युद्ध झालें ! नुसतें युद्ध नव्हे तर यादवी युद्ध – आपापसांतलें, भावाभावांमधलें, देशबांधवांमधलें ! इतकें कशाला, ज्या शांततावादी, वाटाघाटीप्रिय, सबुरीनें घेऊं म्हणणाऱ्या इंग्लंडच्या चेंबरलेननें युद्ध टाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला त्याची परिणती काय झाली ? इंग्लंडला हिटलरशीं प्राणांतिक युद्ध करावेंच लागलें; प्रारंभीं स्वराष्ट्राची भयंकर हानि सोसूनहि चर्चिलला तें यशस्वीरीत्या तडीला न्यावें लागलें. तैमूरलंग नि चंगीझखान यांनीं केलेलीं युद्धें नि तशींच 'धर्म'प्रसारार्थ हातीं तलवार वा बागनेट घेऊन केलेलीं युद्धें ही सर्वथा ' वाईट, त्याज्य, नि तिरस्करणीय 'च !

परंतु न्यायासाठीं, स्वातंत्र्यासाठीं, स्वाभिमानरक्षणासाठीं लढलीं गेलेलीं युद्धें हीं सर्वस्वीं चांगलीं, आवश्यक नि गौरवास्पदच; जशीं अमेरिका – इटली – आयर्लंडमधील स्वातंत्र्ययुद्धें; हिंदुस्थानांत मराठ्यांनीं केलेलीं युद्धें नि सत्तावन – बेचाळीसचीं स्वातंत्र्ययुद्धें होत. कम्युनिस्ट रशियानें नाझी जर्मनीविरुद्ध रशियन मायभूमीच्या स्वातंत्र्यार्थ केलेलें युद्धहि आणि अल्जीरियन मुसलमानांनीं फ्रेंचांविरुद्ध लढविलेलें स्वातंत्र्ययुद्धहि. हीं सारीं पवित्र, अपरिहार्य अतएव श्लाघनीयच. त्यांत हजारों 'माणसें' मेलीं नि रक्ताचे सडे पडले तरीसुद्धां ! याचा अर्थ युद्ध, रण ही बाब कोणाला कितीहि वाईट, त्याज्य नि तिरस्करणीय वाटत असली तरी तें एक केवळ साधन आहे; साधन म्हणून त्याचा उपयोग करणें आवश्यक – नव्हे अपरिहार्य आहे. विशेषतः ज्यांनीं युद्ध हेंच, तात्पुरतें का होईना, आपलें साध्य ठरविलें आहे अशा शत्रूशीं, प्रतिपक्षीयांशीं वागतांना असें युद्ध टाळण्याचा प्रयत्न करणें म्हणजे शत्रुपक्षाचें बळ वाढविणें आणि त्या प्रमाणांत आपलें खच्ची करीत जाणें असतें. पण, खरें म्हणजे युद्ध चांगलेंहि नाहीं नि वाईटहि नाहीं; तें करणाराच्या हेतूवर अवलंबून रहातें. कौरवांनीं केलेलें युद्ध अधर्मयुद्ध होतें, आपण केलेला अन्याय कायम राखण्यासाठीं होतें; तर पांडवांनीं केलेलें युद्ध धर्मयुद्ध होतें; धर्माच्या नि न्यायाच्या प्रतिष्ठापनेसाठीं होतें.

श्रीमद्भगवद्गीतेनें हेंच सांगितलें आहे. किंबहुना हेंच सांगण्यासाठीं गीतेचा जन्म झाला. आणि म्हणून गीता आणि रणांगण यांचा संबंध अभिन्न आहे. आपलें राष्ट्र तो संबंध हळूहळू समजून घेऊं लागलें आहे असें दिसतें. परंतु तुम्हांला – नव्या पिढीला तो नुसता समजून भागणार नाहीं; तर तो समजून तुमच्या जीवनांत प्रत्यक्ष रुजावा नि मुरावा लागेल.

डिसेंबर १९६५ [ संदर्भ : गीताजयंती ]

■ ■ ■

## यानेंच तर तुमचें सांस्कृतिक जीवन पोसलें जायचें

आपल्या धार्मिक योजनेप्रमाणें भाद्रपद महिन्याच्या शुद्ध नवमीपासून 'भागवत सप्ताहा'चा प्रारंभ होतो. भगवान् श्रीवेदव्यासांनीं लिहिलेल्या 'श्रीमद्भागवत' ग्रंथाचें पारायण या नवमीपासून पौर्णिमेपर्यंत सात दिवस करावयाचें असतें. परंतु 'भागवत' ग्रंथ हा केवळ धार्मिक-बुद्धीनें पारायण करण्याचा ग्रंथ नव्हे; तर त्यांतील इतिहास वाचून नि शिकवण समजून घेऊन आपलीं जीवनें सुसंस्कृत नि समृद्ध करण्यासाठींहि त्या ग्रंथाचा उपयोग करावयाचा असतो.

श्रुति, स्मृति व पुराणें; हे आपल्या भारतीय संस्कृतीचे मूळ आधारभूत ग्रंथ; परंतु त्यांतल्या त्यांत सर्वसामान्य माणसाला – बहुजन-समाजाला उपयोगी पडणारीं पुराणें; आणि भागवताचा मान सर्वांत मोठा. रामायण, महाभारत आणि भागवत या तीन ग्रंथांनीं आपल्या भारतीय समाजाची बैठक घडविलेली आहे. यांपैकीं रामायणानें चारित्र्याचा आदर्श आपल्यासमोर ठेवला. महाभारतानें यशस्वी व्यवहार शिकविला आणि भागवतानें मोक्षमार्ग दाखवून दिला.

अशा या भागवत ग्रंथाची रचना भगवान् श्रीवेदव्यासांनीं केली. १८००० श्लोक असलेल्या या ग्रंथाचे बारा स्कंध म्हणजे अध्याय आहेत. त्यांपैकीं दशमस्कंधाचे पूर्व व उत्तर असे दोन भाग असून तोच सर्वांत मोठा स्कंध आहे. या स्कंधांतच सर्व कृष्णावतार-कथा आलेली आहे; तर अकराव्या स्कंधांत भागवतधर्माचें सार सांगितलेलें आहे.

श्रीमत् भागवत हा भागवतधर्माचा प्रमाणग्रंथ, भक्तिमार्गाचा वाटाड्या. भगवंताविषयीं अंतःकरणांत भक्ति निर्माण व्हावी, त्या भक्तीमुळें वैराग्यासह ज्ञान लाभावें; आणि त्यामुळें वेदान्तानें प्रतिपादलेली जीवनाची वैतिकर्तव्यता जो मोक्ष, तो प्राप्त व्हावा हा भागवत ग्रंथाचा उद्देश आहे.

आपण भारतीय – जे या देशाला आपली जन्मभूमि, कर्मभूमि, मातृभूमि, पुण्यभूमि, धर्मभूमि मानतात ते आपण भारतीय – परमेश्वर-प्राप्तीसाठीं सतत प्रयत्न करीत असण्यांत धन्यता मानतों. ही जी आपल्या मनाची बैठक, ही जी भगवद्भक्तीची प्रेरणा, ही जी मोक्षाची इच्छा – ती या भागवत ग्रंथाची देणगी आहे. तो या भागवताचा प्रभाव आहे. आपल्या थोर पूर्वजांचीं जीवनें यांतूनच पोसलीं गेलीं. तुमचींहि जीवनें यानेंच पोसलीं जावयाचीं आहेत. सांस्कृतिक जीवन म्हणून ज्याला म्हणतात त्याचें पोषण यानेंच व्हावयाचें आहे.

म्हणून लहानपणीं बालभागवतापासून प्रारंभ करून पुढें संक्षिप्त मराठी भाषांतर आणि अखेर मूळ श्रीमद्भागवत ग्रंथ संस्कृतांतून तुम्हीं वाचला पाहिजे. तुम्हांला तो कळला पाहिजे, समजला पाहिजे आणि पचवितांहि आला पाहिजे. जगाचा इतिहास, विज्ञानाची घोडदौड अगर जागतिक वाङ्मय व इंग्रजीसारख्या परकी भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथ हें सारें वाचलेंत तरी श्रीमद्भागवत ( आणि रामायण-महाभारतसुद्धां ) तुम्हांला वाचायलाच हवें – जर तुम्हांला भारतीय म्हणून जगायचें, वाढायचें नि उन्नत व्हायचें असेल तर त्याविना गतिच नाहीं, हें लक्षांत ठेवा.

सप्टेंबर, १९६५

■ ■ ■

## बजरंग बली की जय !

वज्र हें इन्द्रदेवाचें शस्त्र. त्या शस्त्रापुढें सहसा कोणाचा टिकाव लागत नाहीं. कारण तें महान् त्यागानें तयार झालेलें आहे. दधीचि ऋषींनीं स्वतचीं हाडें दिलीं. समाजाच्या रक्षणासाठीं स्वतःचे प्राण दिले. त्या त्यागमूर्ति दधीचींच्या हाडांचें हें इन्द्रवज्र शस्त्र बनलें. देवांचा राजा इन्द्र यानें या वज्रानें अनेक दुष्ट राक्षसांचा संहार केला.

अशा या वज्रासासारखें बळकट ज्याचें शरीर तो वज्रांग. हा शब्द संस्कृत. त्यावरून प्राकृतांत बजरंग झाला. रामभक्त हनुमंताला बजरंग म्हणतात. हा बजरंग महाबलि – महाबलाढ्य आहे. त्याचा जय-जयकार करतांना म्हणतात ' बजरंग बली की जय ! '

प्रभु रामचंद्र आणि भगवान श्रीकृष्ण पुराणपुस्तकांतले कल्पित देव नव्हते. ते आपले महनीय राष्ट्रपुरुष आहेत. दिल्लीपति हिंदु सम्राट पृथ्वीराज, रजपूत स्वातंत्र्य-वीर राणा प्रताप, छत्रपति शिवाजी महाराज हे थोर पुरुष या देशांत होऊन गेले, हें जितकें खरें, तितकेंच श्रीराम व श्रीकृष्ण इतिहासांत होऊन गेले हें सत्य. पृथ्वीराज, प्रताप, शिवाजी हे जसे ऐतिहासिक पुरुष तसेच राम व कृष्ण देखील; केवळ कल्पनेंतले देवावतार ते नव्हेत.

रामभक्त हनुमान हा असाच आपल्या प्राचीन इतिहासांत होऊन गेलेला एक राष्ट्रीय पुरुष. या महावीराचा आदर्श आपल्यासमोर ठेवा असें स्वामी विवेकानंदांनीं तरुणांना आवर्जून सांगितलें आहे. ध्येयवादी तरुणांना, महत्त्वाकांक्षी राष्ट्रभक्तांना मारुतीसारखा मार्गदर्शक नाहीं. निर-लस सेवा आणि अजिंक्य पराक्रम या दोहोंचा मेळ एकत्र असा सहसा सांपडत नाहीं. हनुमन्ताच्या जीवनांत तो पूर्णपणें साधला आहे. साम-र्थ्याचें, बळाचें तर तो प्रतीक आहे. प्रत्येक व्यायामशाळेंत मारुतीची मूर्ति स्थापिलेली दिसणारच.

मारुतीची उपासना म्हणजे बळाची उपासना. पण उपासना किंवा भक्ति म्हणजे नुसतें मारुतीचें स्तोत्र म्हणून चालणार नाहीं. दोन फुलें त्याच्या डोक्यावर वाहून भागणार नाहीं. त्यासाठीं प्रथम मारुतीचें चरित्र सगळें वाचलें पाहिजे. त्यानें काय केलें नि काय केलें नाहीं हें समजून घेतलें पाहिजे. त्याचें शील, त्याची स्वामिभक्ति, त्याचें साहस, त्याची शालीनता, त्याचें चातुर्य, त्याचा स्वार्थत्याग सारें सारें जाणून घेतलें पाहिजे. आणि मग त्याच्याप्रमाणें किती बाबतींत नि किती प्रमाणांत

आपल्याला स्वतःला वागतां येईल हें पाहिलें पाहिजे. तसें वागण्याचा प्रामाणिकपणें प्रयत्न केला पाहिजे.

— ‘म्हणजे काय केलें पाहिजे ?’ तुम्ही विचाराल.

पहिली गोष्ट म्हणजे मारुतीचा आदर्श ठेवायचा असला तर तुम्हांला नित्य आणि नियमित व्यायाम हा केलाच पाहिजे. एक वेळ अभ्यास चुकला तरी चालेल; पण दररोजचा व्यायाम कधींच चुकवितां कामा नये; कारण अभ्यास दुसऱ्या दिवशीं भरून काढतां येतो, पण आजचा व्यायाम उद्यां कांहीं करतां येत नाहीं. व्यायामानें शरीरबळ कमावलें पाहिजे; आणि शरीर बळकट असलें तर मनहि बळकट होऊं शकतें. दुबळ्या छातींत बलवान् मन कसें राहणार ?

मारुती बलवान होता तसाच शीलवान् पण होता. ‘रामायण’ तुम्ही वाचलें आहेत ना ? मग त्याच्या सुशीलपणाच्या गोष्टी तुम्हीं वाचल्या असतीलच.

दुबळ्यांची कुचेष्टा करणें, गरिबांना त्रास देणें ह्या गोष्टी बलवानाच्या वागण्यांत बसतच नाहींत. उलट आपल्या शक्तीचा उपयोग दुसऱ्याला मदत करण्यासाठी करणें हें त्याचें कर्तव्यच असतें; एखाद्यावेळीं दुबळ्याच्या रक्षणासाठीं स्वतः धोका पत्करूनसुद्धां बलवानानें पुढें सरलें पाहिजे. तरच त्याच्या बळाचा उपयोग. म्हणजे बळाबरोबरच परोपकारीपणाहि येतोच.

मारुती बलभीम होता, पण नुसता आडदांड नव्हता. चांगला शिकला सवरलेला, शास्त्रें पढलेला आणि अत्यंत बुद्धिमान होता तो. ‘बुद्धिमानांत श्रेष्ठ’ असें त्यांचें वर्णन केलेलें आहे. श्रीरामप्रभूंनींहि त्याच्या विद्येची नि बुद्धीची वाहवा केलेली आहे. म्हणजे विद्यासंपादन करणें आणि बुद्धीचा उपयोग करणें हेंहि हनुमानाच्या चरित्रांत येतें.

हनुमान अत्यंत कार्यकुशल होता. याची खात्री तो सीताशोधासाठीं गेला होता त्यावेळच्या कामगिरीवरूनहि पटूं शकेल. जिथें शक्तीचा

उपयोग होण्यासारखा नसेल तिथें युक्तीचा उपयोग त्यानें बरोबर केला आहे. त्याला गिळायला आलेल्या राक्षसीला त्यानें कसें चकविलें तें वाचलेंत तरी त्याचें हें कौशल्य तुमच्या लक्षांत येईल.

आणि सर्वांत महत्त्वाची शिकवण म्हणजे मारुती हा महान् सेवक होता. त्या वेळीं त्यानें राक्षसांचें संकट नष्ट करण्यासाठीं रामाची सेवा सर्वतोपरि केली. तुमच्या देशावरहि निरनिराळया राक्षसांचें संकट आज आ वासून उभें आहे. त्यावेळीं राक्षसांच्या संहारासाठीं श्रीराम पुढें सरसावले. त्यांनीं आर्यधर्माचें व भारतभूमीचें संरक्षण केलें. आज राक्षसी शक्तींच्या नाशासाठीं दुसरा कोणी पुरुषोत्तम पुढें येईल. पण सेवकांनीं सेवेसाठीं सदैव सिद्ध असलेंच पाहिजे. कोणत्याहि बक्षिसाची, मोठेपणाची हांव न धरतां देश-धर्म-संस्कृतीच्या रक्षणासाठीं सेवा करायला तयार असलें पाहिजे. इतर कोणत्याहि विशेषणापेक्षां 'रामभक्त' हें विशेषण मारुतीला आवडतें. तुम्ही कोणी मोठे विद्वान्, महान कलाकार किंवा बडे पुढारी होण्यापेक्षां रामभक्त हनुमानासारखे थोर भारतभक्त झालांत तर भारतमातेला तुमच्याबद्दल अधिक धन्यता वाटेल !

एप्रिल, १९६६ [ संदर्भ : हनुमानजयंती ]

■ ■ ■

## ' मी हिमालय बोलतों आहें ! '

बालमित्रांनो ! मी हिमालय बोलतों आहें.

तुम्ही म्हणतां ना किंवा आकाशवाणीवरून ऐकतां ना – ' हिमालय पेटला आहे; ' ' बर्फाचे तट पेटुनि उठले ' आहेत. पण हिम किंवा बर्फ पेटेल कसें ? – असा प्रश्न तुमच्या मनांत साहजिकच येईल.

बरोबर आहे तुमचा प्रश्न. आणि त्याचेंच उत्तर मी देणार आहें. मी हिमालय हें तुमच्या भारताचें प्रतीक आहें. शांत, धीरगंभीर, निश्चल, अति भव्य, अत्युच्च, अति सहिष्णु – अशा साऱ्या साऱ्या बाबतींत भारताचें नि माझें साम्य आहे. पण माझें हें एक रूप झालें – शांत, गंभीर, प्रेमळ, आकर्षक ! पण मित्रांनो ! 'दुरून डोंगर साजरे' ही म्हण तुम्हांला माहीत आहे ना ? मग कांहीं वेळां माझ्या बाबतींत असेंच म्हणण्याची पाळी येते. कारण माझें दुसरें स्वरूप – रौद्र, भयानक, कठोर असें तें रूप तुमच्या ऐकण्यांत तरी नाहीं काय ? माझ्या शिखरांवर चढून जाण्यासाठीं येणाऱ्या पर्वतारोहकांना विचारा – तेनसिंगांना विचारा, ब्रिगेडिअर ग्यानसिंहांना विचारा.

एकदां हिमवादळ सुरू झालें म्हणजे मग माझ्या भयंकर स्वरूपाकडे पहायचीहि कोणाची छाती होत नाहीं !

> "एकदां हिमपात व्हायला लागला म्हणजे कधीं कधीं गुडघाभर किंवा कमरेपर्यंतहि हिमाचा थर पडतो. ... आणि सूर्याचे किरण पडूं लागल्यावर हें हिम वितळूं लागून जेव्हां हिमचिखल तयार होतो तेव्हां तर तो तुडविणें म्हणजे पाय गारठून अर्धमेलें होणेंच ! ... कोरड्या हिमावरून पिसाटासारखा वारा वाहूं लागतो तेव्हां सहारांतील 'वाळूचीं वादळें' अनुभवावयास मिळतात. वारा हें देखील हिमालयाचें एक अस्त्रच आहे. तो माणसाला टिचकीसरसा उडवून देऊं शकतो. या वाऱ्याचा वेग प्रचंड वाढतो व फुंफाटत वर चढूं लागतो. ... आणि जेव्हां पर्वतांत पर्जन्य सुरू होतो तेव्हां कडाडणारे ढग, कोसळणारे पर्वतकडे यांनीं हिमालयाचें रौद्र भीषण रूप प्रत्ययाला येतें."

असें हें माझें रौद्र, भयंकर रूप आणि दुसरें तें आकर्षक, सुंदर रूप. हीं दोन्ही रूपें मिळून मी हिमालय होतों. माणसाचें रक्त गोठून टाकणाऱ्या बर्फाइतका मी थंड आहें, पण त्यालाच भाजून काढण्याइतका

मी कोपिष्टहि होऊं शकतों. अशा दोन्ही टोकांचें सामर्थ्य माझ्यापाशीं आहे म्हणूनच मी हिमाचल आहें, नगाधिराज आहें, देवतात्मा आहें. आजवर तुम्ही माझ्या एकाच – शांत, सौम्य रूपाकडेच पहात आलांत, त्याचेच गोडवे गाइलेत. तेंच एक रूप माझें आहे असें तुम्हांला वाटत होतें. पण आतां माझें हें दुसरें स्वरूपहि ओळखायला शिका – आणि त्याच्यावरहि प्रेम करायला शिका; त्याचाहि आदर्श आपल्यासमोर ठेवा.

कारण, आजवर तुमच्यांतले अलीकडील कांहीं लोक खुळ्यासारखें असेंच समजून चालले कीं, शांत, गंभीर, जगाच्या कल्याणाचीच काळजी करीत असलेले, दया-प्रेमाचे सागर असे ऋषिमुनीच माझ्या अंगाखांद्यावर आहेत. पण त्याच वेळीं त्यांच्या हें लक्षांत आलें नाहीं कीं, साऱ्या जगाचा प्रलय करणारा रुद्र – शंकर, राक्षसांचा संहार करणारी भवानी – पार्वती, देवांचा महाबलाढ्य सेनापति स्कंद – कार्तिकेय आणि असुरांचा कर्दनकाळ देवाधिपति इन्द्र यांचेंहि निवासस्थान हिमालयच आहे. मीच आहें ! हें त्यांनीं लक्षांत घेतलें असतें, हाहि आदर्श त्यांनीं आपल्यासमोर ठेवला असता तर आज जी साऱ्यांनीं दया करण्यासारखी परिस्थिति या देशाला प्राप्त झाली आहे ना ती झाली नसती !

ठीक आहे. पूर्वीं झालें तें झालें. आज, आतां, तुम्हां नव्या पिढींतील बालगोपालांना, तरुण-युवकांना माझें हेंच सांगणें आहे कीं, जसा मी शांत, प्रेमळ, परोपकारी तसाच मी महाभयंकर, कोपी नि आवश्यक तेव्हां मनांत आलें कीं समोर येईल त्याचा संहार करणारा महाबलाढ्य आहें – तसेंच, तसेंच तुम्ही व्हावें. हें सगळें मिळून जसा हिमालय होतो तसेच वरील दोन्ही प्रकारच्या गुणांनीं संपन्न असलेले मिळून तुम्ही भावी भारतीय नागरिक व्हा. ऋषिमुनींप्रमाणेंच रुद्र – स्कंद – इन्द्र यांचाहि आदर्श आपल्यासमोर ठेवा. नव्या पिढींतले नव-भारतीय युवक मला असे हवे आहेत. ते आणि तसेच भारतीय माझें

नि स्वतःचेंहि संरक्षण करतील, प्रसंगीं शत्रूवर आक्रमण करून त्याच्या दास्यांत रुतलेले इतर दुबळे देशहि मुक्त करूं शकतील.

मी हिमालय बोलतों आहें – मला असे नवभारतीय युवक हवे आहेत; त्वरित हवे आहेत, असंख्य हवे आहेत, सतत हवे आहेत !

जानेवारी, १९६३

■ ■ ■

## भगीरथाचा वारसा

गंगा नदीला भागीरथी म्हणतात, हें तुम्हांला माहीत असेल. हें नांव तिला कशावरून पडलें ठाऊक आहे तुम्हांला ?

भगीरथ नांवाच्या एका कर्तृत्वशाली राजानें पृथ्वीवर आणलेली नदी म्हणून गंगेला भागीरथी म्हणतात. आपल्या प्राचीन इतिहासांत याबद्दलची मोठी कथा आहे; आणि ती अति उद्‌बोधक व स्फूर्तिदायक पण आहे.

अशक्य वाटणारी, घडूं शकणार नाहीं असें दिसणारी गोष्ट भगीरथानें, एका थोर भारतपुत्रानें प्रत्यक्षांत घडवून आणली. 'असाध्य तेंचि साधावें । कानडेंचि अभ्यासावें ॥' अशी श्रीसमर्थांची – राष्ट्रगुरूंची शिकवण आपल्याला आहे. भगीरथाची प्रयत्न-कथाहि आपल्याला तेंच शिकविते. १२००० फूट उंचीवरील गंगेचा प्रवाह या पुरुषानें वळवून, बांधून, जोपासून भारतभूमींत आणून सोडला. ही भूमि सस्यश्यामल बनविली. अशक्य, दुर्घट होतें तें त्यानें आपल्या पुरुषप्रयत्नानें शक्य आणि सत्यघटित करून दाखविलें.

त्या भगीरथाचे, त्या भारतीय पूर्वजाचे पुत्र नि वंशज तुम्ही आहांत. आज तुम्ही वयानें लहान आहांत – आज आपल्या देशापुढें

असलेले प्रश्न तुम्हांला लहान वाटत असतील. पण तुम्ही जेव्हां मोठे व्हाल – तेव्हां हे प्रश्नहि तितकेच मोठे झालेले असतील, अशी भीति वाटते. ते प्रश्न तुमचे तुम्हांला सोडवावे लागतील. आणि ते सोडविण्यासाठीं प्रचंड प्रयत्नानें, उदंड दीर्वोद्योगानें, अलौकिक चिकाटीनें, गंगा भारत-भूमीवर आणणाऱ्या भगीरथाचे गुण तुम्हांला अंगीं बाणवावे लागतील.

भगीरथाच्या प्रयत्नामुळें गंगा आपल्याला लाभली. गंगेच्या प्रवाहाचा सर्व लाभ आपल्याला झाला. तो भगीरथाचाच वारसा; आणि अपरंपार कष्ट करून, दुःसाध्य गोष्ट साधण्याचा पुरुषार्थ हाहि त्या महान् भगीरथाचाच वारसा. तो 'भगीरथ प्रयत्ना'चा वारसा तुम्ही पुढें चालवावा अशीच अपेक्षा आहे.

भगीरथाचा प्रयत्न हा पिढ्यान् पिढ्या चाललेला होता. तो प्रयत्न होता. प्रयत्न म्हणजे प्रकर्षानें केलेला तो यत्न होता; म्हणजे विशेष परिश्रमपूर्वक, तीव्रतेनें चालविलेला उद्योग होता. त्यांत साहस होतें, अखंडता होती. साध्य होईपर्यंत करीत राहिलेला, चालविला गेलेला तो उद्योग होता. त्यामुळें त्या प्रयत्नाला विशेष महत्त्व होतें. अनेक अडचणी, विविध संकटें हें सारें असूनहि तो यत्न सोडून देण्याचें त्याच्या मनांत आलें नव्हतें. गंगा पृथ्वीवर येते म्हणाली तरी तिचा ओघ – वेग सहन करूं शकेल असा कोण होता ? म्हणून पुन्हां शंकरांना प्रसन्न करून घेण्यासाठीं भगीरथाला दुसरी तपश्चर्या करावी लागली.

तच्च गंगावतरणं त्वया कृतमरिंदम ।
अनेन भगवान्प्राप्तो धर्मस्यायतनं महत् ।
प्लावयस्व त्वयात्मानं नरोत्तम सदोचिते ।
सलिले पुरुषश्रेष्ठ शुचिः पुण्यफलो भव ॥

– हे शत्रुनाशका ! तुझ्या पुरुषप्रयत्नामुळें या पृथ्वीवर गंगा आणणें शक्य झालें. या तुझ्या कृत्यामुळें तूं मोठा धर्मात्मा झाला आहेस. गंगेंत स्नान करणें हें केव्हांहि पुण्यकारकच आहे; भविष्यकाळांतहि त्याचा तो

गुण तसाच रहाणार आहे. हे पुरुषश्रेष्ठा, या कृत्यानें तूं स्वतः पवित्र झालास व इतरांनाहि पवित्र केलेंस. ही गंगा युगानुयुगें तुझ्या दीर्घोद्योगाची अक्षयकीर्ति सांगत राहील.

या पुरुषश्रेष्ठ भगीरथाचें स्मरण नित्य ठेवलें पाहिजे; त्याचा आदर्श समोर ठेवला पाहिजे ! तसा महान् उद्योग, तशी दीर्घ तपश्चर्या तुमच्या हातून घडली पाहिजे. तेव्हांच तुम्हीं भगीरथाचा खरा वारसा पुढें चालविलात असें होईल.

जून, १९६५ [ संदर्भ : दशहरा ]

■ ■ ■

## स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।

प्रत्येक राष्ट्राला परंपरा असते. आपल्या हिंदुस्थान देशाला, या प्राचीन भरतखंडाला तर अति पुरातन, फार मोठी आणि भव्य, तेजस्वी परंपरा प्राप्त झालेली आहे. आपण आज हजारों वर्षें पाळीत असलेल्य सणा-उत्सवांना नि व्रत-संस्कारांनाहि मोठा इतिहास आहे. शक-वर्षारंभ — गुढीपाडवा हाहि त्यांतीलच एक.

गुढीपाडव्याला आपण घरोघर गुढ्या उभारतों. गुढीची पूजा करून घरांत मोठ्या आनंदानें नि उत्साहानें तो सण साजरा करतों. या गुढी पाडव्याची परंपरा फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. त्याच इतिहासहि जुना आहे.

भारतवर्षातील चेदि देशाचा म्हणजे चेदि नांवाच्या एका प्रांताचा राजा वसु म्हणून होता. वसु हा जन्मानें चेदीच्या राजघराण्यांतला नव्हे. तरी पण तो एक मोठा पराक्रमी पुरुष होता. चेदि देशांत माजलेली अंदाधुंदी नाहींशी करून तेथें प्रबळ राजसत्ता नि सुव्यवस्थित राज्यकारभार

सुरू व्हावयास हवा होता. म्हणून इंद्रानें वसूला प्रोत्साहन देऊन चेदि देशाचा राज्यकारभार हातीं घ्यावयास लावलें. वसु मोठा पराक्रमी होता तसाच न्यायी, धर्मशीलहि होता. त्यानें आपल्या तलवारीच्या बळावर राज्यांतील अंदाधुंदी नाहींशी केली; आणि धर्मशीलतेमुळें राज्यकारभाराला चांगलें वळण लावून प्रजा सुखी केली.

याप्रमाणें बरींच वर्षें चेदीचा राज्यकारभार वसूनें चालविला. परंतु प्राचीन हिंदु राजांप्रमाणें वसूलाहि पुढें वैराग्य उत्पन्न झालें; आणि मंत्र्यांच्या हातीं राज्य सोपवून तो वनांत तपश्चर्येसाठीं निघून गेला. त्यानंतर कांहीं काळ चेदिदेशाचें राज्य सुरळीत चाललें.

असा कांहीं काळ लोटल्यानंतर चेदिदेशांतील आणि बाहेरील प्रजा-शत्रूंनीं डोकें वर काढण्यास सुरुवात केली. राजसत्ता पूर्वीइतकी प्रबळ राहिली नव्हती; आणि पराक्रमी वसु तप सोडून वनांतून परत येऊन आपल्याला शासन करील असें भयहि या दांडग्यांना उरलें नव्हतें. हळू-हळू त्यांनीं राज्यभर धुमाकूळ घालून प्रजेला दे माय धरणी ठाय करून सोडलें. लोकांचें जीवित किंवा वित्तहि सुरक्षित राहिलें नाहीं. धर्माचा लोप होऊन सर्वत्र अत्याचार, अधर्माचरण यांना ऊत आला. अराजक माजलें. दुसरा कांहींच उपाय दिसेना तेव्हां राज्यांतील विचारवंत ऋषिमुनींनीं व नागरिकांनीं पुन्हां इंद्राकडेच धांव घेतली.

इंद्रानें चेदिदेशवासियांचें पुढारीपण पत्करून वसूची वनांत भेट घेतली. त्यानें वसुराजाला चेदिदेशांत माजलेल्या अराजकाची नि प्रजेच्या हालअपेष्टांची स्पष्ट कल्पना आणून दिली. आणि सांगितलें कीं, स्वतःला मोक्ष किंवा स्वर्ग मिळावा म्हणून वनांत जाऊन शांत बसण्यापेक्षां प्रजेचें रक्षण करणें हेंच तुझें पहिलें कर्तव्य आहे. वानप्रस्थाश्रम स्वीकारून राजधर्म सोडण्यापेक्षां राजधर्माचें आचरण करणें हेंच तुझें आज खरें धर्माचरण होईल.

वसु राजाला हें इंद्राचें सांगणें पटलें व त्यानें पुन्हां चेदिदेशाचा राज्यकारभार हातीं घेण्याचें मान्य केलें. त्यानिमित्त इंद्रानें चेदिराज वसूला अनेक भेटी दिल्या. त्यांतच एक काठीहि होती. तोच इंद्रध्वज असें कल्पून वसूनें वर्षारंभाच्या दिवशीं त्या काठीची पूजा करण्याचा प्रघात सुरू केला. त्या काठीवर सुंदर उंची रेशमी वस्त्रें आणि दागदागिने त्यानें घातले. ती काठी उंच उभारली. तिची पूजा केली. हाच गुढीपाडवा.

इंद्रानें दिलेली काठी किंवा लाकूड. संस्कृत भाषेंत लाकडाला लगुड म्हणतात. या लगुडपासून 'गुढी' मराठींत झाली. त्यावर चढविलेलें वस्त्र. वस्त्राला संस्कृतांत पट्ट असा शब्द आहे. तें पट्ट काठीवर उंच चढविल्यामुळें वाऱ्यावर फडफडतें. संस्कृतांत वा या शब्दाचा अर्थ फडफडणें असा होतो. म्हणजे वाऱ्यावर वस्त्र फडफडत असणें या पट्ट+वा शब्दावरून आतांचा 'पाडवा' शब्द रूढ झाला.

याप्रमाणें प्रतिवर्षारंभीं या गुढीची किंवा इंद्रध्वजाची पूजा करणारांना संपत्ति व जय प्राप्त होईल, असा वर इंद्रानें दिलेला आहे. अशा रीतीनें आपली पूजा करणाऱ्या देशांतील लोकांची व राष्ट्राची भरभराट होऊन ते आनंदांत राहतील असेंहि इंद्रानें म्हटलें आहे. साहजिकच आहे – जो मनुष्य, जी जनता, जें राष्ट्र आपल्या सार्वजनिक हिताच्य दृष्टीनें आवश्यक नि योग्य असा आचारधर्म पाळील, आपलें त्या वेळीं इष्ट असलेलें सामाजिक, राष्ट्रीय कर्तव्य बजावील त्या लोकांना नि राष्ट्राला संपत्ति नि विजय प्राप्त होणारच. त्यांचीच भरभराट होऊन त्यांना आनंदाचे दिवस दिसणार. युद्ध करावयाच्या वेळीं शांति-जपाची माळ ओढीत बसणारे आणि वैयक्तिक तत्त्वप्रेमासाठीं, आनंदासाठीं किंवा मोक्षासाठीं स्वधर्म, स्वकर्तव्य सोडून जनहिताकडे पाठ फिरविणारे दोवेहि सामाजिक दृष्टीनें, राष्ट्रीय दृष्टीनें सारखेच दोषी. '**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः**' – आपापलें कर्तव्य करण्यांत गढून गेले त्यांनाच यशप्राप्ति होते, अशा अर्थाचें वचन श्रीमद्भगवद्गीतेंत आहे.

ज्या ज्याचा जो व्यापार। तेथें असावें खबरदार॥
दुश्चितपणें तरी पोर। वेढा लावी॥

— असें श्रीसमर्थांनींहि बजावलें आहे. गुढीपाडव्याचाहि अर्थ नि आदेश हाच आहे.

[ संदर्भ : गुढी पाडवा ]

■ ■ ■

## समर्थ संजीवनी

आज ज्याला महाराष्ट्र म्हणून आपण ओळखतों, तो कोणी घडविला ? या प्रश्नाचें उत्तर देतांना श्रीसमर्थ रामदासस्वामींचा वांटा या महाराष्ट्राच्या घडणींत फार मोठा, अति प्रभावी आणि खोलपर्यंत गेलेला आहे असें दिसून येईल. छत्रपति श्रीशिवाजी महाराजांसारख्या थोर पुरुषानें ज्यांना आपले गुरु मानले ती विभूति खरोखरीच तशी थोर योग्यतेची असली पाहिजे.

सामान्य संसारी माणसानें आपलें आयुष्य यशस्वी कसें करावें इथपासून राष्ट्र बलाढ्य नि विजयी कशानें होईल येथपर्यंत सर्व तऱ्हेची व्यावहारिक शिकवण श्रीसमर्थांनीं दिलेली आहे. आणि त्याबरोबर भारतीय संतांच्या परंपरेंत शोभून दिसणारी पारमार्थिक किंवा आध्यात्मिक शिकवणहि त्यांनीं दिलेली आहे. उत्तम गुरु नि उत्तम शिष्य कसा असावा हें जसें त्यांनीं सांगितलें आहे तसेंच सुंदर अक्षर कसें काढावें यापासून उत्तम इमारती कशा बांधाव्यात नि चांगल्या बागा कशा असाव्यात याचेंहि विवरण त्यांनीं करून ठेवलें आहे. तथापि, या त्यांच्या सर्वांगीण शिकवणीपेक्षांहि त्यांचें महत्त्व आपल्याला आज राष्ट्रीय दृष्ट्या अधिक आहे.

सुमारें तीनशें वर्षांपूर्वी या देशांत इस्लामी आक्रमकांनीं अनन्वित अत्याचारांचा कळस गांठला होता. या देशाचे राष्ट्रीय नागरिक-धनी जे हिंदु त्यांचें जीवनच औरंगजेबासारख्या परकीय सुलतानांनीं अशक्य करून टाकलें होतें. अशा परिस्थितींत सर्वसामान्य जनता पाशवी जुलुमाखालीं चिरडली – भरडली जाऊन, मृतप्राय झाली होती. त्या मेलेल्या मनांत पुनः प्रतिकाराची, झगडण्याची इच्छा नि जोम उत्पन्न करण्याची महान राष्ट्रीय कामगिरी त्या वेळीं श्रीसमर्थांनीं केली.

'मराठा तितुका मेळवावा।' 'मारितां मारितां घ्यावें राज्य आपुलें।।' 'शर्तीची तलवार करावी। तरीच पावे राज्यपदवी॥'; 'देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा। मुलूख बडवा कीं बुडवावा। धर्मसंस्थापनेसाठीं॥'; अशा तऱ्हेची जागृति त्यांनीं पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या त्या काळच्या समाजांत केली. त्या समर्थ-संजीवनीनेंच हा मृतप्राय महाराष्ट्र पुनः जगला, जागा झाला नि अखेर अटकेपर्यंत झेंडे नेऊन त्यानें अवघ्या हिंदुस्थानाचें राजकारण आपल्या हातात आणलें.

आज आपण स्वातंत्र्यांत असलों तरी चिनी परचक्राचा राक्षस सीमेवर आ वासून बसला आहे. पाकिस्तानसारखे शत्रु आपल्यांतील दुबळेपणावर झडप घालावयास टपून आहेत. देशांत चालू असलेली परिस्थिति राष्ट्रीय दृष्ट्या जाणत्या नि जागृत माणसाला स्वस्थ झोप घेऊं देत नाहीं. आणि यांतून मार्ग काय नि कसा काढावा अशा गोंधळांत देशाचे नेते पडलेले आहेत. त्यांना यशस्वी, निश्चित व कायम मार्ग दाखविण्याचें सामर्थ्य या समर्थ-संजीवनींत आहे, श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या शिकवणींत – तत्त्वज्ञानांत आहे. परिस्थितीप्रमाणें व्यावहारिक बाबतींत किंवा तपशिलांत फरक पडला तरी ती शिकवण किंवा तें तत्त्वज्ञान कायमच आहे व राहील. तें वाचून, समजावून घेऊन खंबीरपणें व्यवहारांत आणणें याचीच गरज आहे. सध्यांच्या संभ्रमांत सांपडलेल्या वृद्ध, तरुण नेत्यांनीं त्या समर्थ-संजीवनीचा उपयोग करून घ्यावयाचा म्हटलें तरी ती त्यांना

मार्ग दाखवील. तथापि त्यांनीं त्याकडे दुर्लक्ष केलें तरी तुम्हांला – नव्या पिढींतील भावी नेत्यांना – त्या समर्थ-संजीवनीचा अभ्यास आतांपासूनच करणें आवश्यक नि हिताचें ठरणार आहे.

फेब्रुवारी, १९६४ [ संदर्भ : दासनवमी ]

■ ■ ■

## स्वामी विवेकानन्द : परंपरा आणि वारसा

स्वामी विवेकानन्दांची जन्मशताब्दि देशभर उत्साहानें साजरी होत आहे. इंग्रजी तारखेप्रमाणें १२ जानेवारी व तिथिप्रमाणें १७ जानेवारी १८६३ रोजीं त्यांचा जन्म झाला; त्याला शंभर वर्षें पुरीं झालीं म्हणून हा महोत्सव.

स्वामींची परंपरा या देशांत फार जुनी आणि अतिशय तेजस्वी अशी आहे. श्रीमत् आद्य शंकराचार्य, श्रीमत् विद्यारण्यस्वामी, श्रीसमर्थ रामदासस्वामी, स्वामी विवेकानन्द. अशी ही आपल्या देशांतील 'स्वामीं'ची थोर परंपरा आहे.

श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं, राष्ट्रीय जीवनाला अवकळा आणणाऱ्या पंथोपपंथांना बाजूला सारून देशभर तेजस्वी वैदिक धर्माचें साम्राज्य पुनश्च प्रस्थापित केलें. विद्यारण्यस्वामींनीं तर परकीय आक्रमकांच्या दाढेंतून आपला प्रदेश सोडवून त्या ठिकाणीं स्वराज्यस्थापना केली, विजयानगरचें देदीप्यमान हिंदु साम्राज्य उभें केलें. श्रीसमर्थ रामदासस्वामींचे श्रम महाराष्ट्रांत इस्लामी सत्तेचा नायनाट करून स्वधर्म-स्वराज्य-स्थापना करण्यासाठींच होते. स्वामी विवेकानंदांनीं या देशाच्याच आत्मिक, सामाजिक, ऐहिक, राजकीय सर्व प्रकारच्या उन्नतीसाठीं देह झिजविला. हिंदुधर्माची, हिंदुस्थानाची तेजस्वी ध्वजा जगभर फडकविली.

या स्वामींच्या परंपरेंत महत्त्वाची भर म्हणजे आर्य चाणक्याची. या सर्व स्वामींनीं देश-धर्म-संस्कृति-समाज यांच्या कल्याणार्थ प्रचंड उद्योग केला, प्रचंड सामर्थ्य उत्पन्न केलें. परंतु त्याचा उपयोग स्वतःच्या वैयक्तिक सुखासाठीं, उपभोगासाठीं, अधिकार-संपादनासाठीं यांपैकीं कोणीहि कधीं करून घेतला नाहीं. त्यांना तें सहज शक्य असतांनाहि त्यांनीं तें कधीं केलें नाहीं; त्याची इच्छा सुद्धां केली नाहीं. श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षीं हिमालयांत जाऊन समाधि घेतली. विद्यारण्यस्वामींनीं स्वराज्य-प्रस्थापनेनंतर तपश्चर्येसाठीं अरण्याचा रस्ता सुधारला. श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं झोळींत पडलेली राज्यभिक्षा परत केली. आर्य चाणक्यानें विशाल मगध साम्राज्याच्या पंतप्रधानकीचा मोह न बाळगतां तपाचरणासाठीं हिमालय गांठला. आणि स्वामी विवेकानंद शेवटपर्यंत स्वामीच-निःस्पृह विरक्त संन्यासीच राहिले.

ही आमची भारतीय परंपरा आहे. वसिष्ठादिकांपासून चालत आलेली ही निःस्पृह वृत्तीची, विरक्त कर्मयोगाची परंपरा आहे हाच वारसा स्वामी विवेकानंदांनीं उचलला. पुढल्या पिढ्यांनाहि हीच आदर्श परंपरा नि तेजस्वी वारसा मार्गदर्शक ठरणार आहे.

फेब्रुवारी, १९६३ [ संदर्भ : विवेकानंद जन्मशताब्दि ]

■ ■ ■

## असे जे जे आम्ही तेच भारतीय !

हिमालय हा आमचा पूजनीय पर्वत आहे. गंगा-यमुना या आमच्या लोकमाता आहेत. काशी-प्रयाग-रामेश्वर हीं आमचीं धर्मक्षेत्रें आहेत. हा भारत देश, हा प्राचीन हिंदुस्थान आमची प्रियतम मातृभूमि आहे. त्याच्यावर आमचें जिवापलीकडे प्रेम आहे. संस्कृत ही आमची भाषा आहे.

वेद हे आमचे ग्रंथ आहेत. ॐकार हें आमचें प्रतीक आहे. सदाचार हे आमचें ब्रीद आहे. राम-कृष्ण हे आमचे प्राचीन आदर्श आहेत. रामदास, विवेकानंद हे आमचे राष्ट्रगुरु आहेत. आद्य शंकराचार्य – रामानुजाचार्य हे आमचे तत्त्ववेत्ते आहेत. राणा प्रताप, गुरु गोविंद, शिवछत्रपति हे आमचे राष्ट्रपुरुष आहेत. – असे जे जे आम्ही आहोंत ते भारतीय असे जे दुसरे नाहींत; ते अर्थातच अभारतीय. म्हणजेच ते भारतीय नव्हेत.

● ● ●

नीरांजन, समई हे आमचे दीपप्रकार आहेत. गंध-पुष्प नि पुष्प-हार हें आमचें पूजा-साहित्य आहे. कीर्तन-भजन हीं आमचीं परमेश्वर-भक्तीचीं साधनें आहेत. भक्तिप्रमाणेंच योग नि ज्ञान हे आम्ही ईश्वरप्राप्तीचे मार्ग मानतों. गाय ही आम्हांला पूजनीय आहे, संरक्षणीय आहे. दिवाळी, होळी, दुर्गापूजा, संक्रांत इ. आमचे सण आहेत. असें मानणारे जे आम्ही ते भारतीय. असें जे मानीत नाहींत ते अर्थातच अभारतीय – भारतीय नव्हेत.

● ● ●

ही भारतभूमि आम्ही आमची पुण्यभू समजतों. ही आम्ही आमची धर्मभूमि समजतों. ह्या भूमीकडे आम्ही भोगासाठीं नव्हे, त्यागासाठीं पहातों. स्वच्छंद विहार करण्याची बाग नव्हे तर शुद्ध पवित्र सेवा करण्याचें हें मंदिर आम्ही समजतों. या भूमीसंबंधीं आमच्या मनांत लालसा नसून परम आदर आहे. या भूमीवरील आमचें प्रेम मुलाचें आईवर असतें तसें आहे; विलासी धनिकांचें संपत्तीवर असतें तसें नव्हे. इथेंच आमचा जन्म झाला आणि इथेंच आम्ही देह ठेवणार आहोंत. जगाच्या पाठीवर कुठेंहि भटकलों तरी आमची ओढ सदा आमच्या या 'थोरल्या घरा'कडेच राहणार आहे.

पुण्य मिळविण्यासाठीं, धर्मसाधना करण्यासाठीं आम्हांला या भूमीच्या बाहेर पाऊल टाकण्याची गरज वाटत नाहीं. या देशाचें कल्याण

साधण्यासाठीं या देशांतील जनतेची उन्नति करण्यासाठीं आम्हांला या भूमीच्या बाहेर जाऊन कांहीं करावें वा कोणाला आपली राष्ट्रीय निष्ठा अर्पण करावी असें आमच्या मनांतहि येत नाहीं.

— असे जे आम्ही ते खरे भारतीय. असे जे नाहींत ते अभारतीय; ते भारतीय नव्हेत.

• • •

सर्वांभूतीं असलेल्या, साऱ्या जड-चेतनाला, चराचराला व्यापून उरलेल्या परमेश्वरावर आमची श्रद्धा आहे. त्याला जाणून घेण्याचे, त्याच्याशीं अखेर एकरूप होण्याचे जे मार्ग आमच्या तत्त्ववेत्त्यांनीं नि साधुसंतांनीं आम्हांला दाखवून दिले त्यावर आमची श्रद्धा आहे. आम्ही पुनर्जन्म मानतों. कर्माचें फळ प्रत्येकाला भोगावेंच लागतें हा कर्मसिद्धांत आम्हांला मान्य आहे. मनुष्य तपश्चर्येनें साक्षात् परमेश्वर बनूं शकतो; त्यासाठीं कोणा प्रेषिताच्या मध्यस्थीची गरज नाहीं हा आमचा ठाम विश्वास आहे; कारण आम्ही सर्व त्या परमेश्वराचेच अंश आहोंत अशी आमची दृढ धारणा आहे. धर्म ही अंगावर मिरवायची दिखाऊ वस्तु, स्वार्थासाठीं वापरावयाचें साधन नव्हे; तर स्वतः च्या प्रत्यक्ष जीवनांत उतरवावयाचें तत्त्व आहे, आचरणांत आणावयाचा व्यवहार आहे असें आम्ही समजतों. धर्म हा आमच्या कोणत्याहि — सामाजिक, राजकीय, आर्थिक इ. — व्यवहारापासून अलग करतां येत नाहीं; कारण आमचें संपूर्ण जीवनच धर्ममय बनलेलें असावें अशी आमची अपेक्षा असते. कारण त्या प्रत्येकांतून धर्मसाधन व्हावें हीच आमची इच्छा असते; तें धर्मसाधन हेंच ईश्वरप्राप्तीचें साधन असें आम्हीं गृहीत धरलेलें असतें. कोणतीहि विद्या वा कला, कोणतेंहि शास्त्र वा तत्त्वज्ञान शेवटीं परमेश्वरप्राप्तीसाठींच, अशी आमची भावना असते. — असे जे आम्ही ते भारतीय. असें ज्यांना वाटत नाहीं, पटत नाहीं, भावत नाहीं ते अभारतीय; ते भारतीय नव्हेत.

दा. क्र. ९५९२०



चक्रांकित तिरंगी ध्वज हा आमचा राष्ट्रध्वज. 'वंदे मातरम्' आणि 'जनगणमन' हीं आमचीं राष्ट्रगीतें. समुद्रवलयांकित नि हिमाचलवेष्टित ही आमची राष्ट्रीय भूमि. आमची नितांत निष्ठा, अचल श्रद्धा नि अपार आदर या भूमीबद्दल. या भूमीचे आम्ही सार्वभौम स्वामी. या भूमीवर बाहेरून कोणत्याहि उद्देशानें आणि कोणत्याहि तऱ्हेनें चाल करून आलेला हा प्रत्येक परकीय नि आक्रमक. त्या प्रत्येक परकीय आक्रमकाशीं आमच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ प्राणपणानें लढा देणें हें आमचें आद्य कर्तव्य. तो लढा आमचा राष्ट्रीय लढा, आमचा राष्ट्रीय स्वातंत्र्यसंग्राम. त्या लढ्याचा प्रत्येक भाग ही आमची राष्ट्रीय हालचाल. – असं मानणारे, वागणारे, वागत आलेले ते आम्ही भारतीय. आम्ही येथील राष्ट्रीय. ते आम्ही येथील स्वजन. ते आम्ही खरेखुरे स्वातंत्र्यरक्षक नि देशभक्त. आणि असें जे मानीत नाहींत, असें वागत नाहींत, वागलेले नाहींत ते अर्थातच अभारतीय, ते अराष्ट्रीय, ते परकीया ते आक्रमक नि देशद्रोही ! आम्हां भारतीयांत एकता आहे, एकसूत्रत आहे, एकरस्य आहे, एकभाव आहे. आमचीं श्रद्धाकेंद्रें एक आहेत, आमचे राष्ट्रीय मानबिंदू एक आहेत, आमच्या आशा-आकांक्षा एक आहेत. आम्हीच एक होऊं शकतों, एक व्हायला हवें, संघटित व्हायला हवें, एकजूट बनायला हवें. आणि परकीय आक्रमकांविरुद्ध हिरीरीनें निःस्वार्थीपणें लढून या देशाचें एकत्व अभंग राखण्याची कामगिरी आम्हीच पूर्वी पार पाडलेली आहे. पुढेंहि आम्हांलाच ती पार पाडावी लागेल आणि आम्हीच केवळ ती पार पाडूं शकतों.

ऑगस्ट, १९६६ [ संदर्भ : स्वातंत्र्यदिन ]

०८६९१० २०१२५ ११२३।५१

आमची 'कुमार साहित्य माला' सुरू झाली त्याला आतां आठ वर्षें होऊन गेलीं. एवढ्या अवधींत वाङ्मयक्षेत्रांतील बहुतेक सर्व प्रकार मालेंत येऊन गेले; आणि कुमार साहित्याच्या दालनांत त्यासाठीं एक स्वतंत्र कपाट ठेवण्याची गरज उत्पन्न झाली. कोणत्याहि मराठी माध्यम असलेल्या शाळेचें ग्रंथालय आतां 'कुमार साहित्य मालें'तील पुस्तकांविना परिपूर्ण होऊं शकत नाहीं, असें म्हणण्यांत आम्ही अहंकार प्रकट करतों असें नसून तें वस्तुस्थितीचें वर्णनच आम्ही करीत असतों असें म्हणावें लागेल. वेचक आणि संपादित साहित्य, नीटस बाह्यांग, शुद्ध मुद्रण आणि विशेषतः नव्या पिढीच्या राष्ट्रीय चारित्र्य-निर्मितीवर सतत नजर हीं आमच्या या मालेचीं वैशिष्ट्यें म्हणून सांगतां येतील. कुमार-वयीनांसाठीं स्वतंत्र कादंबऱ्या प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न आणि पायंडा या मालेंतून प्रथमच पहावयास मिळेल. कथा, कादंबऱ्या, प्रवास-वर्णनें, साहसें, चरित्रें हे विषय तर या मालेंत मोठ्या संख्येनें आलेच आहेत; परंतु हिमालयांतील पर्वतारोहणाच्या मोहिमांचे इतिहास हें आमच्या या मालेचें अभिमानास्पद आणि तेजस्वी वैशिष्ट्य राहिलेलें आहे. पुस्तकांच्या संख्येच्या बाबतींत एक शंभरी तर आम्हीं केव्हांच ओलांडली; लवकरच दुसरी शंभरीहि ओलांडून जाण्याची उमेद आम्ही बाळगीत आहोंत. आमची समग्र सूचि मागवून तीवर एकदां नजर टाकल्यासहि आमचें सांगणें सार्थ असल्याचें आपल्याला दिसून येईल.

REFBK-0015920

# गोष्टी वाचायच्या आहेत ना ?

## मग हे घ्या हवे तितके कथासंग्रह

• **राघू** : ना. गो. शुक्ल • **मोत्याचें पीक** : सौ. मृणालिनी देसाई • **कथासरित्सागर** : भाग १, २, ३ • **वीरगाथा** : बुंदेल्यांच्या शौर्यकथा • **युरोपा आणि कादमस** : ग्रीक पुराणकथा • **सुका मेवा** : शकुन्तला बोरगांवकर • **औदुंबर आणि पारिजात** : य. गो. जोशी • **ऐतिहासिक गुजगोष्टी** : भा. द. खेर • **इतिहासाच्या पानोपानीं** : स्फूर्तिप्रद इतिहासकथा • **घर-दार** : व्यंकटेश माडगूळकर • **कथांजली** : रवींद्रनाथ ठाकूर • **दया तिचें नांव** : टॉलस्टाय • **वनांतली वाट** : शांताराम आठवले • **प्रेरणा** : मुन्शी प्रेमचंद • **राजाजींच्या गोष्टी** : चक्रवर्ती राजगोपालाचारी • **कोंड्याचा मांडा** : सत्य-साहसकथा–वि. गो. साठ्ये • **रामकथा** • **कृष्णकथा**, • **पांडवकथा**, • **संस्कृत नाट्यकथा** : भाग १, २, ३ • **शेक्सपिअरच्या नाट्यकथा** • **एक रांजण एक थाळी** : ना. गो. शुक्ल • **कोथिंबिरीच्या काड्या** : श्रीकान्तराय......

समग्र सूचि मागवा.

## वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.

३, राऊंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २